
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ८७७



REFBK-0009828

# राइट-बंधू

जगातील पहिले विमान-निर्माते

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थापना
अनुक्रम 28480 वि: ...
क्रमांक 800 नों दि: 3/3/...

REFBK-0009828

अनुवादक : अमरेन्द्र

वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २




आवृत्ति पहिली,
१९५८



Copyright : 1950
Random House, Inc.
New York.



मूल्य : दोन रुपये

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग
काळबादेवी, मुंबई २

मुद्रक :

व. का. साठे
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणें २

श्री : १२

हा अनुवाद

स्वत: नव्या नव्या वस्तु

तयार करण्याचें कुतूहल

असलेला माझा मुलगा

चि. अनिल यास

सप्रेम

१. 'आईपासुन शिकूं चला !'
२. कागदावर बरोबर उतरवा
३. गाड्याची गडबड
४. पहिली हातखर्ची
५. चला पतंग उडवूं या !
६. विल्बरचा आजार
७. हेलिकॉप्टर : आकाशयान
८. 'वेस्ट साइड न्यूज'
९. दि राइट सायकल कंपनी
१०. दुचाकीची शर्यत
११. दुचाक्यांचा व्यापार
१२. दोषी ताप
१३. वाचतां वाचतां शिक्षण
१४. आकाशयान आकारतें
१५. किटी हॉक
१६. आकाशयानाची प्रगति
१७. 'दि राइट एंजिन'
१८. उडणारें यंत्र
१९. गायरानांतलें विमान
२०. कीर्ति आणि यश

...दावर वाचे
८८२८

प्रकरण पहिलें

# ' आईपासुन शिकूं चला ! '

सुसान राइट ही इतर चारचौघीजणींसारखी आई नव्हती.

आसपासच्या इतर आयांच्या मानानें ती खूपच तरुण होती नि देखणीहि होती. आणि तिला आपल्या तिन्ही लहानग्या मुलांबरोबर हंसाय-खेळायला फार आवडायचें. अकरा वर्षांचा विल्बर, सात वर्षांचा आर्व्हिल; अन् कॅथराइन तर अवघी चार वर्षांची चिमुरडी.

इतर आया माना उडवून म्हणायच्या, " ही सुसान राइट आपलीं पोरं बिघडवणार आहे. ती त्यांना स्वच्छंदपणें वागूं देते. यांतून कांहीं बरं नाहीं निष्पन्न व्हायचं !"

पण यावर सुसान राइट फक्त हंसे. उन्हाळ्याच्या दिवसांत ती सहलीसाठीं फराळाचं बांधून घेई आणि दोघे मुलगे व छोटी केट मिळून ( तिला कॅथराइन असे लांबलचक कोणीच म्हणत नसे ) रानांत जाऊन एखादा दिवस तिथें घालवीत. राइटबाईंना प्रत्येक पक्ष्याचें नांव माहीत. ती त्याच्या नुसत्या गाण्याच्या आवाजावरून त्या पक्ष्याचें नांव सांगूं शके. विल्बर व ऑर्व्हिल यांनींहि ही विद्या हळूहळू आत्मसात् केली.

ही मंडळी डेटनमध्यें रहात. एक दिवस या शहराजवळूनच वहाणाऱ्या नदीच्या कांठावर तीं सर्वजणें बसलीं होतीं. विल्बर आणि ऑर्व्हिल मासे पागीत होते. सारीजणें विल्बरला 'विल' म्हणत आणि ऑर्व्हिलचा उल्लेख 'ऑर्व्ह' असाच होई. मासे कांहीं बरेसे मिळत नव्हते. इतक्यांत एकाएकीं एक मोठा पक्षी झेप घेऊन खालीं आला, त्यानें आपली लांब चोंच नदींत खुपसली, एक लहानसा मासा घेऊन तो बाहेर आला, आणि त्यानें सरळ वर आकाशांत उड्डाण घेतलें.

" आई, पक्ष्याला उडतां ग कशानं येतं ? " विल्बरनें विचारलें.

" त्याच्या पंखांनीं, विल, " तिनें सांगितलें. " तूं पहा ना, ते आपले पंख हालवितात आणि त्यामुळं त्यांना वेगानं उडतां येतं. "

" पण आई, " विल विचारीत होता. त्याचें पुरें समाधान झालेलें दिसत नव्हतें. " आतां त्या पक्ष्यानं खालीं झेप घेतली त्यानंतर आपले पंख हालविले सुद्धां नाहींत. तो सरळझेपेनं खालीं आला, एका माशावर झडप घातली आणि आला तसाच्च तो सरळ वर निघून गेला. त्यानं आपले पंख मुळीं सुद्धां हालविले नाहींत. "

" अरे, वारा कांहीं नुसता तुमच्याकडेच्च किंवा तुमच्यापासून दूर असा वहात नाहीं. " आई सांगूं लागली. " तो वर आणि खालींहि वहात असतो. जेव्हां हवेचा प्रवाह वर वहातो तेव्हां तो पक्ष्याला वर घेऊन जातो. त्याचे पंख त्याला हवेंत आधार देऊन रहातात. "

" मग आपल्याला पंख असते तर आपल्याला उडतां आलं असतं; नाहीं का ग आई ? " विल्बरनें विचारलें.

" पण देवानं आपल्याला कुठं दिले आहेत पंख ? " आई हंसून म्हणाली.

" नसूं देत; आपण सुद्धां पंख तयार करूं शकूं, " विल्बर आपल्या म्हणण्यावर जोर देत म्हणाला.

" तें असेलहि शक्य, " त्याची आई थोडी विचारमग्न होत उत्तरली. " पण मला नाहीं सांगतां येणार. एखाद्या माणसानं पंख तयार केले आणि त्यानं कोणा मुलाला उडतां आलं असं मी तर कांहीं ऐकलेलं नाहीं बाबा. "

" एक दिवस मी करून दाखवीन, " विल्बरनें म्हटलें. आणि ऑर्व्हिलनें मान डोलावून त्याला दुजोरा दिला, " मी सुद्धां दाखवीन करून. "

" बरंय, तुम्ही आणखी थोडे मोठे व्हा आणि मग करून, " त्यांची आई म्हणाली.

सुसान राइटबद्दल ही आणखी एक विशेष बाब होती. इतर बहुतेक साऱ्या आयांना हें बोलणें वेडगळपणाचेंच्च वाटलें असतें. इतर बहुतेक साऱ्या म्हणाल्या असत्या, ' ए, वेडपटासारखे काय बडबडताहांत ! कोणी ऐकलं तर काय म्हणेल ? ' पण – सुसान राइट मात्र असें म्हणणारी नव्हती. तिला हें माहीत होतें कीं, अकरा वर्षांच्या मुलाच्या डोक्यांतहि कांहीं स्वतःच्या अशा कल्पना असूं शकतात. केवळ

अकरा वर्षांच्या मुलाच्या डोक्यांतून त्या प्रगट झाल्या एवढ्याच कारणासाठीं कांहीं त्यांना मूर्खपणा म्हणतां येणार नाहीं. सुसान राइटनीं आपल्या मुलांना तीं लहान छकुलीं बाळें आहेत असें समजून कधीं वागविलें नाहीं. आणि बहुधा त्यांना आपल्या आईबरोबर सहलीला जायला किंवा मासे धरायला जायला आवडायचें. आणि म्हणूनच ते तिला सारखे प्रश्न विचारीत. तीहि त्यांच्या प्रश्नांना योग्य तीं उत्तरें देई.

ते दोघे मुलगे आपल्या वडिलांनाहि असेच प्रश्न विचारीत. परंतु वडील एक फिरते धर्मप्रचारक असल्यामुळें ते बहुतकरून बाहेरगांवींच असत.

" आतां गारठा पडायला लागला, " राईटबाई एकदम म्हणाल्या. " ते राखी रंगाचे ढग बघितलेस का विल ? "

विल्बरनें वर पाहिलें. " आतां बर्फ पडायला लागणार, नक्की, मी सांगतों, " तो आनंदानें खुलून म्हणाला.

" आतां पुढल्या वसंत ऋतुपर्यंत सहली विसरायच्या बरं का. " त्यांच्या आईनें म्हटलें. " बरोबर आहे, हें बर्फासारखंच दिसूं लागलंय् खरं. आतां आपण घराकडे परतावं हें बरं. "

तीं जेमतेम घरीं जाऊन पोंहोचली असतील नसतील तोंच पहिले पांढरे-शुभ्र टपोरे बर्फतुषार खालीं ठिबकूं लागले होते. ती सारी रात्र आणि दुसरा सारा दिवसभर बर्फ पडतच होतें. वर्षातलें तें पहिलें खरें हिमवादळ होतें.

सकाळीं वारा इतक्या भयंकर सोसाट्यानें वहात होता कीं, विल्बरला गोठ्यांत लांकूडफाटा सांठविला होता तेथवर चालत जाणेंहि मुष्किल झालें. वारा इतका दाट होता कीं, त्यानें विल्बरला खालींच आदळलें. तरी पण तो कसाबसा चुलीसाठीं वेंगभर लांकडें घेऊन स्वयंपाकघराच्या दारांतून आंत घुसला. त्यानें बाहेरच्या वाऱ्याबद्दल अर्थातच आईला सांगितलें.

" अशा वेळीं एक गोष्ट करायची – वाऱ्याच्या झोतांत पुढं वांकायचं, " तिनें सांगितलें. " खूप खालीं वाकायचं; म्हणजे आपण अगदीं जमिनीसरपट होतों आणि वाऱ्याच्या झोताच्या खालीं जातों. "

त्या रात्रीं पुन्हां आणखी लांकडें घेऊन येण्यासाठीं विल्बरला जेव्हां दुसरी खेप करावी लागली, तेव्हां त्यानें त्याच्या आईनें सांगितलेली युक्ति करून पाहिली.

आणि आश्चर्य म्हणजे ती सफळ झाली! तो जेव्हां पुढें वांकला तेव्हा वाऱ्याचा जोर तसा कांहीं फारसा जाणवला नाहीं त्याला.

कांहीं दिवसांनीं वारा थांबला; आणि सारा भूप्रदेश बर्फानें आच्छादून गेला. विल्बर आणि ऑर्व्हिल यांनीं – बरोबर छोटी केट त्यांचें शेपूट धरून होतीच – घरापासून जवळच असलेल्या 'बिगहिल'कडे आपला मोर्चा घाईघाईनें वळविला.

ऑर्व्हिलचे सारे शाळूसोबती तिथें आपापल्या घसरगाड्या घेऊन अगोदरच हजर झालेले होते. खालीं घसरत जायला ही टेकडी खरोखरच फार छान होती. कारण तिच्या जवळपास कोठें सडका आलेल्या नव्हत्या. आणि असल्या तरी मोठीशी फिकीरहि नव्हती. हें साल १८७८ चें होतें; म्हणजे त्या वेळीं मोटारी नव्हत्या. हिंवाळ्यांत घोड्यांनीं ओढायच्या घसरगाड्या रस्त्यांवरून चालायच्या. घोड्यांच्या गळ्यांत घंटा असायच्या आणि ते धांवूं लागले कीं त्यांच्या गळ्यांतल्या घंटा घणघणूं लागायच्या त्या चांगल्या मैलभरावरूनहि ऐकूं यायच्या.

बहुतेक मुलांच्याजवळ त्यांच्या प्रत्येकाच्या स्वतःच्या घसरगाड्या असत. त्या गाड्यांना आजच्यासारखे लवचिक 'फ्रायर्स' नसत; तर त्या जुन्या पद्धतीच्या दोन लांकडी 'रनर' असलेल्या गाड्या असत. 'विकत'ची घसरगाडी घेण्याची कल्पनाहि त्या काळीं कोणाच्या डोक्यांत नसे. साधारणपणें प्रत्येक घरीं मुलाचे वडील त्याला घरींच अशी गाडी तयार करून देत असत.

ज्या मुलांपाशीं स्वतःच्या घसरगाड्या असत ते विल्बरला व ऑर्व्हिलला आपल्याबरोबर गाडीवर बसवून खालीं घसरत नेत. एड साइन्स नि चॉन्सी स्मिथ, जॉनी मॉरो आणि अल जॉन्स्टन – साऱ्यांच्यापाशीं स्वतःच्या घसरगाड्या होत्या. पण त्यांना त्या लांबच लांब टेकडीवरून एकमेकांशीं स्पर्धा लावण्याची मोठी हौस. हा प्रकार सुरू झाला कीं विल्बरला नि ऑर्व्हिलला मुकाट्यानें नुसते हात बांधून त्यांच्याकडे पहात रहाण्याखेरीज दुसरें कांहींच करतां येत नसे. त्या दिवशीं दुपारीं खूप उशिरा दोघेहि मुलगे घरीं परत आले. छोटी केट मागें रेंगाळत येत होतीच. आईचें त्यांच्याकडे लक्ष होतें. मुलें अगदीं मुकाट मुकाट दिसत होतीं. तीं मोठीं शहाणीं होतीं. तशींच स्वभावानेंहि मोठीं चांगलीं होतीं. मुलें कशामुळें तरी कष्टी आहेत हें ओळखायला तिला फार वेळ लागला नाहीं.

“बाबा आम्हांला एक घसरगाडी कां नाहीं ग करून देत?” विल्बरच्या तोंडून एकदम प्रश्न बाहेर फुटला.

"पण तुझे वडील तर बाहेरगांवीं गेले आहेत, विल," आईनें मृदुपणानें सांगितलें. "अन् ते घरीं असतात तेव्हां ते किती कामांत गुंतलेले असतात तुला माहीतच आहे. चर्चच्या नियतकालिकासाठीं त्यांना गोष्टी लिहून द्याव्या लागतात आणि प्रवचनंहि लिहून काढावीं लागतात. पण, काय रे, आतां आपणच एक घसरगाडी बनवली तर ?"

विल्बर हंसूं लागला. "आई कुठं घसरगाडी बनवते वाटतं ?"

"तूं जरा धीर धर," आईनें सांगितलें. "एड सांइन्सपेक्षां चांगली गाडी बनवूं या बघ आपण. एक पेन्सिल अन् थोडासा कागद घेऊन ये इकडे."

"कागदाची घसरगाडी बनविणार कीं काय तूं ?" ऑर्व्हिल आ वासून तिच्याकडे पहातच राहिला.

"जरा बघ तरी," तिनें पुन्हां म्हटलें.

* * *

प्रकरण दुसरें

# “ कागदावर बरोबर उतरवा – ”

विल आणि ऑर्व्ह यांनीं आईला पेन्सिल व कागद आणून दिला. तिनें यजमानांच्या मेजापाशीं जाऊन एक फूटपट्टी शोधून टाकली. मग ती स्वयंपाकघरांतल्या मेजापाशीं जाऊन बसली. “ आपण पहिल्यानं घसरगाडीचं एक चित्र काढूं या, ” ती म्हणाली.

“ घसरगाडीचं चित्र घेऊन ग काय करायचंय् ? ” ऑर्व्हिलनें विचारलें.

“ ऑर्व्हिल, आतां जरा इकडे लक्ष दे बघूं. ” आईनें एका हातांत पट्टी उचलून घेतली आणि दुसऱ्या हातांत पेन्सिल धरली.

“ एड साइन्सची आहे तशी गाडी हवी आपल्याला, ” ऑर्व्हिल म्हणाला.

“ तुम्ही घसरत जातां तेव्हां एड साइन्सच्या गाडींत कितीजणं मावतात ? ” आईनें विचारलें.

“ दोन, ” विल्बरनें सांगितलें.

“ तिघंजणं मावतील एवढी मोठी करूं या आपण ही गाडी, ” ती म्हणाली. “ कधींमधीं केटलाहि बरोबर घेऊन जातां येईल तुला. ” हळूहळू घसरगाडीची रूपरेखा कागदावर उतरतांना दिसूं लागली. तिचें हातानें रेखाटन चालूच होतें आणि ती बोलतहि होती. “ बरं का रे ! एडची घसरगाडी जवळ जवळ चार फूट लांबीची आहे. मी पुष्कळदां बघितली आहे ती. आपण तुमची घसरगाडी पांच फूट लांब ठेवूं. बरं, एडची गाडी जमिनीपासून जवळ जवळ फूटभर उंच आहे नाहीं ? ”

ऑर्व्हिलनें मुंडी हालविली पण कागदावर आकार घेत असलेल्या आकृतीवरची आपली नजर मात्र जरा सुद्धां ढळूं दिली नाहीं. ती आकृति आतां

घसरगाडीसारखी दिसायला लागली होती खरी, पण इतर मुलांपाशीं असलेल्या घसरगाड्यांसारखी कांहीं ती दिसत नव्हती.

" तूं तर अगदींच सखल केलीस ही, " विल म्हणाला.

" तुला एडच्या गाडीपेक्षां वेगवान घसरगाडी हवी, खरं ना ? " त्याची आई जरा हंसली. " हें बघ विल, एडची घसरगाडी निदान फूटभर तरी उंच आहे. आपली गाडी त्यापेक्षां सखल-जमिनीसरपट होईल. अन् त्यामुळंच तिला तितका वात-विरोध होणार नाहीं. "

" वात-विरोध ? " विल्बरच्या कानावर हा शब्द आज प्रथमच पडत होता. तो भांबावल्यासारखा आपल्या आईकडे बघतच राहिला.

" अरे, गेल्या आठवड्यांतलं वादळ आठवतं ना तुला ? " तिनें विचारलें. " तूं रानांतल्या पडळीकडे निघाला होतास; अन् वाऱ्याचा जोर तर इतका होता कीं, तुला धड पडळीपर्यंत जाववत सुद्धां नव्हतं. मी तुला खालीं वांकायला सांगितलं. अन् पुढच्या खेपेला तूं तसा वांकून गेलास. तूं जेव्हां वेंगभर लांकडं घेऊन परत आलास तेव्हां तूं हंसून म्हणालास, ' आई, मी पुढं वांकून चाललों अन् वाऱ्याच्या खालीं झालों. ' तेव्हां तूं जमिनीसरपट होतास, त्यामुळं तुला वाऱ्याचा विरोध कमी करतां आला. तसंच घसरगाडी जितकी जमिनीच्या जवळ तितका तिला वाऱ्याचा विरोध कमी; अन् अर्थातच तितका तिचा वेगहि अधिक. "

" वात-विरोध, वात-विरोध ... " विल्बर पुनःपुन्हां पुटपुटला. आणि बहुधा याच क्षणीं विमानाचा जन्म झाला ! विल्बर किंवा ऑर्व्हिल राइट हा वेगाबाबतचा धडा कधीं विसरले नाहींत.

" आई, तुला ग कशा माहीत या गोष्टी ? " विल्बरनें विचारलें.

" विल, तूं थक्कच होशील. आयांना कित्ती कित्ती माहीत असतं ! " आई नुसती हंसली. तिनें मुलांना हें कांहीं सांगितलें नाहीं कीं, ती जेव्हां छोटीशी शाळकरी मुलगी होती तेव्हां तिचा उत्तम विषय म्हणजे गणित होता. तें जणुं तिला आपोआपच येऊं लागे. ती वरच्या वर्गांत गेली तेव्हांहि तसेंच. आणि ती कॉलेजांत जाऊं लागली तेव्हांहि भूमिति आणि बीजगणित या विषयांत तिची उत्तम गति होती. त्यामुळेंच तिला 'वात-विरोधा'सारख्या गोष्टींची सारी माहिती होती.

अखेर तिनें ती आकृति पुरी केली. मुलें ती पहाण्यासाठीं मेजावर वांकलीं. ही घसरगाडी एडच्या गाडीपेक्षां लांबट आणि खूपच चिंचोळी होती. एडची

मराठी

अनुक्रम २२५५८ दि. ५।१२।

क्रमांक ८०८ नों दि. ३।३।५८

गाडी सुमारें तीन फूट रुंदीची होती, तर ही घसरगाडी रुंदीला फार तर तिच्या निम्म्यानें भरेल इतकीच दिसत होती.

" तूं ही चिंचोळी केलीस ती अधिक वेगवान व्हावी म्हणून, होय ना आई ?" विल्बर जाणतेपणानें म्हणाला. " जितकी चिंचोळी तितका वाऱ्याच्या विरोध कमी."

" बरोबर," आई मान हालवीत म्हणाली, " आतां धांवांची अगदीं बरोबर लांबी आणि घसरगाडीची बरोबर रुंदी लिहूं या आपण."

" पण ही तर कागदी घसरगाडी आहे, आई," ऑर्‌व्हिलनें शंका काढली.

" तुम्ही जर ती कागदावर बरोबर काढूं शकलांत तर तुम्हांला बनवितांहि अचूक येईल, लक्षांत ठेव." आईनें शांतपणें सांगितलें.

" तुम्ही जर ती कागदावर बरोबर काढूं शकलांत तर तुम्हांला ती बनवितांहि अचूक येईल." विल्बर तेंच पुन्हां पुटपुटला. आईनें त्याच्याकडे टवकारून पाहिलें. केव्हां केव्हां विल त्याच्या अकरा वर्षांच्या मानानें अधिक प्रौढ वाटायचा. छोट्या ऑर्‌व्हिलला कांहीं विचारा, त्याचें उत्तर अगदीं तयार ! पण त्याबरोबरच तो तें विसरूनहि जायचा. विल मात्र जेव्हां कांहीं शिके तेव्हां तें त्याच्या डोक्यांत अगदीं पक्कें रहायचें.

विल्बरच्या डोक्यांत कांहीं तरी विचारचक्र चालू होतें. तो एकदम म्हणाला, " आई, तूं जेव्हां कपडे शिवतेस तेव्हां अगोदर त्याचें चित्र काढतेस नाहीं का ग ?"

" हं, आपण त्याला म्हणतों आकृति," आई सांगूं लागली. " पहिल्यानं मी एक आकृति कागदावर काढतें अन् मग मला हव्या असलेल्या कपड्याची आकृति मी बरोबर कापून घेतें, अन् –"

" तुझी ही आकृति अचूक असली कीं, तुझा कपडाहि बरोबर होतो." त्यानें आईचें वाक्य पुरें केलें. आईनें होकारार्थी मान डोलविली.

" आतां तुम्ही दोघेहि तुमची घसरगाडी करायला घ्या बघूं," आई हंसत हंसत सांगूं लागली. " गोठ्यांत हव्या तितक्या फळ्या पडल्या आहेत. त्यांतल्या अगदीं पातळ फळ्या शोधून काढा. गांठीच्या फळ्या मात्र घेऊं नका हं. फळ्या घ्याल त्या बरोबर मापाच्या घ्या. विल, ऑर्‌व्हिलला करवतीला हात लावूं देऊं नकोस हो !"

" आई आम्हीं बाबांचीं हत्यारं वापरलीं तर? " विल्बरनें बाबरत बाबरतच विचारलें.

आईचा त्याच्या म्हणण्याला रुकार मिळाला. " ते कांहीं रागावणार नाहींत हत्यारं घेतल्याबद्दल, पण जपून वापरा मात्र. आणि आकृति काढून दिली आहे – अगदीं तस्सं काम करा. " तिनं पुन्हां एकदां बजावलें.

दोघेहि गोठ्याकडे वळले. छोटी केट तरी मग तिथं थोडीच थांबते! तीहि त्यांच्या मागें धांवली. दोघांहि मुलांना मिळालेल्या संधीचें मोठें कौतुक वाटत होतें. वडील कुठें तरी बाहेर गेलेले असले कीं, तासणीनें लांकूड तासीत बसायचें हा तर बिल्बरचा उद्योगच होता; पण वडिलांच्या हत्याराच्या पेटींत पडलेल्या चकाकणाऱ्या हत्यारांना हात लावायची मात्र त्यांची प्राज्ञा नव्हती.

दुसऱ्या दिवशीं त्यांची घसरगाडी पुरी झाली. त्यांनीं ती गोठ्यांतून बाहेर काढली आणि आईला ती पहायला हांक मारली. आईनें हातांतल्या मोजपट्टीनें ती मोजून पाहिली. तिनं आकृतींत दाखविल्या होत्या तितक्याच बरोबर लांबीच्या धांवा मुलांनीं ठेवलेल्या होत्या. खरें म्हणजे, तिनें दिलेल्या सर्वच सूचनांबरहुकूम मुलांनीं काम केलें होतें. धांवा चकाकत होत्या. ऑर्व्हिलनें सँडपेपरनें त्या घांसून घांसून अगदीं रेशमासारख्या गुळगुळीत करून टाकल्या होत्या.

" आई, आमच्या डोक्यांत आणखी एक कल्पना आली. " बिल्बर सांगत होता, " आम्हांला पडवींत कांहीं जुन्या मेणबत्त्या सांपडल्या. त्या मेणबत्त्यांनीं आम्हीं या धांवा खूप घांसल्या. बघ तरी किती गुळगुळीत झाल्या आहेत त्या. "

आईला मोठें समाधान वाटलें. खरें म्हटलें म्हणजे तीच त्यांना तें सांगणार होती. पण त्यांनीं आपल्या डोक्यानेंच ती गोष्ट करूनहि टाकली होती.

" बरं, आतां बघा पाहूं तुमची घसरगाडी कशी चालते ती, " आईनें सुचविलें.

मुलांनीं त्यांची ती नवी घसरगाडी जवळच्या टेकडीवर ओढीत नेली. केट मागोमाग होतीच.

मुलें त्या गाडीकडे अगदीं आश्चर्यचकीत होऊन पहात राहिलीं. ती गाडी लांबट नि खूपच चिंचोळी होती. तिच्याकडे पाहून तर असें वाटत होतें कीं, तिच्यांत कोणी मुद्धां मावणार नाहीं. त्यांच्या घसरगाड्यांच्या धांवांच्या मानानें या गाडीवरच्या धांवा अगदींच पातळ दिसत होत्या.

"कोणी करून दिली रे ही तुम्हांला?" एड साइन्सनें विचारलें.

"आईनें दाखवली कशी तयार करायची ती," विल्बर अभिमानानें म्हणाला. त्यावर कांहीं मुलांना मात्र हंसूं आवरलें नाहीं. घसरगाडी कशी तयार करायची तें आईला येत असतें वाटतें कुठें?

"तुम्ही त्याच्यावर बसलांत तर तिचे दोन तुकडेच होऊन जातील, असं दिसतंय् या गाडीकडे बघितल्यावर!" अल जॉन्स्टन दांत विचकीत म्हणाला आणि खो खो हंसत सुटला.

"मग तर बरंच झालं – एकेका तुकड्यावर एकेक!" कोणी तरी टिंगल केली.

"चला, शर्यत लावायची का?" एका मुलानें पुढें होऊन विचारलें.

"चला, एकेका गाडीवर दोघे दोघे." विल्बर त्याला होकार देत म्हणाला. त्याला मुळींच भीति वाटत नाहीं. आकृति बरोबर होती याबद्दल त्याची खात्री होती; आणि ऑरव्हिलनें व त्यानें आकृतीबरहुकूम काम केलेलें असल्यामुळें घसरगाडी बरोबरच असली पाहिजे याबद्दलहि त्याला शंका नव्हती.

चार गाड्या रांगेत उभ्या राहिल्या. विल्बर व ऑरव्ह आपल्या गाडीवर बसले; पण तरीहि तिचे 'दोन तुकडे' कांहीं झाले नाहींत! इतक्यांत विल्बरच्या डोक्यांत एक कल्पना चमकली.

"ऑरव्ह, ऊठ," तो म्हणाला, "अन् असा आडवा पड गाडीवर ... हं तसा ... पाय लांब कर थोडे." आणि मग स्वतः विल्बर भावाच्या पाठीवर एकदम आडवा झाला. "यानं वातविरोध कमी होईल बरं का, ऑरव्ह" तो हळूच पुटपुटला.

"आम्हांला सगळ्यांना एकदम ढकला रे," एड साइन्स किंचाळला.

आणि सगळेजण निघाले. सुरुवात तर सगळ्यांची चांगली झाली. टेकडीच्या माथ्याला उतार चांगलाच होता, त्यामुळें चारी घसरगाड्यांना जोराची गति मिळाली. विलनें उजव्या बाजूला पाहिलें, मग डाव्या बाजूलाहि बघितलें. त्यानें डोळ्यापुढें येणारें हिम बाजूला झटकूनहि पाहिलें; तरीहि त्याला बाकीच्या गाड्या कांहीं दिसेनात. मग त्यानें मागें वळून पाहिलें. बाकीच्या गाड्या त्याच्या मागें, वीस-वीस तीस-तीस फूट मागें धडपडत येत होत्या. यांची नवी घसरगाडी मात्र सारखी पुढें घसरत होती. तिच्या धांवांतून सुखकर संगीत घुमत होतें. विल

आणि ऑर्व्ह एका विलक्षण शिरशिरीनें शहारले होते. अखेर त्या लांबलचक टेकडीचा पायथा त्यांनीं गांठला. बाकीच्या तिन्ही घसरगाड्या मात्र खूपच मागें पडल्या होत्या.

नेहमीं घसरगाड्या पायथ्याशीं आल्या कीं त्यांचा वेग एकदम कमी होऊन त्या एकदम थांबत. पण विल-ऑर्व्हच्या गाडीचें मात्र तसें झालें नाहीं. त्यांची गाडी कित्येक यार्ड तशीच पुढें धांवत गेली. तिला मिळालेल्या गतीनें ती आतां-पर्यंत अशा रीतीनें पुढें घसरत गेलेल्या दुसऱ्या कोणत्याहि गाडीपेक्षां निदान शंभर यार्ड तरी पुढें जाऊन मग थांबली.

धडधडत्या काळजानें थरथरतच विल व ऑर्व्ह उठून उभे राहिले.

"आपण टेकडीवरून उडत खालीं आलों," विलला धड बोलतांहि येत नव्हतें.

"आपण उडत आलों!" ऑर्व्हनें त्याच्या म्हणण्याला साथ दिली.

इतक्यांत एड, आल, जॉनी सारेजण धांवत-पळत तेथवर येऊन पोंहोचले होते. जें कांहीं घडलें होतें त्यामुळें ते थरारून गेले होते. ऑर्व्ह व विल यांनीं तयार केलेल्या नव्या घसरगाडीइतकी वेगानें व इतकी लांबवर दुसरी कोणतीच गाडी कधीं गेलेली त्यांनीं पाहिली नव्हती.

"तुम्ही तर टेकडीवरून उडतच आलांत!" एड साइन्स धांपा टाकीत उद्गारला. "मी बसून बघूं का एकदां?" त्यानें म्हटलें.

विल्बरनें ऑर्व्हकडे बघितलें. त्यांच्यांत कांहीं नेत्रपल्लवी झाली. ही घसर-गाडी त्या दोघांनीं मिळून तयार केली होती आणि तिथें असलेल्या सगळ्या गाड्यांत तीच सर्वोत्कृष्ट ठरली होती. पुढें कोणतीहि गोष्ट तयार करायची ती ते दोघे मिळूनच करणार होते.

"ऑर्व्ह," विल म्हणाला, "मला एक कल्पना सुचली आहे. घसरगाडी बाकी सगळी छान आहे, पण तिला वळवतां येत नाहीं. आपण तिला एक सुकाणूं (रडर) बसवूं या, म्हणजे तिला उजव्या किंवा डाव्या हव्या त्या बाजूला वळवितां येईल."

"मग आपण आईकडून तशी आकृति काढून घेऊं या," ऑर्व्ह म्हणाला

"कशाला? – आपणच काढूं या; तूं अन् मी." विल्बरचें म्हणणें पडलें का, "कांहींहि करायचं झालं कीं सारखी आईकडे धांव घेऊन कसं चालेल?"

एवढ्यांत छोटी केट तुरुतुरु धांवत त्यांच्यापाशीं येऊन पोंहोचली होती.

"तुम्हीं कबूल केलंय् मला," ती धापा टाकीत होती. "तुम्ही मला एकदां गाडीवर बसवून नेऊं असं म्हणालां आहांत बरं का."

"चल केट," विल हंसत म्हणाला, "आपण तिघेंहि एकदां घसरगुंडी करीत खालीं येऊं या. अन् मग तूं बसून पहा एड, बरं का."

मग ते ती घसरगाडी पुन्हां ओढीत टेकडीच्या माथ्यापर्यंत नेऊं लागले, "आम्ही उडत गेलों ... उडत गेलों ... उडत गेलों." हे दोन शब्द विलरच्या कानांत सारखे घुमत होते.

* * *

प्रकरण तिसरें

# गाड्याची गडबड

मिल्टन राइट कांहीं दिवसांनीं घरीं आले. ते धर्मोदेशक होते. अंगावरचा डगला काढण्यापूर्वीच त्यांना ती नवी घसरगाडी पहावी लागली. अन् ती सारी हकीगत उभ्याउभ्याच ऐकून घेतल्याशिवाय त्यांची सुटका झाली नाहीं. ती घसरगाडी त्यांनीं कशी तयार केली, थोरल्या टेकडीवर त्यांचीच गाडी सर्वांत वेगवान कशी ठरली — सारें सारें मुलांनीं त्यांना ऐकविलें.

"मुलांना मी आपलीं हत्यारं वापरायला दिलीं होतीं बरं का," सुसान राइटबाईंनीं म्हटलें.

मिनिटभर कोणीच कांहीं बोललें नाहीं. राइटना नव्या नव्या वस्तु तयार करण्याचा मोठा नाद होता. त्यांनीं एकदां तर एक टंकलेखक (टाइपरायटर) तयार केला होता. आपल्या चकाकत्या छिन्नीचा, धारदार करवतीचा नि तसेंच पडवींतल्या त्या स्वच्छ, नीटनेटक्या कामाच्या मेजाचा त्यांना केवढा अभिमान असायचा.

"तूं मुलांना माझीं हत्यारं दिलींस ?" राइटना आश्चर्याचा धक्काच बसला.

"हो," सुसानबाईंनीं शांतपणें सांगितलें. विल व ऑर्व्ह यांचीं मात्र तोंडें अगदीं उतरून गेलीं होतीं.

एक शब्दहि पुढें न बोलतां राइट एकदम वळले आणि तडक खोलीबाहेर निघून गेले. ते दाणदाण पाय आपटीत अंगणांतून पडवीकडे गेलेले ऐकूं येत होतें. दहाएक मिनिटांतच ते परत आले. आपल्या दोन्ही मुलांच्या निष्पाप चेहऱ्यांवर त्यांची दृष्टि क्षणभर खिळली.

"तुम्हीं एकहि हत्यार खराब केलेलं नाहींत बरं का रे," ते डोळे मिचकावीत म्हणाले. "आणि खरं सांगायचं म्हणजे कोणी तरी माझ्या जुन्या छिन्न्यांना धार लावून ठेवलेली दिसतेय्."

" आमचं काम झाल्यावर आम्हीं साऱ्याच हत्यारांना पुन्हां धार लावून ठेवली होती, " विलनें चटकन् सांगितलें.

" माझ्या समजुतीनं मुलं आतां हत्यारांची काळजी घेण्याइतकीं समजुतदार झालीं आहेत, " राइटबाईनीं आपलें मत सांगितलें.

" बरोबर आहे तुझं म्हणणं, " राइट हंसत हंसत म्हणाले.

" आम्हांला पुन्हां हवीं आहेत तीं हत्यारं, " ऑर्व्ह चाचरत म्हणाला. " आमच्या घसरगाडीला आम्हांला सुकाणूं करून बसवायचं आहे. "

" हो, आम्हांला सुकाणूं करायचंय्, " विल्बरनेंहि खुलासा केला.

" घसरगाडीला सुकाणूं? कधीं कोणीं हे बसवलंय् तरी? " वडिलांनीं त्यांना विचारलें.

" बाबा, आमच्या अभ्यासाच्या पुस्तकांत आम्हीं एक आगनावेचं चित्र बघितलं आहे, " विल्बर बोलत होता. " त्या आगनावेला मागच्या बाजूला एक सुकाणूं होतं. तसंच सुकाणूं बसवून आम्हांला आमची घसरगाडी वळवतां नाहीं का येणार? "

" कोण जाणें, मला कांहीं समजत नाहीं त्यांत, " वडिलांनीं संशय प्रगट करीत म्हटलें.

" पण, बाबा, हें बघा, " विल्बर पळत गेला व वडिलांच्या मेजावरचा एक मोठा थोरला कागद उचलून घेऊन आला. " हें पहा, सुकाणूंचीं किती तरी चित्रं आम्हीं काढलीं आहेत. त्यांतलं हें एक सर्वांत उत्तम आहे. "

" बघूं बरं, " सुकाणूंच्या त्या सुबक आकृतीकडे पहात राइट म्हणाले. त्याचीं सारीं मोजमापें त्यावर पेन्सिलीनें आंकड्यांत लिहिलेलीं होतीं. तीवरून लाकडी सुकाणूं तयार व्हावयाचें होतें. त्या सुकाणूंला एक दांडी दाखविलेली होती. दोन लोखंडी गोल सळयांनीं तें सुकाणूं घसरगाडीच्या बाजूला जोडलेलें होतें. राइटनीं एकदम आपल्या पत्नीकडे टवकारून पाहिलें.

" छान! " ते पुटपुटले, " चित्रकलेची देणगी त्यांनीं तुझ्यापासून उचललेली दिसते. "

" नव्हे, तें सगळें त्यांनीं स्वतःच केलेलं आहे. मी कांहीं त्यांना मदत नाहीं केलेली. " राइटबाई अभिमानपूर्वक म्हणाल्या.

" मला तर हें अगदीं ठीक वाटतं, " राइटनीं आपलें मत दिलें.

" जर कागदावर बरोबर असलं तर तयार करतांनाहि तें बरोबरच्च होणार, " विल्बर ठामपणानें म्हणाला. " आणि आम्हीं तर ही शेवटची आकृति तयार करण्यापूर्वी किती तरी आकृत्या काढल्या होत्या. "

" पण तुम्ही हे लोखंडी गोल कुठून मिळवणार ? " वडिलांनीं विचारलें.

" पलीकडून, जुन्या लोखंडी सामानाच्या आवारांतून, " विल्बरनें सांगितलें. " कामोंडी देतील त्या आम्हांला. अन् बरं का बाबा, हिंवाळा संपला कीं आम्ही त्याच्याच खटपटीला लागणार आहोंत. आम्ही एक चारचाकी गाडा तयार करणार आहोंत. शेतकऱ्यांकडून जुनं लोखंड गोळा करून त्यांना आणून द्यायचं ठरवलंय् आम्ही. "

" ठीक, ठीक. पण एका वेळीं एकच काम करा. पहिल्यानं तुमचं तें सुकाणूं कसं चालतं तें तर पहा, " वडिलांनीं म्हटलें.

" पण बाबा ... " विल्बर चाचरत कांहीं तरी विचारणार होता.

" मला माहीत आहे तें. हत्यारं हवींत ना, " वडिलांनीं त्याचें बोलणें पुरें केलें. ते हंसत हंसत म्हणाले, " जा, पोरांनो ! हत्यारं वापरा पण कुठं लागूनबिगून घेऊं नका म्हणजे झालं. "

आतां सुकाणूंची आकृति नुसती कागदावरच राहिली नव्हती. तबेल्यांत सुकाणूं तयार झालें आणि मुलांनीं जेव्हां तें घसरगाडीला मागल्या अंगाला जोडलें तेव्हां तें अगदीं अचूक बसलें. आईच्या सांगण्याचें प्रत्यंतर त्यांना पुन्हां एकदां आलें. आकृति काढण्यांत घालवलेला एवढा वेळ फुकट गेलेला नाहीं, हें त्यांच्या पक्कें लक्षांत राहिलें.

थोरल्या टेकडीवर त्यांनीं आपली घसरगाडी चालवून पाहिली. त्यांच्या जोडलेल्या त्या विचित्र वस्तूकडे इतर मुलें मोठ्या कुतुहलानें बघत होतीं; पण आज कोणी त्यांना हंसत मात्र नव्हतें. आतां राइट-बंधूंना ते कोणत्याच बाबतींत हंसणार नव्हते.

त्यांची घसरगाडी टेकडीवरून घसरत निघाली. सुकाणूं विलनें हातांत धरलें होतें. विलनें सुकाणूं फिरवलें नि लगेच घसरगाडी डाव्या बाजूला वळली; त्यानें पुन्हां सुकाणूं फिरवलें आणि घसरगाडी उजव्या बाजूला वळली. एखादी आगनाव वळवावी तशी ते आपली घसरगाडी हवी तशी वळवीत होते.

त्या रात्रींच बर्फ वितळायला सुरुवात झाली. पुढें सबंध आठवडाभर पाऊस पडत होता. त्या बारीक उबदार पावसानें सारा बर्फ धुवून नेला आणि हिंवाळा पळवून लावला. विल आणि ऑर्व्ह दररोज त्या चिखलानें राड झालेल्या रस्त्यांतून मोठ्या कष्टानें घरीं येत. घरीं येतांच पहिल्यानें ते गृहपाठ हातावेगळे करीत. गृहपाठ कोणाला आवडतो म्हणून तो राइट-भावांना आवडणार? पण ते केल्याशिवाय सुटका नाहीं हेंहि ते चांगलें ओळखून होते. आणि म्हणून ते घरीं येतांच प्रथम गृहपाठ घाईघाईनें उरकून टाकीत.

इतिहास, भूगोल, शुद्धलेखन — हे विषय मुलांना हळूहळू यायला लागले. पण गणितहि त्यांना फारच सोपें वाटे. गुरुजींनीं सांगितलेलीं उदाहरणें ते भराभर सोडवून दाखवीत, तें पाहून आईला मोठा आनंद होई.

वडिलांप्रमाणेंच या मुलांना नव्या नव्या वस्तु स्वतः तयार करण्यांत मोठी मौज वाटे; आणि त्यांच्या हातांत हत्यारें असलीं म्हणजे तर काय! त्यांचा आनंद गगनांत मावेनासा होई. पण त्यांचे वडील गाढे विद्वान् होते. इंग्रजी किती सुंदर लिहायचे नि बोलायचे ते! ही विद्या मात्र त्यांच्या मुलांत उतरली नव्हती. उलट लहानशी आंकडेमोड म्हटली तरी वडिलांची मोठा त्रेधा उडे. मुलें तसली आंकडेमोड सहज करून दाखवीत. या बाबतींत ते आपल्या आईच्या वळणावर गेलेले होते.

दररोज अर्धा-पाऊण तास गृहपाटांत घालविला कीं, ऑर्व्ह डोकें वर करून बघे. "झालं का रे तुझं, विल?" तो विचारी. गृहपाठ संपविण्यांत ऑर्व्हचा नेहमींच पहिला नंबर असायचा. त्याला विलइतके जास्त गुण कधीं मिळायचे नाहींत, पण तो अतिशय चलाख मात्र होता. विलला कोणत्याहि गोष्टीचा विचार करायला थोडा वेळ लागे हें खरें, पण त्याचें उत्तर सहसा कधीं चुकायचें मात्र नाहीं.

शाळेचे गृहपाठ उरकले तरी अजून घरचा 'गृहपाठ' त्यांची वाट पहात असायचा. वडिलांची ताकीद असायची कीं, "स्वयंपाकघरांतल्या जळणाच्या खोक्यांत लांकडं भरून ठेवा." ह्या 'गृहपाठा'कडे मुलें कधींच दुर्लक्ष करायचीं नाहींत. लांकडाचे ओंडके कापायचे आणि कुऱ्हाडीनें फोडायचे हें काम विलकडे असायचें. विलच्या कुऱ्हाडीचा घाव अचूक असायचा. विलनें फोडलेलीं लांकडें ऑर्व्ह गोळा करी आणि धांवतपळत स्वयंपाकघरांत आणून टाकी.

"बस झालीं रे, विल," आंतलें जळणाचें खोकें भरलेलें पहातांच ऑर्व्ह आरोळी मारी. लगेच विल कुऱ्हाड स्वच्छ करून कामाच्या मेजाच्या वरील बाजूस जागच्या जागीं अडकवून टाकी.

एवढें झालें कीं दोघेहि स्वयंपाकघरांत आईकडे पळालेच. "हात धुवा बघूं," आईची हीहि आज्ञा मुलें बिनतक्रार पाळायचीं. अखेर कागद, पेन्सिली, पट्टी इत्यादि साहित्य घेऊन स्वयंपाकाच्या मेजापाशीं या दोन्ही स्वाऱ्या येऊन बसायच्या. आतां मात्र धांवपळ संपलेली असायची. त्यांना चारचाकी गाडा तयार करायचा होता; आणि या गाड्यावर बरेंच कांहीं अवलंबून होतें.

विल आणि ऑर्व्ह यांचा जरीपुराणवाल्या कार्मोडीशीं करार झाला होता. त्यानें या मुलांना सांगितलें होतें कीं, आसपासच्या शेतकऱ्यांपाशीं किती तरी जुनीपुराणी लोखंडाची मोड विकायची होती. कार्मोडीपाशीं घोडा-गाडी नव्हती. त्याला स्वतःला शेतकऱ्यांकडे जाऊन लोखंडी मोडीची चौकशी करायला मुळींच सवड नव्हती. आपल्या मोडीच्या दुकानांत बसून लोकांकडून खरेदी केलेल्या सामानांतून लोखंडी व लांकडी सामान वेगवेगळें काढण्यांतच त्याचा वेळ जाई.

विल्बर व ऑर्व्हिल यांच्यापाशीं एखादी गाडी असती, तर ते आजू-बाजूच्या शेतकऱ्यांकडे जाऊन मोड आणूं शकले असते. मोडक्या कुऱ्हाडी, झिजले-गंजलेले नट-बोल्ट, खिळे, तसेंच तुटक्या सांखळ्या व खिळखिळ्या झालेल्या मोडक्यातोडक्या दुचाक्या. असलें किती तरी सामान मुलांनीं जमवून आपल्या गाडींत भरून आणावें आणि जरीपुराणवाल्यानें तें घेऊन त्यासाटीं कांहीं पैसे मुलांना द्यावेत. याकरितां हवा होता गाडा विल्ला व ऑर्व्हिलला. एकदां त्यांचा हा गाडा तयार झाला कीं, त्यांच्या व्यापाराला सुरुवात व्हायची होती.

त्यांच्या वडिलांच्या कांहीं मित्रांकडे असले गाडे होते, ते त्यांनीं जाऊन बारकाईनें पाहिले. पण त्यांचा स्वतःचा गाडा मात्र अगदीं हल्का व्हायला हवा होता; कारण त्यांना तो स्वतःला ओढायचा होता. आणि त्याचबरोबर तो चांगला बळकटहि असायला हवा होता; कारण लोखंड व सर्व प्रकारचें धातूचें सामान त्यांतून ओढून आणायचें होतें. डेटनमधल्या वाण्यापाशीं एक सुंदर गाडा होता; त्यासारखाच आपला गाडा बनवायचा असा विचार होता या मुलांचा. परंतु जेव्हां त्यांनीं त्या सुंदर गाड्याच्या चाकांना लोखंडी धांवा असलेल्या बघितल्या

तेव्हां त्यांना तो विचार सोडून द्यावा लागला. या ' बाजारी धांवा ' होत्या; आणि तशा धांवा बाजारांतून विकत आणायला या मुलांपाशीं पैसे कोठून असणार ?

विल्बरचा थोडा विरस झाला. तो म्हणाला, " आपण आपलीं लांकडीच चाकं तयार करूं. "

ऑर्व्हनें मान हालविली. " एड साइन्सपाशीं लांकडी चाकांची गाडी आहे. काल त्यानं ती मला थोडा वेळ वापरायला दिली आणि मी केटला आंत बसवून ती चालवून बघितली. मला तर ती ओढवेच ना. लांकडी चाकं कांहीं कामाचीं नाहींत. "

" कां ? किती तरी शेतकऱ्यांच्या बैलगाड्यांना तर लांकडी चाकं आहेत, " विल्बर म्हणाला.

" पण त्या गाड्या ओढायला बैल असतात. " ऑर्व्हनें सांगितलें. आणि मग एकदम एक कल्पना त्याच्या डोक्यांत आली. " तुला माहीत आहे, विल ? "

" काय ? " गेल्या कांहीं आठवड्यांत विल्बर बरेंच कांहीं शिकला होता. ऑर्व्ह एखादी नवी कल्पना सांगूं लागला कीं, ती ऐकून घेण्याची त्याला आतां संवय लागली होती. तसें पाहिलें तर ऑर्व्हचें वय केवळ आठ वर्षांचें होतें आणि विल्चें बारा वर्षांचें होतें. पण केव्हां केव्हां चिमखडा विल ऑर्व्हला आपल्या बोलण्यानें चकीत करून टाकी.

" माझ्या आलंय् ध्यानांत, " ऑर्व्ह मोठ्यानें म्हणाला. " कालच दोन जुन्या तीनचाकी गाड्या मोडीच्या दुकानांत आल्या आहेत. कार्मोडी म्हणत होते कीं, त्या कांहीं फारशा उपयोगाच्या नाहींत. पण त्यांचीं चाकं खूप चांगलीं वाटलीं मला. त्यांचे किती तरी स्पोक तुटलेले आहेत, तर कांहीं अजिबात जाग्यावरच नाहींत. तरी पण आपण तीं तारांनीं दुरुस्त करूं. "

" मग चल तर, आपण कॉर्मोडींकडे जाऊं, " विल म्हणाला.

* * *

प्रकरण चौथें

# पहिली हातखर्ची

ऑर्व्हचें म्हणणें बरोबर होतें. त्या तीनचाकी गाड्या अगदींच जीर्ण झालेल्या होत्या; परंतु त्यांचीं चाकें मात्र दुरुस्त करून उपयोगांत आणतां येण्यासारखीं होतीं. अर्थात् त्यासाठीं खूपच वेळ मोडावा लागला असता आणि या कामांत इतका वेळ मोडणें कॉमोंडींना परवडण्यासारखें नव्हतें. विल व ऑर्व्ह यांनीं सांगितलें कीं, "तीं चाकं आमच्या गाड्यासाटीं आम्हांला हवीं आहेत." तेव्हां कॉमोंडींनीं हंसून विचारलें, "बरं समजा, तुम्हीं चाकं दुरुस्त केलींत. पण तीं तुमच्या गाड्याला बसवणार कशीं?"

"त्याचं आम्हांला चित्र काढायला हवं पहिल्यानं," विल म्हणाला.

"चित्र काढायला हवं?" कॉमोंडी जरासे बुचकळ्यांतच पडले.

तेव्हां मग विल्बरनें खुलासा केला. त्याची आई कोणताहि कपडा शिवण्यापूर्वीं त्याची आकृति काढी आणि आकृति बिनचूक असली म्हणजे कपडाहि बरोबर होई. विल्बरनें तें कॉमोंडींना सांगितलें. तसेंच त्यांनीं आपली घसरगाडी कशी बनविली तेंहि त्यांनीं कॉमोंडींना सांगितलें. कॉमोंडी लक्षपूर्वक ऐकत होते. एड साइन्सची लांकडी चाकांची गाडी ओढायला किती जड जाते तेंहि ऑर्व्हनें कामोंडींना ऐकविलें.

"बरोबर आहे तुमचं म्हणणं, मुलांनो!" कामोंडी म्हणाले. "तुम्हांला माहीत आहे, पहिली दुचाकी सुद्धां – आपली कोणी तरी उठला अन् त्यानं बनविली असं नव्हे कांहीं. पूर्वीच्या दुचाक्यांना सुद्धां अवजड लांकडी चाकं व जाड जाड लोखंडी धांवा असायच्या चांगल्या शंभर शंभर पौंड वजनाच्या. लोक म्हणतच त्यांना – 'हाडमोड्या'; आणि खरोखरीच त्या बसणारांचीं हाडं खुसळून काढायच्या. त्या बघा आजूबाजूला किती पडल्या आहेत तसल्या दुचाक्या."

" मग पुढं काय झालं ? " ऑर्व्हनें विचारलें.

" पुढं, एका चलाख फ्रेंच माणसानं दुचाकीबद्दल बारीक विचार करायला सुरुवात केली, " कार्मोडी सांगूं लागले. " हलक्या वजनाची दुचाकी तयार केली तर ती चालवायला सोपी जाईल हें त्याच्या लक्षांत आलं. तसल्या दुचाकीनं इतक्या लवकर दमायला झालं नसतं, म्हणून त्यानं बैठक मारून एका 'हाडमोड्या' दुचाकीची आकृति काढली. ही दुचाकी पहिल्या दुचाकीपेक्षां वजनानं किती तरी हल्की होणार होती. त्या आकृतींत धातूच्या हलक्या चाकावर रबरी धांव चाकाच्या रिमेला जखडून बसविली होती; आणि चाकाला लांकडी ताड्याहि ( स्पोक ) होत्या. मग त्यानं ती कोणाकडून तरी तयार करवून घेतली. ही त्याची नवी दुचाकी पहिल्या जुन्या प्रकारच्या दुचाकीपेक्षां वजनानं निम्मी होती आणि तिचा वेगहि पुष्कळच अधिक होता. "

" पण आतां दुचाक्यांना तारांच्या ताड्या (स्पोक) असतात, " विल म्हणाला.

कार्मोडींनीं होकारार्थी मान हालविली. " नंतर दुसरा कोणी तरी – हा एक अमेरिकन होता – पुढं आला आणि त्यानं तारांच्या ताड्या असलेलं चाक काढलं. त्यामुळं दुचाकी अधिक हल्की व अधिक वेगवान झाली. जेव्हां त्यानं आपली आकृति काढून पुरी केली तेव्हां तो म्हणाला, ' यानं दुचाकी अधिक चांगली व बळकट होईल. ती आपल्या वजनापेक्षां दसपट अधिक वजन पेलील. ' आणि त्यानं तशी दुचाकी एका यंत्रज्ञाकडून बनवून घेतली; अन् खरोखरच त्या माणसाचं म्हणणं खरं ठरलं ! "

" त्याची आकृति बरोबर होती म्हणून त्याची दुचाकीहि बरोबर झाली, " विल म्हणाला.

कार्मोडींनीं तें कबूल केलें. " आतां तुम्हीं मला दुचाकीवरून जातांना बघितलं आहे. माझं वजन बरोबर दोनशें पौंड आहे तर माझी दुचाकी आहे फक्त वीस पौंड वजनाची. पाहिलंत, ती आपल्या दसपट वजन उचलून नेते. तुम्ही तुमचा गाडा असाच बरोबर तयार करा म्हणजे तो आपल्या वजनाच्या दसपट बोजा नेऊं शकेल. जा, त्या दोन्ही जुन्या तीनचाक्या तुम्ही आपल्या-बरोबर घरीं घेऊन जा अन् बघा तुम्हांला त्यांचीं चाकं दुरुस्त करतां येतात का. मी तुम्हांला थोडी जाडी तार देतों; आणि थोडंसं ग्रीस पण घेऊन जा बरोबर. या जुनाट चाकांना खूपच ग्रीस चोपडावं लागेल. "

ऑर्व्ह व विल त्या तीनचाक्या घेऊन धांवत-पळतच घरीं आले. (या प्रत्येकीला तीन चाकें होतीं – पुढल्या बाजूला एक मोठें व मागल्या बाजूला दोन लहान लहान.) त्यांनीं त्या तीनचाक्या तबेल्यांत आणून ठेवल्या व ते घरांत पळाले. स्वयंपाकघरांतल्या मेजापाशीं ते येऊन बसले तेव्हां त्यांच्या डोक्यांत किती तरी कल्पनांनीं नुसती गर्दी करून सोडली होती. इतक्यांत एड साइन्स उघड्या खिडकींतून डोकावत ओरडला, "चला, आम्ही मासे मारायला जातों आहोंत."

"नाहीं बुवा, आम्हांला तर काम आहे आतां," विल ऑर्व्हकडे पाहून डोळे मिचकावीत म्हणाला.

विल छोट्या ऑर्व्हबरोबर इतका वेळ कशासाटीं मोडतो हें एडच्या किंवा चॉन्सी स्मिथच्या अगर इतर मुलांच्याहि कांहीं ध्यानांत येईना. ऑर्व्ह विलपेक्षां चांगला चार वर्षांनीं लहान होता, पण त्याला आपल्या बरोबरीचा समजून वागतांना तो दिसे. असं कां बरं? – पण अखेर एड, चॉन्सी व इतर दोस्त मंडळी मासे-मारीच्या कामगिरीवर रवाना झाली आणि राइट-बंधू मात्र त्यांनीं काढलेल्या आकृतींत डोकें खुपसून बसले.

इतक्यांत त्यांची आईहि येऊन त्यांच्याजवळ बसली. पण ती मोठी हुषार होती. तिनें आपण होऊन त्यांना कांहींच सांगितलें नाहीं. अखेर मुलांनींच तिला विचारलें, "आई, तुला कशी काय वाटते ही आमची कल्पना – गाड्याला चाकं जोडण्याची?" त्यांनीं एव्हांना दोन कोनहि शोधून काढले होते. आणि ते चाकांच्या खोबणींत अगदीं बरोबर बसले होते.

पण त्यांच्या आईला तें कांहीं पटलेलें दिसलें नाहीं. "फारच घर्षण होतं आहे," ती मान हालवीत म्हणाली.

"घर्षण?" ऑर्व्ह गोंधळांत पडलेला दिसला. त्यानें हा शब्द पूर्वी ऐकलेलाच नव्हता.

"तुम्ही दोन काड्या एकमेकींवर घासतां ना – तेंच घर्षण," आई समजावून सांगूं लागली, "अशा तुम्ही त्या खूप वेळपर्यंत घासत बसलांत – मग काय होईल?"

"त्या झिजून जातील," ऑर्व्हनें पटदिशी उत्तर दिलें.

"हां, मग तुम्ही बसवलेल्या या चाकांचेंहि तसंच होईल," ती सांगूं लागली, "चाकाची खोबण या आंसांवर सारखी घासत राहील. आणि तुमच्या लक्षांत येण्यापूर्वींच तीं चाकं निकामी होऊन जातील. सध्यां त्यांच्यांत फारच घर्षण आहे. घर्षण तुम्हांला अजिबात नाहीं काढतां येणार, पण कमी मात्र करतां येईल. यासाठीं तुम्ही आंसांचीं टोकं व चाकाच्या खोबणी घासून घेतल्यात आणि त्यांत आंसासाठीं वापरतात तें ग्रीस वापरलंत तर काम भागेल."

आठवड्याभरांतच त्यांचा गाडा तयार झाला.

आतां वसंत ऋतूला सुरुवात झाली होती. शेतकरी आपले तबेले, गोठे, लांकडें भरून ठेवण्याच्या पडव्या रिकाम्या करूं लागले होते. त्यांच्या कारभारणी सुद्धां दरसालप्रमाणें वासंतिक स्वच्छता-मोहिमेला लागलेल्या होत्या-याचा अर्थ त्या आपापल्या तळघरांतली, कोठींतली, माळवदावरली मोडतोड बाहेर काढून टाकूं लागल्या होत्या.

दररोज शाळा संपली कीं ऑर्व्ह आणि विल यांची जोडी घरीं घाईघाईनें यायची, आपला गाडा घ्यायची नि सडकेवरून ओढीत ओढीत आसपासच्या वस्तींत जायची. अंधार पडेपर्यंत त्यांचा तो गाडा अनेक चित्रविचित्र दिसणाऱ्या वस्तूंनीं भरून जायचा. आणि मग स्वाऱ्या तो ओढीत ओढीत घराकडे परतायच्या.

उन्हाळ्याची सुटी सुरू झाली तेव्हां तर त्या दोघांना दुसरा उद्योगच उरला नाहीं. सकाळींच न्याहारी पोटांत ढकलली कीं ते जे आपला गाडा घेऊन बाहेर पडायचे ते सबंध दिवसभर बाहेरच असायचे. या जमवून आणलेल्या मोडीबद्दल कामोडीहि त्यांना चांगला मोबदला देई. आणि अशा रीतीनें या दोघां भावांजवळ पहिली हातखर्ची जमली. पण ते या पैशांचें करणार काय ? फार तर दर शनिवारीं, आठवड्यांतून एखादा दिवस ते मिठाईच्या दुकानांत जात; आणि दिवसभर चघळतां येणाऱ्या चोखण्या, नाहीं तर सिमेंटच्या गोळ्या, नाहीं तर असंच कांहीं तरी विकत घेत. पण त्यांना ते पैसे मिळवायला इतके श्रम पडलेले असत कीं, असे मेवा-मिठाईवर ते उधळणें त्यांच्या जिवावर येई. मग त्यांनीं एक पतंग विकत घ्यायचें ठरविलें. आतांपर्यंत त्यांनीं पतंग 'विकत' असा कधींच घेतलेला नव्हता.

डेटनच्या सर्व-भांडारांत ( जनरल स्टोअर ) जाऊन ते पतंग पाहूं लागले. मोठ्या वावड्या तर फार महाग होत्या. साध्या पतंगाची किंमत ४० सेंट होती.



खूप वेळ विचारविनिमय केल्यानंतर अखेर त्यांनीं त्यांतलाच एक चांगलासा पतंग पसंत केला.

त्या दिवशीं दुपारीं त्यांनीं आपला मोर्चा थोरल्या टेकडीकडे वळविला. त्यांच्या हातांत तो नवा पतंग होता आणि बरोबर पुष्कळ सवंगडीहि होते. त्यांचा पतंग छान होता – एड साइन्सइतकाच चांगला होता; पण त्याच्यापेक्षां कांहीं विशेष चांगला होता असें मात्र नव्हे. अन् त्यालाहि इतर साऱ्या पतंगां-प्रमाणें एक वाईट खोड होती – एकदम डुबी घ्यायची व तीहि बहुधा एखाद्या झाडाच्या फांद्यांत.

" विल, आपल्यालाहि असा पतंग तयार करतां येईल – असाच काय, याहून चांगला, " ऑर्व्हनें पैजेवर सांगितलें. विल्बर विचारांत पडलेला दिसला. " आपल्याला घसरगाडी करतां आली, गाडा तयार करतां आला. मग पतंग कां

नाहीं येणार? एकच कां पुष्कळ पतंग कां नाहीं करतां येणार? – अन् ते मग आपल्याला मुलांना विकतांहि येतील."

"ठीक आहे, ऑर्व्ह," विलनें होकार दिला. "आपण पहिल्यानं एक चांगला भला थोरला पतंग आपल्यासाठीं करूं या; आणि मग कांहीं विकण्यासाठीं सुद्धां करूं."

त्या दिवशीं दुपारीं वारें सुसाट सुटलें होतें. ऑर्व्ह पतंगाची दोरी हातांत धरून उभा होता, तोंच एका जोराच्या वाऱ्यानें ती त्याच्या हातांतून जवळ जवळ हिसकावूनच नेली.

"हें बघ, विल," ऑर्व्ह गालांतल्या गालांत हंसत म्हणाला. "आपल्या दोघांनाहि आकाशांत उचलून नेईल एवढा मोठा थोरला पतंग नाहीं का रे आपल्याला करतां येणार?"

"येईल कीं," विल्बरनेंहि हंसतच उत्तर दिलें. पण मग त्याचें हंसणें थांबलें. "त्यांत काय आहे! एक दिवस आपण तेंहि करूं."

"पतंगाला लोंबकळत हवेंत तरंगायचं. काय गंमत असेल नाहीं?" ऑर्व्हला न राहवून तो म्हणाला.

"– हं, पांखरासारखं." विलनें त्याला साथ दिली.

"पण पांखरांना तर पंख असतात." ऑर्व्हनें शंका काढली.

"आपण आपल्यासाठींहि पंख तयार करूं," विल्बर ती शंका खोडून काढीत म्हणाला. "पतंग हेच आपले पंख. एक दिवस ऑर्व्ह ... एक दिवस ..."

★ ★ ★

/

प्र क र ण पां च वें

# चला, पतंग उडवूं या !

राइट-बंधूंना त्या वर्षभर उसंत नव्हती. त्यांनीं आपला पहिला पतंग बनविला.

पहिल्यानें त्यांनीं पतंगाच्या सांगाड्याची आकृति काढली. तो हलका तर व्हायला हवा होताच पण बळकटहि हवा होता. हलकें लांकूड मिळवणें कांहीं फारसें अवघड नव्हतें. त्यांनीं वाण्याकडून कांहीं जुनीं अंड्यांचीं खोकीं मागितलीं. त्या वाण्याला तर बरेंच झालें; त्याची खोकीं सांभाळण्याची कटकट आपोआपच मिटली.

आतां ऑर्व्ह व विलपाशीं त्यांची आकृति तयार होती व त्यांना हवें तसें हलक्या जातीचें लांकूडहि मिळालें होतें. तरी पण अजून एक अडचण होतीच. बहुतेक पतंगाच्या उभ्या-आडव्या काड्या डिंकानें चिकटवलेल्या त्यांनीं पाहिल्या होत्या. एखाद्या वेळीं पतंग झाडांत अडकला कीं, या काड्यांचा डिंक सुटून जात असे. म्हणून त्यांनीं या काड्या पक्क्या एकत्र जखडून रहाण्यासाठीं डिंकाबरोबरच ताराहि वापरण्याचें ठरविलें. जरीपुराणवाले कामोडी त्यांना नेहमीप्रमाणें मदत करायला तयार होतेच; त्यांनीं त्यांना पियानोची जुनी तार दिली. ती हलकी होती पण तशीच चांगली बळकटहि होती.

तेवढ्यांत त्या मुलांच्या डोक्यांत आणखी एक कल्पना आली. दुकानांतून मुलें विकत घेत त्यापेक्षां मोठा पतंग बनवायचें त्यांनीं ठरविलें. पण त्यासाठीं लांकूड कोणतें वापरायचें ? लहान पतंगांना अंड्यांच्या खोक्यांचें लांकूड ठीक होतें; परंतु त्यापेक्षां मोठ्या वस्तूंसाठीं तें पुरेसें बळकट नव्हतें; आणि तबेल्यांतलें लांकूड त्या दृष्टीनें फार अवजड होतें.

पुन्हा या वेळींहि त्यांच्या आईनेंच त्यांची ही अडचण दूर केली. श्वार्ट्झ नांवाच्या म्हाताऱ्या जर्मन गृहस्थानें डेटनमध्यें एक फर्निचरचें दुकान उघडलें

होतें. राइटबाईंनीं आपल्या कोठीच्या खोलींतलें एक कपाट त्याला दुरुस्त करायला सांगितलें होतें आणि त्यानें तें फारच सुंदर करून दिलें होतें. त्यामुळें श्वार्ट्झची प्रशंसा राइटबाईंनीं तिच्या ओळखीच्या अनेक लोकांपाशीं केली होती; कांहीं लोकांनीं त्याच्याकडून कामहि करून घेतलं होतें. श्वार्ट्झला राइटबाईंच्यामुळें अशीं पुष्कळ गिन्हाइकें मिळालीं म्हणून तो त्यांचे मोठे उपकार मानीत असे.

राइटबाई आपल्या चौदा वर्षांच्या विलला व दहा वर्षांच्या ऑर्व्हला बरोबर घेऊन श्वार्ट्झच्या दुकानीं आल्या. मुलें त्यांना काय करायचें आहे तें सांगत होतीं. तें त्यानें सारें गंभीरपणें ऐकून घेतलें.

" आपण तर बुवा कधीं पतंग तयार नाहीं केलेला, " श्वार्ट्झ म्हणाला. " पण मला वाटतं तुम्हांला हलकं पण न फुटणारं लांकूड हवं आहे. मीं तुम्हांला कांहीं बांबू देऊं शकेन पण मला वाटतं ते सहज वांकून जातील. समजा, सुरुवातीला तुम्ही स्प्रुस ( सदा हिरवें असणारें झाड ) वापरून बघितलंत तर ? "

श्वार्ट्झनें त्यांना दोन पतंगांना पुरेसें स्प्रुसचें लांकूड दिलें. मुलें लागलींच घरीं आलीं व कामाला लागलीं. सांगाडा तयार करायला त्यांना फार वेळ लागला नाहीं; आणि मग त्यांनीं त्यावर चिवट कागद चढविला.

जवळपास कोणी नसतानाच त्यांना आपल्या या नव्या पतंगाचा प्रयोग करून पहायचा होता. म्हणून ते दुसऱ्या दिवशीं सकाळीं सहा वाजतांच थोरल्या टेकडीवर जाऊन पोंहोचले. वारा वहात होता त्यामुळें पतंग एकदम उंच आकाशांत चढला. नंतरहि तो सारखा वरवर चढतच राहिला; पण अखेर वारा एकदम पडला आणि पतंगानें तडक खालीं एका झाडावर झेप घेतली.

विल झाडावर चढला नि पतंगाचा उरलेला सांगाडा खालीं घेऊन आला. वरच्या चिवट कागदाच्या तर चिंध्या झाल्या होत्या. पतंगाच्या सांगाड्याची मोड-तोड इतकी झाली होती कीं, तो दुरुस्त करण्याचा विचारहि करतां येण्यासारखा नव्हता.

" बरं झालं, एड नि इतर मुलं इथं नव्हतीं, " ऑर्व्ह उदासपणें म्हणाला. " ते आपल्याला हंसले असते. "

" आपलं कांहीं चुकलं का रे ? " निराश झाल्यासारखा विल बोलत होता .

" आपली आकृति चुकली असली पाहिजे, " ऑर्व्हनें म्हटलें. " नाहीं तर पतंग बरोबरच व्हायला हवा होता. "

विल्नें मुंडी हालविली. " बरंय्, ऑर्व्ह आपण शाळा सुटल्यावर दुसरी एक आकृति काढूं या. "

दुपारीं त्यांनीं आपली पहिली आकृति काळजीपूर्वक तपासून बघितली. त्यांत तर कांहींच चूक आढळत नव्हती.

" पण काय रे, पतंग खालीं कशामुळं कोसळतो ? " ऑर्व्हनें विचारलें.

" मला कांहीं नक्की माहीत नाहीं, " विल आपल्याशींच विचार करीत होता. " पण वारा कांहीं सारखाच जोरानं वहात नाहीं. वारा जोराचा होता तेव्हां पतंग उंच राहिला होता, नाहीं का रे ? "

" खरं आहे, " ऑर्व्हनें म्हटलें.

" मग वारा पडला तशी पतंगानं खालीं उडी घेतली, " विल सांगूं लागला. " त्याला वारा पुरेसा नव्हता म्हणून त्यानं तशी उडी घेतली असली पाहिजे. खरं म्हणजे वारा पडला होता तरी अगदींच कांहीं बंद झाला होता असं नव्हे. "

" वारा फारसा नसला तरी एखादा पक्षी सरळ भरारी मारूं शकतो, " ऑर्व्हनें माहिती दिली.

" मला वाटतं, वारा थोडासा असला तरी सुद्धां तो आपल्या पंखांत भरून घेतां यावा असेच पक्ष्यांचे पंख बनविलेले असतात, " विलनें सांगितलें. मग चटकन् आपलें डोकें वर करीत तो म्हणाला, " ऑर्व्ह तेंच कारण असलं पाहिजे. आपल्या पतंगाला पुरेसा वारा मिळत नव्हता. पण कारण काय बरं ? "


" कारण ... कारण पतंगाचा पोट-पट्टा फारच घट्ट होता, " ऑर्व्ह म्हणाला.

त्या वेळचीं मुलें उडवीत ते पतंग आज मुलें उडवतात तसलेच असत. या प्रत्येक पतंगाला एक पोट-पट्टा आणि गांठी दिलेल्या कापडाचें शेपूट असायचें.

" असं असलं पाहिजे, " विलच्या अंगांत आतां उत्साह संचारला होता. " पोट-पट्टा घट्ट असल्यामुळं पतंग शिडाप्रमाणं फुगून आंत वारा सांठवून घेऊं शकत नसेल. वारा खूप असतो तेव्हां कांहीं प्रश्न नाहीं, पण वारा पडलेला असला म्हणजे पतंगाला तरंगत ठेवण्यासारखं तिथं कांहींच असत नाहीं. "

" तर मग आपण आतां पोट-पट्टा थोडा वाढवून बघूं या, " ऑर्व्हनें सुचविलें. लगेच ते स्वयंपाकघरांतल्या मेजावर वांकले. आणि त्यांनीं अधिक लांब पोट-पट्टा असलेली आकृति काढली.

“ विल, ” ऑर्व्ह विचारीत होता, “ पतंगाच्या शेपटीचा रे काय उपयोग ? ”



“ मला वाटतं त्यामुळं पतंगाचा तोल सांभाळला जातो, ” त्यानें आपली कल्पना बोलून दाखविली; मात्र त्याला त्याबद्दल खात्री नव्हती.

“ मीं असं बघितलं आहे कीं वारा अगदीं कमी असला म्हणजे कित्येक वेळां पतंग वर चढतच नाहीं. त्याचं कारण — मला वाटतं शेपूट फार अवजड असल्या-मुळं असं होत असावं. ”

“ बरोबर बरोबर. ” विल्लाहि तें पटलें. “ माझी कल्पना आहे कीं, खूप वारा असला तर खूप लांब शेपूट लागतं अन् वारा अगदींच कमी असला कीं, शेपूट जवळ जवळ नसलं तरी चालतं. आतां आपण आपला पतंग तयार करतांना एकदां लांब शेपूट लावून व मग आंखूड शेपूट लावून प्रयत्न करूं या हं. ”

सुदैवानें त्यांच्यापाशीं दुसरा पतंग बनविण्याइतकें स्प्रुसचं लांकूड शिल्लक होतं. यावेळीं त्यांनीं पोट-पट्टा अधिक लांब ठेवला.

मराठी ग्रंथ ... स्थूलपत.
अनुक्रमांक 24808 वि
808 ना. दि. 3/3/५6



दुसऱ्या दिवशीं सकाळीं सहालाच ते थोरल्या टेकडीवर जाऊन हजर झाले. आज वारा जोराचा होता, पण तो संथ वहात नव्हता. तो मधेंच सोसाट्यानें वाहूं लागे, मधेंच कमी होई. त्यामुळें पतंग वर ठीक चढला तरी वर गेल्यावर तो सारखा इकडून तिकडे, तिकडून इकडे असा भरकटत होता. त्याला स्थिरता नव्हती.

" बघ, बघ, " ऑर्व्ह म्हणाला, " पतंग कसा शिडासारखा फुगतो आहे. "

" त्याचं कारण, पोट-पट्टा आतां पुरेसा लांब आहे. वारा पडला तरी, असेल तेवढा थोडा सुद्धां वारा पतंग आपल्या पोटांत सगळा भरून घेतो आणि त्यामुळं तो वरच तरंगत रहातो. मी सांगतों, आपल्याला आतां मैलभर सुद्धां उंच पतंग उडवतां येईल, " विल्नें आवेशानें सांगितलें.

" आज दुपारींच बघूं या आपण तें करून, " ऑर्व्ह म्हणाला.

दुपारीं सगळी बाल्चमू थोरल्या टेकडीवर जमली.

नवा पतंग दुसऱ्या कोणत्याहि पतंगापेक्षां अधिक वर चढला. तिथून तो खालीं कोसळला नाहीं; तो फक्त वरच्यावर आळसटपणानं पोहत होता ! सर्वच मुलांना त्याची मोटी मौज वाटली. त्या प्रत्येकाला विल्नें आपला नवा पतंग एकेकदां उडवायला दिला.

" तुम्हांला कांहीं याचा व्यापार करायचा नसेल ? " आल जॉनस्टननें विचारलें.

विल्नें ऑर्व्हकडे पाहिलें. त्या दोघांनींहि थोडा वेळ विचार केला. आल जॉनस्टन काय म्हणत होता त्याबद्दल त्यांनीं विचारहि केलेला नव्हता.

" तसं नाहीं, " विल्बर म्हणाला, " पण आम्ही हा पतंग विकणार आहोंत. "

" केवढ्याला ? " आलनें विचारलें.

" वीस सेंटना. " विल्बरनें किंमत सांगितली, पण त्याला विक्रीची फारशी आशा दिसली नाहीं.

आल जॉनस्टननें थोडा वेळ विचार केला. शाळा सुटल्यावर घरोघरीं वाणजिन्नस नेऊन पोंहोचविल्याबद्दल त्याला आठवड्याला पन्नास सेंट मिळत. पण घरगुती पतंगासाठीं वीस सेंट घालविणें त्याच्या जिवावर आलें होतें.

" परवां तूं घेतलास त्याला तर चाळीस सेंट पडले, " विल्बरनें त्याला आठवण दिली. " अन् तोहि कांहीं मोठासा चांगला नव्हता. "

आलनें मुंडी हालविली; कारण तें खरेंच होतें.

" बरंय् , मी घेतों तो पतंग, " तो म्हणाला, " पण मला शनिवारपर्यंत पैसे नाहीं मिळणार. "

" मग आम्ही थांबूं तोंवर, " विलनें सांगितलें. " हा घे तुझा पतंग आल."

त्यानंतर त्यांनीं किती तरी पतंग बनविले. मग त्यांनीं कांहीं मोठ्या वावड्या तयार केल्या, पण त्यासाठीं चिवट कागदाऐवजीं कापड वापरलें. त्या उडाल्या खूप उंच, पण त्या तयार करतां करतां दोघे भाऊ अगदीं मेटाकुटीला आले.

एक दिवस ऑर्व्हच्या डोक्यांत एक कल्पना चमकली. " आपण दोन पतंग एकदम उडवले तर ? " तो विलला म्हणाला, " एक वर गेला कीं दुसरा त्याच्या दोरीला बांधायचा. बघूं तर खरं काय होतं ते. "

" बरं तर. " विल हो म्हणाला खरा, पण त्याला खात्री नव्हती.

प्रत्यक्षांत मात्र हा प्रयोग फारच सुंदर वठला. जवळ जवळ अर्धी दोरी वर सोडून दिल्यानंतर त्यांनीं दुसरा पतंग तिला बांधला. तोहि वरवर चढत गेला. ऑर्व्ह दोरी धरून उभा होता.

" विल, जोर बघितलास का केवढा आहे याला ! " ऑर्व्हचा उत्साह ओसंडून जात होता. " अरे, धरून ठेवायलाहि किती कठीण जातो आहे. "

विलनें पतंगाची दोरी हातांत धरली. ऑर्व्ह म्हणत होता तें अगदीं खरें होतें. ऑर्व्ह दोरी अधिकाधिक सोडीतच होता. आतां दुसराहि पतंग आकाशांत खूप उंच चढत होता.

" अरे, हा तर जवळ जवळ मला वरच उचलून घेतो आहे. " ऑर्व्ह हंसत होता. " " एक दिवस आपण असा पतंग तयार करूं कीं, तो आपल्याला वर उचलूनच घेऊन जाईल ... ... "

मग आणखी एक गंमत झाली. ती जुनी दोरी या दोन पतंगाच्या जोरदार ओढीपुढें टिकाव धरण्यासारखी नव्हती. वरच्या बाजूला कुठें तरी दोरी तुटली आणि एखाद्या पक्ष्यासारख्या स्वच्छंद होऊन दोन्ही वावड्या आकाशांत भिरभिरत निघाल्या. विल व ऑर्व्ह यांच्या दृष्टीस त्या पुन्हां कधींच पडल्या नाहींत.

* * *

प्रकरण सहावें

# विल्बरचा आजार

नव्या नव्या वस्तु बनविण्याच्या उद्योगांतच विल व ऑरव्ह सारा वेळ घालवीत असत असें नाहीं. विल्बर आतां प्रशाळेंत (हायस्कूल) गेला होता. त्या शाळेनें नुकतीच व्यायामशाळाहि सुरू केली होती. व्यायामशाळेंत आडव्या मलखांबासारखा एक खांब बसविला होता; आणि विलचा बराचसा वेळ या मलखांबावर कसरत करण्यांत जात असे. त्या आडव्या मलखांबावर कसरत करण्याचा उद्योग करतां करतां ओळीनें पन्नास वेळां त्याच्यावर उड्या मारल्या तरी विल आतां दमेनासा झाला. त्याचे हातपाय चांगले बळकट होते त्या दृष्टीनें.

असें करतां करतां सहा महिने गेले. तेवढ्या अवधींत विलनें आडव्या मलखांबावरच्या 'राक्षस-उडी'चा चांगलाच सराव केला. ही राक्षस-उडी म्हणजे — प्रथम मलखांबाला लोंबकाळायचें, पुरेशी गति येईपर्यंत मागें-पुढें मागें-पुढें याप्रमाणें झोके घ्यायचे आणि मग जो एकदां झोका घ्यायचा त्यांत सबंध मलखांबा-भोंवतीं प्रदक्षिणा पुरी करायची. त्याच्या व्यायामशिक्षकांनीं त्याला 'डबल-बार'ची गोडी लावायचा प्रयत्न केला, इतर व्यायामाचा नाद लावायचा यत्न केला पण विलचें लक्ष त्या 'राक्षस-उडी'शिवाय दुसऱ्या कशांतच ठरेना.

"ऑरव्ह, उडत उडत जाण्यासारखं वाटतं यांत," तो म्हणायचा.

विल्बर दिवसानुदिवस चांगलाच काटक होत चालला होता. त्या काळांत बसगाड्या नव्हत्या. (हेन्री फोर्ड नांवाच्या माणसानें 'बिनघोड्याची गाडी' बनवायला नुकतीच सुरुवात केली होती.) अर्थातच विल व ऑरव्ह दोघांनाहि पायींच शाळेंत जावें लागत असे. दोन मैल जायचें दोन मैल यायचें अशी ही दररोजची पायपिटी असे. पण त्या नित्याच्या चालण्यामुळें त्यांच्या तंगड्या मात्र चांगल्या तगड्या झाल्या होत्या.

विल्बर प्रशाळेंत नवीनच होता तरी पायचेंडूच्या चमूंत तो तेवढ्यांत चांगलाच चमकला होता. हिंवाळ्यांतला त्याचा खेळ म्हणजे हॉकी. शाळेजवळच्या गोठलेल्या तळ्यावर शाळेची चमू विविध खेळ खेळायची. एक दिवस त्याच्या शालेय चमूचा दुसऱ्या एका चमूशीं सामना झाला. ही दुसरी चमू तेथून जवळच असलेल्या लष्करी ठाण्यांतील अधिकाऱ्यांच्या मुलांची होती. हा सामना चांगलाच कडवा व कठीण झाला. त्यांत दोन्ही चमूंची बरोबरी झाली होती; आणि विल्बरनेंच आपल्या चमूच्या बाजूनें गोल केला होता.

विरुद्ध चमूंतील एका मुलानें आपल्या हॉकीस्टिकनें चेंडू पकडींत धरला. तें पहातांच विल्बरनें सरळ चढाई करून तो दूर भिरकावला. तेव्हां चेंडू पकडण्यासाठीं भयंकर झिम्मड पडली. दुसऱ्या एका लष्करी मुलानें चेंडूवर विलक्षण जोरानें झेप घेतली. चेंडूवरचा त्याचा नेम चुकला, पण त्याच्या काठीनें नेमका विल्बरच्या दाभाडाचा वेध घेतला. विल्बर झिंगल्यासारखा क्षणभर तिथेंच उभा राहिला. आणि दुसऱ्याच क्षणीं त्याच्या कवळींतून पांच दात गळून बाहेर पडले. खेळ थांबला. सुदैवानें एक लष्करी डॉक्टर तो सामना पहात उभे होते. ते विल्बरपाशीं धांवले.

"बाळ, फारच लागलं तुला," ते म्हणाले.

"ना – फारसं नाहीं लागलं." पण विल्बरचें हें वाक्य पुरें होतें न होतें तोंच तो, एखादें झाड उन्मळून पडावें तसा, बेशुद्ध होऊन खालीं कोसळला.

विल्बरला घरीं आणलें व त्याला बिछान्यावर झोपविलें. पेनिसिलिन आणि सल्फानिलामाइड यांचीं नांवेंहि त्या काळीं माहीत नव्हतीं. जखमेवर खूपसें आयोडिन ओतायचें नि जखम बरी होईल म्हणून वाट पहात बसायचें, एवढेंच डॉक्टरचें काम. पण या नेहमींच्या उपचाराचा कांहींच उपयोग विल्बरला झाला नाहीं. त्याच्या दुष्ट जखमा चिघळल्या; आणखी तीन दांत काढून टाकावे लागले. विल्बरला नळींतून केवळ पातळ अन्नच कित्येक आठवडे घालावें लागत होतें. त्यानंतर डॉक्टरनीं त्याला अंडीं व पाव खायला परवानगी दिली; पण कांहीं चमत्कारिक कारणामुळें हें अन्नहि त्याला मानवलें नाहीं. त्यामुळें त्याला पोटदुखी झाली आणि हृदयहि अशक्त झालें. आतां बहुधा हा जन्मभरचाच पंगू होऊन रहाणार असें दिसूं लागलें.

विल्ची आई, वडील व ऑर्व्ह हीं आळीपाळीनें त्याच्या बिछान्यापाशीं बसून असत. वडिलांनीं फिरतीवर जाण्याचें सोडलें. ते मुलाच्या बिछान्यापाशीं त्याच्याशीं बोलत बसत आणि विल तें शांतपणें ऐकत राही. खरें सांगायचें तर आपल्या वडिलांना तो आतां पहिल्यानेंच ओळखूं लागला होता. विलनें वडिलांना विचारलें कीं, "तुम्ही धर्मोपदेशक कसे झालांत?" त्यावर त्यांनीं इतकेंच म्हटलें कीं, "कांहीं जणांकडे ही कामगिरी येऊन पडते – कांहीं जणांकडे येत नाहीं, इतकेंच!"

विल्बर पडल्या पडल्या विचार करीत असे – वडिलांनीं देवाबद्दल नि धर्माबद्दल काय सांगितलें त्यासंबंधीं. वडिलांना विचारण्यासारख्या नव्या नव्या प्रश्नांवर तो मनांतल्या मनांत विचार करी. एखादी गोष्ट डोळे मिटून खरी मानण्याचें त्याला किंवा ऑर्व्हलाहि कधींच मानवत नसे. त्यांचा नेहमीं प्रश्न असायचाच, "कां?" अखेर विलनें आपल्या वडिलांना सांगून टाकलें कीं, आपण बरे झालों कीं, तुम्हांला तुमच्या कामांत शक्य ती मदत करणार; जमल्यास आपण धर्मोपदेशकहि होणार. त्याचे वडील मोठे शहाणे होते. त्यांनीं डोकें हालविलें नि हंसून म्हटलें, "बाबा रे, आपल्यापैकीं प्रत्येकाच्या शिरावर देवानें कांहींना कांहीं कामाची जबाबदारी टाकलेली आहे. तूं किंवा ऑर्व्हिल यांपैकीं कोणी धर्मोपदेशक व्हावं असं देवाच्या मनांत असेल असं मला तर कांहीं वाटत नाहीं. तुमच्यासंबंधीं त्याच्या काय योजना असाव्यात कांहीं सांगतां येत नाहीं; तरी पण त्या मोठ्या असल्या पाहिजेत."

विल्बर अंथरुणांत उठून बसण्याइतका जेव्हां बरा झाला तेव्हां त्याच्या वडिलांनीं त्याच्यासाठीं लांकडांतील खोदकामाच्या व चित्रकलेच्या साहित्याचा संच आणला. विल्बरला कोण आनंद झाला! आतां त्याच्यापाशीं त्याच्या स्वतःच्या नाजुक, धारदार पटाश्या होत्या आणि सुंदर टिसूळ लांकूड पण होतें. त्या लांकडांतून तो हवे ते आकार कोरूं शकत होता. लांकडाच्या कोरीव कामाच्या साहित्यांत एक पुस्तकहि आलेलें होतें. त्या पुस्तकांत मॅपल, स्प्रुस, ॲश (तिकडील झाडांच्या जाती) इत्यादि अनेक प्रकारच्या लांकडांसंबंधीं पुष्कळच माहिती सांगितलेली होती. त्यांतलीं कांहीं इतरांपेक्षां हल्कीं होतीं तर कांहींच्या अंगीं न मोडतां फुटतां वांकण्याचा गुण होता. कांहीं लांकडें वजनानें हल्कीं पण त्या मानानें जाडजूड असलेल्या दुसऱ्या लांकडांपेक्षां किती तरी पटींनीं बळकट होतीं. हॉकीच्या सामन्यांत घायाळ होऊन पडला नसता तर विल्बरच्या वांट्याला हें सारें ज्ञान कशाला आलें असतें!

एक दिवस ऑर्व्ह आंत आला.

" बरं का रे विल!"

" काय रे?"

" आईसाठीं आपण एक खुर्ची तयार करूं या, " ऑर्व्ह उत्साहातिरेकानें म्हणाला. " तूं आकृति काढ नि मी बाहेर तबेल्यांत त्यावरुन खुर्ची तयार करतों. मात्र हें गुपित ठेवायचं हं."

हें बहुधा नेहमीं असेंच घडत असे. पहिली कल्पना चमकायची ती ऑर्व्हच्या डोक्यांत. मग विलनें त्यावर विचार करायचा, त्याचें महत्त्व अजमावून बघायचें आणि नंतर त्या दोघांत त्याबद्दल सविस्तर बोलणें व्हायचें.

आपल्या आईला कसली खुर्ची आवडेल याची त्यांना कल्पना होती. तशाच खुर्चीची आकृति त्यांनीं काढली. खराखरा ड्रॉइंगपेपर, चित्रकलेसाठीं लागणाऱ्या पेन्सिली, फूटपट्टी, इतकेंच नव्हे तर वर्तुळें काढायला कंपास सुद्धां चित्रकला-साहित्याच्या संचांतून हातीं आला होता. विल त्यानेंच सराव करीत होता. त्यामुळें त्यानें काढलेली आकृति एखाद्या कसलेल्या चित्रकाराला शोभण्यासारखीच होती.

पुढलें मेहनतीचें काम ऑर्व्हला करायचें होतें. त्यासाठीं त्यानें तबेल्याकडे धूम ठोकली. विल बिछान्यांत बसल्या बसल्याच त्या कामाचें मार्गदर्शन करीत होता. खुर्ची तयार करायची म्हणजे कांहीं सोपें काम नव्हतें. बैठकीच्या लाकडाला चार गोल भोकें पाडणें हें पहिलें काम. या चार भोकांत चार पाय बसवायचे. मुलांचें नशीब जोरावर होतें. त्यांच्या वडिलांपाशीं एक सामता ( Brace ) होता व त्याला सर्व प्रकारचीं फळें ( Bits ) होतीं. त्यांतलें एक फळ $\frac{3}{8}$ इंचांचें होतें. आणि ऑरव्हच्या हातीं जुन्या झाडूच्या दोन मोठ्या काठ्या आल्या त्याहि होत्या बरोबर $\frac{3}{8}$ इंची जाडीच्या. या काठ्यांचे पाय खुर्चीला अगदीं बरोबर बसले.

ऑर्व्हनें लगेच श्वार्ट्झचें दुकान गांठलें. त्याला थोडा सरस 'उसनवार' हवा होता. सरस लावून तो चांगला वाळतांच भक्कम खुर्ची तयार झाली. नंतर त्यांनीं तिला एक पाठ बसविली आणि ऑरव्हनें तिला रंगहि दिला. आणि दुसऱ्या दिवशीं सकाळींच जेव्हां आई स्वयंपाकघरांत न्याहारीचे जिन्नस तयार करण्यासाठीं म्हणून आली तेव्हां ती खुर्ची तिच्या दृष्टीस पडली. तिच्या मुलांनीं तिला दिलेली ही पहिलीच भेट. तशा त्यांनीं आजवर तिला नाताळच्या नि वाढदिवसांच्या भेटी दिल्या नव्हत्या असें नाहीं; तरी पण ही अगदीं वेगळयाच

प्रकारची भेट होती. ही खुर्ची मुलांनीं स्वतःच्या हातांनीं बनविलेली होती आणि त्याबद्दल तिला अभिमान वाटत होता.

विल्बरची प्रकृति सुधारली होती तरी अजून तो अंथरुणांत पडूनच होता. लांकूड-कोरकामाच्या साहित्याचा संच त्याच्या हातीं आला होता आणि ऑर्व्ह-बरोबर त्याचें नेहमींच कांहीं ना कांहीं काम चालू होतें, तरी विल्बरला तें पुरेसें नव्हतें. पडल्या पडल्या त्याचें वाचनहि खूप होत होतें. आतांपर्यंत शाळेच्या पुस्तकां-व्यतिरिक्त त्याचें वाचन फारसें नव्हतेंच. आतां त्याला वाचन हा एक नवा उद्योग 'सांपडला'. पुस्तकांच्या आनंदाची खुमारी काय असते हें त्यानें आतां अनुभवलें. त्याचें अतिशय आवडतें पुस्तक म्हणजे – 'रॉबिनसन क्रूसो'. कां बरें? कारण, बिचारा रॉबिनसन क्रूसो त्या बेटावर उतरला तेव्हां त्याच्यापाशीं कोणतीच वस्तु नव्हती. सारें कांहीं त्याला आपल्या हातांनीं बनवून घ्यावें लागलें. पहिल्यानें तराफा, मग झोपडी, लवकरच कामाचीं हत्यारें, इतकेंच नव्हे तर, कपडेहि त्याचे त्यानेंच तयार केले. अशा वस्तु स्वतःच्या स्वतः बनविण्याचें कसब त्याच्या अंगीं नसतें तर बिचाऱ्यावर मरून जाण्याची पाळी आली असती.

विल मागें रेलून आपल्याच तंद्रींत कांहीं कांहीं कल्पना करीत बसे. आपण व ऑर्व्ह जहाज फुटून एका ओसाड बेटावर लागलों आहोंत. पण आपल्याला वेगवेगळ्या वस्तु हातानें करतां येत असल्यामुळें आपलें कांहीं नडलें नाहीं; आपण व ऑर्व्ह मोठे प्रसिद्ध पुरुष होणार आहोंत अशीं स्वप्नेंहि त्याला पडत; पण अर्थात् हीं स्वप्नें खरीं ठरतील असें त्यानें प्रत्यक्षांत मानलें नव्हतें. त्याला काय माहीत त्या वेळीं कीं स्वप्नेंहि साकार होऊं शकतात. त्यासाठीं त्यांना फक्त थोडा हातभार लावावा लागतो इतकेंच.

ऑर्व्ह क्वचितच कांहीं वाचीत असे. दुसऱ्या लोकांच्या कल्पनांबद्दल वाचीत बसायला त्याला आवडायचें नाहीं. त्याच्याशीं त्याच्या त्याच्या स्वतःच्या कल्पना होत्या; आणि त्यांच्याच मागें तो असायचा. आणि पुस्तकें वाचायला लागलें तर निरनिराळ्या वस्तु तयार करायला वेळ कोठून उरणार? उदाहरणार्थ, त्यानें व एड साइन्सनें भागीदारींत एक धंदा सुरू केला होता. त्यांनीं एक छोटासा छापखाना विकत घेतला होता. ग्रामर स्कूलमध्यें ते दोघेहि आतां पदवीच्या वर्गांत होते. त्यांनीं 'मिड्गेट' नांवाचें एक शालेय वर्तमानपत्र काढायचें ठरविलें. 'मिड्गेट'

हेंच त्यांच्या छोट्या छापखान्याचेंहि नांव होतें. – छोट्या म्हणजे किती छोट्या, सिगारेटच्या पेटीएवढ्या !

तरी पण त्यांचें काम चालू झालें. त्यांनीं आपल्या शाळूसोबत्यांविषयीं लिहिलें, त्या मजकुराची खिळेजुळणी स्वतःच केली आणि 'मिड्‌गेट' प्रसिद्ध झालेंहि. बाकी सगळें झालें; पण कागद व शाई यांसाठीं पैसे पडत होते. त्यांनीं एक शक्कल काढली. वाणी, खाटीक, जरीपुराणवाला कामोंडी आणि इवांट्झ यांना त्यांनीं आपल्या पत्रांत जाहिराती द्यायला सांगितलें. अशा एका जाहिरातीचा दर त्यांनीं ठेवला पंधरा सेंट. त्यांनीं ज्यांना ज्यांना विचारलें त्या सर्वांनीं 'मिड्‌गेट'साठीं जाहिराती दिल्या. अर्थात् त्या छोट्याशा छापखान्यावर छोटासाच कागद छापला जात असे.

" जरा थांब, एड. विल चांगला बरा होऊं दे," ऑर्व्ह सांगत होता. " आपण स्वतःच एक छापखाना तयार करूं – मोठा छापखाना. "

" वेड लागलंय् तुला, " एड साइन्स त्यावर म्हणाला.

" आम्हीं घसरगाडी बनविली, पतंग केला अन् खुर्ची सुद्धां तयार केली," ऑर्व्हनें सांगितलें, " आम्ही कोणतीहि वस्तु करूं शकतों. तूं जरा वाट पहा तर खरी. "

विल्बर आतां घरांतल्या घरांत उठून चालण्याइतका बरा झाला; पण त्याला शाळेची चार मैलाची ये-जा झेपण्यासारखी नव्हती. त्या मानानें तो फारच अशक्त झालेला होता. त्यामुळें त्याच्या आईवडिलांनीं त्याला शाळेंत पाठवायचें नाहीं असेंच ठरविलें.

धर्मोपदेशक राइट हे 'ख्रिश्चन कॉन्झर्वेटर' या धार्मिक साप्ताहिक वृत्त-पत्राचे संपादक होते. त्यांनीं विल्बरला काम द्यायचें ठरविलें. त्याचें काम म्हणजे साप्ताहिकाचे अंक छापखान्यांत तयार झाले कीं, त्याच्या घड्या घालून ते पाकिटांत टाकणें. राइट मोठे लोकप्रिय होते आणि त्यांचें साप्ताहिक वाचण्याची गोडी अनेक लोकांना लागलेली होती. पण विल्बरला हे सारे अंक घड्या घालून पाकिटांत टाकायचे म्हणजे फार जिकीर व्हायची. फार वेळ लागायचा त्या कामासाठीं त्याला. अखेर ऑर्व्ह त्याच्या मदतीस आला, पण त्याला तें काम अगदींच कंटाळवाणें वाटलें.

" आपल्याला एक घड्या घालण्याचें यंत्र बनविलं पाहिजे, " एक दिवस ऑर्व्ह म्हणाला.

" घड्या घालण्याचं यंत्र तर आपण कधीं ऐकलं नाहीं बुवा," विलनें म्हटलें.

" मी तरी कुठं ऐकलं आहे," ऑर्व्ह म्हणाला. " पण मी सांगतों, आपण तयार करूं कांहीं तरी ... "

" स्वार्ट्झच्या दुकानांत एक 'लेथ' आहे," विल जरा विचार करीत म्हणाला. " तो पायानं चालवितां येतो. आपण असं केलं तर ... "

" अरे, या छापखान्याच्या मागल्या अंगाला खूप जुनं लोखंडी मोडसामान पडलं आहे," ऑरव्हनें सांगितलें. " त्यांत मला कांहीं 'रोलर्स' हि दिसले. आपण जर ... "

त्या रात्रीं ते दोघेहि पुन्हां स्वयंपाकाच्या मेजावर रेललेले दिसले. दोघांनीं मिळून काम करायची त्यांना आतां संवयच पडून गेली होती. नव्या नव्या 'झटपट' कल्पना ऑरव्हनें पुढें आणून टाकाव्यात आणि विलनें त्यांत कांहीं ना कांहीं उणीव दाखवून द्यावी असेंच बहुधा चालायचें. पण जर का तशी कांहीं चूक विलला दाखवितां आली नाहीं तर मात्र ती कल्पना प्रत्यक्षांत आणण्यासाठीं त्यांची खटपट सुरू व्हायची. हळूहळू चित्रफलकावर एक चमत्कारिक दिसणारें यंत्र आकाराला येऊं लागलें. ही कामगिरी त्यांनीं आजवर केलेल्या कामगिरींत सर्वांत अवघड होती. कारण त्यांना आतां धातूशीं काम करावयाचें होतें. तरी पण तीन आठवड्यांतच तेथें तें यंत्र उभें राहिलें. अर्थात् त्यांना मिळालेल्या वेगवेगळ्या भागांनींच तें तयार केलेलें होतें.

त्या मुलांनाच फक्त तें चालवितां येत असे. विल पायानें सारखा पंप करीत राही आणि ऑरव्ह यंत्रावर कागद लावीत राही. आणि मधूनच कागद व्यवस्थित घड्या घालून बाहेर आला नाहीं किंवा बरोबर आकारांत आला नाहीं कीं ते गोंधळल्यासारखे पहात रहात !

वडील तें पाहून तर आश्चर्यचकितच झाले. या वृत्तपत्रांच्या घड्या घालायला विल्बर व ऑर्व्हिल यांना हातानें साधारणपणें दोन दिवस लागत. हें गमतीदार यंत्र तेंच काम फक्त दोन तासांत उरकून टाकी !

राइट आपल्या दोन मुलांकडे गंभीरपणानें पहात होता. " विल, तूं जेव्हां आजारी होतास," ते बोलूं लागले, " तेव्हां तुला मी म्हटलं होतं कीं, तुझ्यासाठीं व ऑर्व्हसाठीं देवाच्या मनांत कांहीं तरी मोठ्या योजना असल्या पाहिजेत. आतां

माझ्या लक्षांत आलं आहे कीं, त्याच्या मनांत काय असावं तें. तुम्ही संशोधक व्हावं असं त्यानं योजलं आहे. मानवजातीच्या उपयोगी पडतील अशा नव्या नव्या गोष्टी तयार करण्यांतच तुमचं यापुढलं आयुष्य जायचं आहे."

"आम्ही कोणतीहि गोष्ट बनवूं शकतों," ऑर्व्ह आत्मविश्वासानें म्हणाला. "छापखाना सुद्धां."

"प्रत्येकच गोष्ट आपल्याला करतां येईल असं नाहीं," विलनें त्यावर दुरुस्ती केली. "पण आजवर कोणीहि न केलेल्या अशा गोष्टी आम्ही जरूर करून पाहूं."

"आम्ही असा एक पतंग तयार करणार आहोंत कीं तो आम्हांला आकाशांत उंच उचलून घेऊन जाईल," ऑर्व्ह म्हणाला.

"अरे पण – तुम्ही मुलं आहांत, पांखरं नव्हेत कांहीं!" त्यांचे वडील हंसत उद्गारले.

"ऑर्व्ह म्हणतो तें खरंच आहे, बाबा," विल्बरनें पुन्हां सांगितलें. "एक दिवस आम्ही उडून सुद्धां दाखवूं; खरोखरच उडून दाखवूं."

* * *

प्रकरण सातवें

# हेलिकॉप्टर : आकाशयान

राइट जवळजवळ प्रत्येक वेळीं फिरतीवरून परत येतांना मुलांसाठीं कांहीं ना कांहीं वस्तु बक्षीस म्हणून आणीत. त्यांत विल्बरसाठीं बहुतकरून एखादें पुस्तक असायचें. केटच्या बाहुल्यांच्या संग्रहांत एखादी नवी बाहुली येऊन पडायची. ऑर्व्हिलच्या आवडीनिवडी मात्र थोड्या मुलखावेगळ्या असायच्या. त्याला खेळांतल्या शिपायांचा छंदच लागलेला होता. त्याच्यापाशीं क्रांतियुद्धांतील व यादवी युद्धांतील शिपायांचे संचच्या संच जमलेले होते. या आपल्या सेना जमिनीवर उभ्या करून तो 'लढाई' खेळत असे. पण अलीकडे मात्र शिपायांनीं खेळण्याइतका तो 'बाळ' राहिला नव्हता. ऑर्व्हिलच्या आवडीची वस्तु आणायची म्हणजे राइटना जरा डोकेंच खाजवायला लागायचें.

एक वेळ फिरतीवरून परततांना त्यांनीं एक नवीन प्रकारचें खेळणें आणलें. ऑर्व्हिल आतां खेळण्यांशीं खेळण्याइतका लहान राहिला नसला तरी, हें खेळणें अगदीं वेगळ्या प्रकारचें होतें. त्याचें नांव होतं 'हेलिकॉप्टर' ( आकाशयान ). बांबूच्या कामट्यांवर चिवट कागद चिकटवून तयार केलेली ती एक नवीनच वस्तु होती. त्याच्या दोन बाजूंना दोन विचित्र दिसणाऱ्या गोष्टी जोडलेल्या होत्या. आगनावेला असतात तसल्या पंख्यासारख्याच अगदीं त्या दिसत होत्या. हे 'पंखे' गुंडाळून ठेवतां येत होते व त्यासाठीं त्या प्रत्येकाला रबरी धागा बांधलेला होता.

"चला, आपण तें बाहेरच फिरवून बघूं," राइट पत्नीकडे पहात म्हणाले.

तें नवें खेळणें बघून त्यांना हर्ष होण्यापेक्षां दोघे भाऊ बुचकळ्यांतच अधिक पडले होते. या नव्या खेळण्याचें काय करायचें हेंच त्यांना उमजत नव्हतें. ते आपले मुकाटपणीं वडिलांच्या मागोमाग घराबाहेर आले. वडिलांनीं ते दोन्ही 'पंखे'



गुंडाळले आणि खेळणें सोडून दिलें. लगेच त्या खेळण्यानें हवेंत चांगलें पंधरा फूट उड्डाण केलें आणि नंतर तें खालीं आलें.

"हें तर उडणाऱ्या वटवाघळासारखं दिसतंय्," ऑर्व्हिल ओरडला.

"शेपटाशिवायचा पतंग दिसतोय् हा," विल उद्गारला. त्याला तर अत्यानंद झाला होता.

" तें काय आहे तें नाहीं मला माहीत," वडील म्हणाले. " मात्र मी असली वस्तु पूर्वी कधीं पाहिलेली नाहीं. याला म्हणतात हेलिकॉप्टर."

" ही-ली-कॉप्ट-अर," ऑर्व्हिल हळूहळू पुटपुटला.

" हा ग्रीक भाषेंतून आलेला शब्द आहे," वडील सांगूं लागले. " 'हेलिको' ( Helico ) म्हणजे नागमोडी आकाराचें कांहीं तरी; आणि 'टेरॉन' ( pteron ) म्हणजे पंख."

एवढ्या वेळांत विलनें तें छोटें खेळणें पुन्हां गुंडाळलें सुद्धां होतें. पुन्हां एकदां तें त्याच्या हातांतून एखादा पक्षी सुटावा तसें सुटलें; फक्त एवढेंच कीं, तें एकदम वर उडालें. ऑर्व्हिल व विल्बर मोठे चौकस होते. इतर कोणी मुलें असतीं तर असल्या खेळण्याकडे पाहून म्हणालीं असतीं, " किती वेगांत जातं हें! किती उंच उडतं हें!" पण ऑर्व्ह व विल यांनीं स्वतःला एकच प्रश्न केला, " हें कशामुळं चालतं?" त्या खेळण्याच्या दोन लहान लहान पंख्यांचीं पातीं वेगवेगळ्या दिशांना फिरतात हें त्यांच्या लक्षांत येऊन चुकलें. तें मोठें चमत्कारिक होतें.

" जेव्हां ही वस्तु सरळ वर जाते तेव्हां ती हवेंत भोक पाडीत असली पाहिजे," विल्बर म्हणाला.

ऑर्व्हनें मान हालवीत म्हटलें, " किंवा ती नुसती हवा बाजूला सारीत असेल; जसा बोटीचा पंखा पाणी बाजूला सारतो तशी."

त्यांनीं तें खेळणें सोडवलें, पुन्हां जोडलें आणि पुनः पुन्हां उडवून बघितलें. त्यांना कोडें पडलें होतें तें खेळणें सरळ वर कां जातें याचें. तोच प्रश्न त्यांना थोडा सतावीत होता. एखादा पक्षी किंवा पतंग हळूहळू वर चढतो तसें हें नाहीं जात? अर्थात् ते स्वतःला जे हे प्रश्न विचारीत होते त्या प्रश्नांचीं उत्तरें त्या काळचे बडे बडे वैज्ञानिक-शास्त्रज्ञहि शोधीत होते. त्यामुळें हे दोघे मुलगे गोंधळांत पडले यांत कांहीं नवल नव्हतें. अखेर एक दिवस तें छोटेसें खेळणें एकदम उंची घेऊन दारांतल्या मोठ्या झाडाच्या फांदीवर जाऊन आदळलें; आणि त्या मुलांना तें पुन्हां कांहीं दुरुस्त करतां आलें नाहीं. तरी पण तें 'हेलिकॉप्टर' त्यांच्या डोक्यांतून मात्र कधीं गेलें नाहीं.

त्यानंतर दुसऱ्या कोणी तरी तसलेंच एक खेळणें बनविलें होतें. परंतु या दोघां भावांपैकीं कोणालाच त्याचें विशेष महत्त्व वाटलें नाहीं किंवा खरें म्हणजे दुसऱ्या कोणी तयार केलेल्या कोणत्याच गोष्टीबद्दल त्यांना फारशी पर्वा नव्हती.

स्वत: बनविलेल्या गोष्टींकडेच त्यांचें लक्ष असे. त्यांचे वडील त्यांना उत्तेजन देत. आपल्या या दोन्ही मुलांत कांहीं तरी विशेष आहे असें त्यांना वाटे खरें. राइट-बाईनाहि तसेंच वाटत असे. जेव्हां इतर आया त्यांना विचारीत, "मुलगे काय करताहेत, राइटबाई? आमच्या मुलांत कुठं दिसत नाहींत ते कधीं?" तेव्हां राइटबाई गुपीत हंसल्यासारखें हंसून म्हणत, "असतील कुठं तरी तबेल्यांत कुडमुडत!"

मुलगे खरोखरीच तबेल्यांत कुडमुडत होते. ऑर्व्हनें एड साइन्सला सांगितलें होतें कीं, तो व विल दोघे मिळून एक खराखुरा छापखाना बनविणार आहेत. मोठा छापखानाहि छोट्या छापखान्यासारखाच चालतो. विल्बर व विल यांनीं छोटा छापखाना कसा चालतो तें काळजीपूर्वक पाहिलेलें होतें. आणि आतां तबेल्यांत ते त्या छोट्या छापखान्याच्या वीसपट मोठा छापखाना तयार करीत होते.

कार्मोडीचा जुना बाजार म्हणजे यांना खरोखरी सोन्याची खाणच सांपडली होती. त्यांत पडलेल्या नाना तऱ्हेच्या वस्तूंकडे कोणी ढुंकूनहि पहात नव्हतें; आणि विल व ऑर्व्ह तसल्या गाडाभर वस्तु घरीं घेऊन गेले तरी कार्मोडींना त्याचें कांहींच वाटत नव्हतें. उदाहरणार्थ, तिथें एक जुनाट लोखंडी 'रोलर' पडला होता. पूर्वी एका शेतकऱ्याकडच्या यंत्रांतला तो एक भाग होता. मुलें तो घरीं घेऊन आलीं; त्याचा सारा गंज त्यांनीं खरवडून काढला, तो चांगला घांसून गुळगुळीत केला. आणि त्यांच्या छापखान्याचा एक भाग बनला. मग ते आसपास खूप हिंडले. त्यांना एक मोठा सपाट दगडी पाटा छपाईसाठीं टाइप ठेवण्याकरितां हवा होता. आणि अखेर तोहि त्यांना मिळाला.

त्यांना छापखान्यापैकीं तयार न करतां आलेली वस्तु म्हणजे टाइप. तो मात्र विकतच आणायला हवा होता आणि त्याला पडत होते सुमारें पंधरा डॉलर्स. त्या दोघांत त्यांनीं सुमारें दहा डॉलर्स सांठविले होते; उरलेले पांच डॉलर्स त्यांच्या आईनें त्यांना उसनवार दिले.

छापखाना तयार करण्याचा उद्योग ऑर्व्ह व विल यांना नवीन असला तरी, ती कल्पना जुनीच होती. हजार वर्षांमागें चिनी लोकांनीं मुद्रणकलेचा शोध लावलेला होता. १४५४ पर्यंत युरोपांत मुद्रणकला फारशी प्रचारांत आलेली नव्हती. त्यानंतर जॉन गटेनबर्ग नांवाच्या जर्मन माणसानें आपल्या छापखान्यांत 'बायबल' छापलें; आणि आतां आपण सर्वसाधारणपणें असें म्हणतां कीं, मुद्रणकलेच्या

शोध जॉन गटेनबर्गनें लावला. खरें म्हणजे त्यानें शोध लावला नाहीं; त्यानें त्यांत सुधारणा केली. मात्र सुट्या चलित खिळ्यांनीं ( टाइप ) पुस्तक छापणारा हा पहिलाच माणूस.

तो भला थोरला, पण विचित्र दिसणारा छापखाना उभा झाला. विल्बर व ऑर्व्हिल यांनीं तयार केलेला हा छापखाना बराचसा गटेनबर्गच्या छापखान्या-सारखाच दिसत होता. कांहीं म्हटलें तरी, त्याचें तत्त्व सारखें सारखेंच होतें. खिळे जुळवून त्यांनीं तो एका सपाट दगडी पाट्यावर ठेवला. ( याला इंग्रजींत 'बेड' म्हणतात ). खिळ्यांना शाई लावली, त्यावर एक कागद ठेवला आणि मग त्यावरून रूळ ( रोलर ) फिरविला. शाई लागलेल्या खिळ्यांचा ठसा कागदावर उमटला. हेंच त्यांतलें तत्त्व होतें. अर्थातच अशा रीतीनें एखाद्या मजकुराच्या पुष्कळ प्रति काढायच्या म्हणजे फारच वेळ लागे, कारण रूळ हातांनीं फिरवावा लागत असे.

पण यानें विल्बर व ऑर्व्ह यांचें कांहीं समाधान झालें नाहीं. त्यांनीं त्याला एक पाय-फिरकें ( Foot-Treadle ) बसविलें. त्यांनीं आईचें शिवणाचें यंत्र बघितलेलें होतें; तें कसें चालतें तें त्यांच्या चांगलें ध्यानांत आलें होतें. तिचा पायफिरक्यावरचा किंवा यंत्राच्या पायठणीवरला उजवा पाय पंपासारखा वरखालीं हाले व त्यामुळें तें खूप वेगानें सारखें वरखालीं होई. हातानें कपड्याला टीप घालायची म्हणजे तिला याच कामाला तास सुद्धां पुरला नसता. शिवणाचें यंत्र हें काम केवळ पांच मिनिटांत करून टाकी.

आणि म्हणून त्यांनीं आपल्या छापखान्याला एक पायफिरकें बसविलें. त्या रूळाला पुल्या लावल्या. आणि तें पायफिरकें खालींवर हालवूं लागतांच तो रूळ सारखा मागें-पुढें, मागें-पुढें असा फिरूं लागला. विल्बर पायफिरकें हालवीत राही आणि ऑर्व्ह त्या सपाट पाट्यावर कागद लावण्याचें ( याला इंग्रजींत 'फीडिंग' म्हणतात ) काम करी. तो छापलेला कागद बाहेर काढून त्या खिळ्या-वर घेई आणि रूळ पुन्हां परत येण्यापूर्वीं दुसरा कागद त्या खिळ्यांवर सरकवून देई. खिळ्यांना शाई लावण्याकरितां मात्र मुलांना मधूनमधून सारखें थांबावें लागे.

अखेर छापखाना पुरा तयार झाला. तो प्रत्यक्ष काम देऊं लागला. पण छापायलाच कांहीं नसेल तर, छापखाना असून काय करायचें ?

* * *

प्रकरण आठवें

# ‘वेस्ट साइड न्यूज’

“विल, आपल्याला एक साप्ताहिक काढायला हवं,” ऑर्व्हिल म्हणाला.

“पण पैसे कुठून आणायचे?” विल्बर उदासपणें बोलला. त्याचे वडील आतां ‘पॅसिफिक किनाऱ्याचे बिशप’ झाले होते. त्यामुळें त्यांना घरीं राहून आपलें धार्मिक साप्ताहिक चालविणें शक्य नव्हतें; त्यांना आतां सारखें फिरतीवर रहावें लागणार होतें. विल आणि ऑर्व्ह यांना हा चांगलाच धक्का बसला होता. कारण वडिलांच्या वर्तमानपत्राच्या घड्या घालण्यासाठीं त्यांपैकीं प्रत्येकाला आठवड्याला दोन डॉलर मिळत असत ते आतां बंद झाले होते.

“आपल्यापाशीं वर्तमानपत्र असलं तर, आपण जाहिराती मिळवूं. शाळेंत असतांना एड व मी शालेय वृत्तपत्र असंच चालवीत असूं,” ऑरव्ह म्हणाला. “यांतून आपल्याला पैसा मिळेल.”

“पण सुरुवातीला शाई व कागद विकत घ्यायला तर पैसा हवा. आपल्याला आतां जुना झालेला टाइपहि बदलला पाहिजे,” विल्बरनें सांगितलें.

“आतां कांहीं आईकडून मागतां येणार नाहींत पैसे,” ऑरव्ह म्हणाला. “अजून तिचे मागचेच पांच डॉलर्स राहिले आहेत परत द्यायचे.”

“लोकांचं वाणसामान घरोघर नेऊन पोंचविण्याचं काम मला मिळूं शकेल,” विलनें सांगितलं. “आणि तूं व एड साइन्स मोडसामान गोळा करायला जात जा.”

“सारा उन्हाळाभर खूप कष्ट घेतले तर, निदान तीस डॉलर्स तरी आपल्यापाशीं जमले पाहिजेत,” ऑरव्हचें म्हणणें होतें. “पण तुला डॉक्टरनीं कष्टाचें काम करतां कामा नये म्हणून बजावलेलं आहे.”

"नुसतं वाणसामान पोंचवायचं त्यांत कसले आले आहेत कष्ट ?" विल्बरनें म्हटलें.

"डॉक्टरनीं सांगितलं आहे कीं, तुला जड ओझीं उचलून चालणार नाहीं," ऑर्व्हनें खुलासा केला. "मी सांगतों तुला, विल, तूं काम पत्कर. मी तुझ्या-बरोबर कामाला येईन. आपला तो जुना गाडा आहे ना तोच घासूनपुसून त्याला वंगण घालूं या. त्यांतून आपण लोकांचं वाणसामान पोंचवूं."

आणि त्यांनीं तसेंच केलें. त्या दोघां भावांचें एकमेकांवरील प्रेम स्वर्गेस्वर्गीच अलौकिक होतें. एड साइन्स किंवा इतर मुलें त्यांना आवडत नसत असें नव्हे; पण ते दोघे एकत्र असणें यांत त्यांना कांहीं वेगळाच आनंद मिळे. त्यांचें जें कांहीं बोलणें चाले तें इतरांना कळतहि नसे. गाडा ओढतां ओढतां त्यांच्या अनेक विषयांवर गप्पा चालत. त्यांनीं लहानपणीं तयार केलेला पतंग, आईनें शिकविलेला तो शब्दप्रयोग 'वातविरोध,' तें गमतीदार उडतें खेळणें — हेलिकॉप्टर, नवीनच दिसूं लागलेल्या दुचाक्या, असे किती तरी.

"आपल्यालाहि एखादा दिवस दुचाक्यांची एखादी जोडी तयार करतां येईल," ऑर्व्ह गंभीरपणें म्हणाला. दुचाक्या म्हणजे मोठी खर्चाची गोष्ट होती. (जुन्या घ्यायच्या म्हटलें तरी सुद्धां). त्यामुळें त्यांच्या वडिलांना त्यांच्यासाठीं एखादी दुचाकी घेणं शक्य झालेलें नव्हतें.

"आपलं वर्तमानपत्र एकदां सुरू होऊं दे, तोंवर थांब," विल म्हणाला. "त्या वेळीं आपल्याला वर्तमानपत्राचे अंक वांटायला दुचाकी लागेलच. तोंपर्यंत आपण दुचाकीचं जुनं सुटं सामान पहात रहायला हरकत नाहीं. त्यांतून एखादी दुचाकी उभी रहाण्याइतकंहि सामान एखाद वेळीं मिळून जायचं."

मग ते तसल्या सामानावर लक्ष ठेवूं लागले. पहिल्यानें त्यांना दुचाकीचा एक जुना सांगाडा मिळाला. मग पुढचें चाक मिळालें, तें दुरुस्त करून घेतां येण्यासारखें होतें. हँडलचे दांडे मिळाले तेहि सरळ करून घेण्याजोगे होते. लवकरच या सगळ्या सामानाचा तबेल्यांत ढीग झाला. एक दिवस दुचाकी बनवायला पुरेसें सामान तेथें आतां जमल्यासारखें होतें.

दरम्यानच्या काळांत त्यांनीं शहरांतल्या लोकांना लोणी, अंडीं, पाव, पीठ आणि भाजीपाला इत्यादि सामान घरोघर नेऊन पोंचवायला सुरुवात केली. हीं "बिशपची मुलें" आतां प्रत्येकाच्याच परिचयाची झालीं होतीं. तीं सभ्य होतीं,

दिसायला जराशीं गंभीरच होतीं. कधीं उगीचच हंसणें-खिदळणें नाहीं कीं वायफळ बडबड नाहीं.

" आपण जेव्हां वर्तमानपत्र सुरू करूं, " विल्बर सांगत होता, " तेव्हां शहरांतल्या लोकांबद्दलच्या गोष्टी आपल्याला त्यांत छापाव्या लागतील. तेव्हां आतांपासूनच आपण डोळे उघडे ठेवून पहात राहिलं पाहिजे. सारं कांहीं लक्षांतहि ठेवलं पाहिजे. "

ब्राउन नांवाच्या शेतकऱ्याकडे ते वाणसामान नेऊन पोंचवीत, तेव्हां त्याच्या घरीं त्याच्या कोंबडीनें घातलेल्या अंड्यांच्या अफाट संख्येबद्दलचें बोलणें मुलांच्या कानावर येई, किंवा त्यानें नवीनच आणलेल्या बैलाबद्दल तरी त्यांना कांहीं ऐकायला मिळे. महापौरांच्या मुलीला डांग्या खोकला झाल्याचें त्यांना समजे, तर शहरांत एखादें नवें कुटुंब येऊन राहिल्याचाहि सुगावा त्यांना लागे. दर आठवड्याला त्यांना पगार मिळे. हे पैसे आणून ते आपल्या वडिलांच्या मेजाच्या खणांत ठेवीत. त्या उन्हाळ्यांत विल व ऑर्व्ह यांना आईबरोबर किंवा बहिणी-बरोबर फारसें कोठें सहलीला जातां आलें नाहीं, कीं इतरहि कांहीं मजा करतां आली नाहीं; पण त्याचें त्यांना कांहींच वाटलें नाहीं. साप्ताहिक वृत्तपत्र सुरू करण्यासाटीं पुरेसा पैसा जमविणें हेंच एक त्यांच्या डोळ्यासमोर होतें. आणि उन्हाळा संपला तेव्हां त्यांच्यापाशीं तसा पुरेसा पैसा जमलाहि.

आतां त्यांना साप्ताहिक सुरू करायला कांहीं अडचण नव्हती. त्यांनीं आतां-पर्यंत ऐकलेल्या साऱ्या गोष्टी लिहून काढल्या. तो सारा मजकूर खिळयावर ( टाइप ) जुळविला. केटहि त्यांना मदत करूं लागली. तसेंच एड साइन्सला त्यांनीं आपला भागीदार करून घेतलें. ' वेस्ट साइड न्यूज ' हें त्यांच्या साप्ताहिकाचें नांव होतें. पहिला अंक ज्या दिवशीं त्यांच्या छापखान्यांतून बाहेर पडला त्या दिवशीं त्या सगळ्यांच्या छात्या अभिमानानें भरून आल्या.

एकवीस वर्षांचा विल्बर त्या पत्राचा संपादक होता; आणि सतरा वर्षें वयाचा ऑर्व्हिल त्याचा व्यवस्थापक होता. ऑर्व्ह आपलें नवें वृत्तपत्र घेऊन शहरांतील प्रत्येक व्यापाऱ्याकडे गेला आणि बहुतेकांनीं त्याच्या पत्रासाटीं नियमित-पणें जाहिराती देण्याचें कबूल केलें.

साप्ताहिकाचे दर आटवड्याला शंभर अंक निघत. एड साइन्स व आणखी एक-दोन मुलें ते घरोघर नेऊन टाकीत. आतां विल्बर व ऑर्व्ह पुन्हां आनंदांत

होते. ते स्वतः कांहीं तरी तयार करीत होते. ते वृत्तपत्र तर काढीतच होते पण शिवाय छापखान्याशीं त्यांचा कांहींना कांहीं उद्योग सुरूच असायचा. तो अधिक सुधारण्यासाठीं त्यांची धडपड चालू असायची.

खिळे हातांनींच जुळवावे लागत त्यामुळें त्यांना फार श्रम पडत. नाताळच्या दिवसांत मुलांना कांहीं वेळां मिळणाऱ्या चिमुकल्या छापखान्यासारखेंच हें खिळे जुळविण्याचें काम असे. ऑरव्हिलचीं बोटें मोठीं चपळ व अचूक असत. त्यामुळें तो विलपेक्षां किंवा केटपेक्षां ( केटला ते कित्येकदां मदतीला घेत ) भराभर खिळे जुळवी. तसें म्हणायचें तर ऑरव्हिल सर्वच बाबतींत चपळ होता.

हें नवें साप्ताहिक सर्वांच्याच आवडीचें झालें. लोक तें विकतहि घेऊं लागले. पहिल्या वर्षाच्या अखेरीलाच साप्ताहिकाचा खप तीनशेंवर गेला आणि आठवड्याला साधारणपणें पंधरा डॉलर्सचा नफा राइट-बंधूंच्या पदरांत पडूं लागला. अर्थातच विल व ऑरव्ह यांनीं पैन् पै सांठवून ठेवली.

फावल्या वेळांत दुचाकी ‘बनविण्याचें’ त्यांचें काम चालूच होतें. खरें म्हणजे ते कांहीं दुचाकी ‘बनवीत’ नव्हते; जुनें जमविलेलें सामान व कांहीं नवीन विकत आणलेले सुटे भाग त्यांनीं एकत्र जुळविले आणि त्यांतून त्यांच्या मालकीची एक दुचाकी तयार झाली. ती नवी नव्हती कीं झकपकहि नव्हती. जुने घातलेले भाग कधीं हा तर कधीं तो असे मोडून पडतच. तरी पण ते पुन्हां दुरुस्त करून यांची दुचाकी चालूच राही. दुचाकीच काय दुसरें कांहींहि ते दुरुस्त करूं शकत होते.

‘ वेस्ट साइड न्यूज ’चा हुषार व्यवस्थापक ऑरव्हिल याच्या डोक्यांत एके दिवस एक कल्पना आली.

“ चर्च एखादं पत्रक छापून घेतं किंवा दुकानदार आपल्या मालाच्या विक्रीची जाहीर सूचना प्रसिद्ध करतो, ” ऑरव्ह सांगूं लागला, “ तेव्हां त्यांना ती छपाई करून घ्यायला एखाद्या मोठ्या छापखानदाराकडेच जावं लागतं. हीं लहानसहान छपाइकामं ( जॉब ) आपणहि कां नाहीं करूं शकणार ? ”

“ आहे खरी कल्पना, ” विल्बरनें त्याला दुजोरा दिला. “ आपल्या छापखान्याला आठवड्यांतून फक्त दोनच दिवस काम असतं. तूं जरा इकडेतिकडे हिंडून बघ आपल्यासाठीं असं काम मिळतं का. ”

ऑर्व्हिलनें अशा कामासाठीं मोठे छापखानदार किती दर घेतात तें समजावून घेतलें. आणि तो ज्या त्या व्यापाऱ्याला सांगत सुटला कीं, हेंच काम विल्बर तुम्हांला फक्त निम्म्या दरांत करून देईल. आतां मात्र त्यांना खरोखरीच उसंत मिळेना. कारण आपापलीं कामें जास्तींत जास्त स्वस्त दरांत करून घेण्याची व्यापाऱ्यांची साहजिकच धडपड होती. या जादा कामामुळें त्यांची – विल व ऑर्व्ह यांची – आठवड्याची प्राप्ति पंचवीस व कधीं कधीं तर तीस डॉलरपर्यंतहि जाई. त्यांतून ते पुष्कळच बचत करीत. वर्षभरांत त्यांनीं जवळ जवळ हजार डॉलर्स मागें टाकले.

पण हळूहळू त्यांची साप्ताहिकांतील गोडी कमी होऊं लागली. कां बरें? कारण, त्याचें सगळें काम म्हणजे गोष्टी गोळा करायच्या, तो मजकूर खिळ्यांनीं (टाइपांनीं) जुळवायचा, त्याची छपाई करायची आणि छापलेले अंक वांटून टाकायचे. तसें तें काम फारच सोपें होतें. सुरवाती-सुरवातीला त्यांत त्यांना मजा वाटली. कारण त्या कामांत श्रम खूप पडत होते आणि दुसरें म्हणजे वारंवार नादुरुस्त होणारा छापखाना त्यांना दुरुस्त करायला मिळत होता. त्यांचा खरा आनंद वस्तु दुरुस्त करण्यांत किंवा नवीन वस्तु बनविण्यांत असायचा.

एड साइन्सची दुचाकी मोडली कीं ती दुरुस्त करण्यांत यांना कोण आनंद! तेंच त्यांच्या खरें आवडीचें काम होतें. नेहमींप्रमाणेंच, याहि वेळीं आपल्या-जवळचा पैसा घालून एक दुचाकीचें दुकान उघडण्याची कल्पना ऑर्व्हिल याचीच होती.

"दररोज अधिकाधिक दुचाक्या रस्त्यावर दिसूं लागलेल्या तूं पहातच असशील, विल," ऑर्व्ह म्हणाला. "रस्ते कमालीचे खराब आहेत, त्यामुळं दुचाकीवाले जातां येतां नेहमीं आदळतात. त्यांच्या दुचाक्यांच्या ताड्या (स्पोक्स) तुटतात, एखाद वेळीं तर चाकेंहि मोडून बसतात."

"छान कल्पना आहे, ऑर्व्ह," विल सावकाश म्हणाला. "आपण आपलं साप्ताहिक एडला विकून टाकूं या आणि मेनस्ट्रीटवर एक दुकानाची जागा भाड्यानं घेऊं या."

"मी ती केव्हांच घेऊन टाकली आहे," ऑर्व्ह थंडपणें उत्तरला. "मला माहीतच होतं तुला ही कल्पना आवडेल म्हणून."

विल्बर हंसूं लागला. एखादी नवी कल्पना घेऊन ती पुढें सारणें हें ऑर्व्हच्य स्वभावांतच होतें.

" आपल्याजवळं रगड हत्यारं आहेत," ऑर्व्ह म्हणाला. " तीं आपण दुकानांत घेऊन जाऊं. जुन्या सामानाला तर आपल्याकडे तोटाच नाहीं."

" तूं तर सारं कांहीं अगोदरच योजून ठेवलेलं दिसतं आहे," विल्बरनें म्हटलें.

" हो तर," ऑर्व्ह खुषींत येऊन म्हणाला; " कांहीं दिवसांत आपण दुचाक्या तयार सुद्धां करून विकूं."

" आपल्या दुकानाचं नांव काय बरं ठेवायचं?" विलनें विचारलें. ऑर्व्हच्या डोक्यांत याचाहि विचार आगाऊच झालेला असणार अशी त्याची खात्रीच होती.

" दि राइट सायकल कंपनी," ऑर्व्हिल अभिमानपूर्वक उद्गारला.

* * *

प्रकरण नववें

# दि राइट सायकल कंपनी

विल्बर आणि ऑरव्ह यांनीं पहिली गोष्ट कोणती केली असेल तर ती म्हणजे ' राइट सायकल कंपनी ' अशा नांवाचे चांगल्या ठसठशीत टाइपांत पत्रांचे कागद, पाकिटें इत्यादि छापून घेणें. त्याखालीं असें म्हटलें होतें :

विल्बर राइट , *अध्यक्ष*

ऑरव्हिल राइट, *उपाध्यक्ष*

डेटनमधील बहुतेक लोकांपाशीं जुन्या पद्धतीच्याच दुचाक्या होत्या. त्या दुचाक्यांचें पुढलें चाक मोठें व मागील चाक लहान असायचें. त्यांना रोधक (ब्रेक्स) नसत किंवा चिखलरक्षक (मडगार्ड्स) मुद्धां नसत. भरीव रबरी चाकें (टायर्स) लावलेलीं असायचीं त्यांना. पण अलीकडेच एक नवीन प्रकारची दुचाकी बाजारांत आली होती. तिचीं दोन्ही चाकें सारख्या आकाराचीं होतीं. या नव्या दुचाकीचीं चाकें अलीकडल्या दुचाकीच्याप्रमाणें म्हणजे पंपानें हवा भरतां येण्यासारखीं होतीं.

विल व ऑरव्ह यांनीं या नव्या प्रकारच्या दुचाक्या बनावणाऱ्या स्प्रिंग-फील्ड (मॅसॅच्युसेट्स संस्थानांतील) येथील कंपनीला कळविलें कीं, त्यांचें प्रतिनिधित्व करण्याची आपली इच्छा आहे. ती कंपनी बडी होती. तिच्या व्यवस्थापकानें जेव्हां राइट बंधूंचें पत्र वाचलें तेव्हां त्याच्याहि मनावर मोठा चांगला परिणाम झाला. तें पत्र कोणा तरी चांगलें बस्तान बसलेल्या व्यापाऱ्यांकडून आलेलें असलें पाहिजे असा त्या व्यवस्थापकाचा समज झाला. लगेच त्यानें उत्तर लिहून कळविलें कीं, ' राइट सायकल कंपनी 'ला आपण आपल्या कंपनीच्या दुचाकीचे सुटे भाग विकायला संमती देत आहोंत.

याच सुमारास डेटनमध्यें कोणा सद्गृहस्थानें एक ‘ दुचाकी मंडळ ’ स्थापन केलें. दर शनिवार-रविवारीं या मंडळातर्फे सर्व वयांचीं मुलें दुचाक्यांवरून लांबलांबच्या सहलीला निघत. आणि ही मंडळी परत आली कीं, बहुधा कोणा ना कोणाच्या दुचाकींत कांहीं ना कांहीं बिघाड झालेला असायचाच आणि तो दुरुस्त करायला हवाच असायचा.

विल्बर आणि ऑर्व्हिल यांची जोडी या वेळीं तिथें हजर असायची. दुचाक्यांचे सुटे भाग व दुरुस्तीचीं हत्यारें यांनीं ते सज्ज असायचे. त्यांनीं यापूर्वींच त्यांचा दोस्त एड साइन्स याच्याकडून एक जुनी दुचाकी खरेदी केली होती व नवें सामान टाकून ती दुरुस्त केली होती. इतकेंच नव्हे तर आणखी दोन नव्या चाकांची तींत भरहि घातली होती.

एक दिवस स्वतःच्याच दुचाकीचें कांहीं काम करीत असतां असतांच ऑर्व्हिल एकदम उद्गारला, “ माझ्या डोक्यांत एक कल्पना आली आहे बघ. ”

“ तुझ्यापाशीं कल्पनांना काय तोटा ! ” विल्बर हंसत म्हणाला.

“ विल, मी ह्या आपल्या दुचाकीवर बसून पाहिलं आहे, ” ऑर्व्हिल सांगूं लागला, “ पण सांगूं का तुला ? ”

“ काय रे ? ” विलनें विचारलें.

“ पण ही जुनी दुचाकी आसपासच्या इतर दुचाक्यांपेक्षां अधिक वेगानं पळते. फार काय आल स्टीवर्टपाशीं अगदीं नवी दुचाकी आहे ना, पण तिच्यापेक्षांहि ही जोरानं जाते. आल तसा माझ्याहून तीन वर्षांनीं तरी मोठा आहे, पण शर्यतींत मी त्याला मागं टाकीन, माझी खात्री आहे. कां माहीत आहे का तुला ? ”

विलनें नकारार्थी मान हालविली.

“ कारण आपण एडची जुनी दुचाकी घेऊन ती सोडवली आणि तिचा भागन् भाग अगदीं स्वच्छ केला, ” ऑर्व्हिल सांगत होता. “ मग तिला आपण नवं सामानहि टाकलं. आपल्या दुचाकीचा प्रत्येक भाग कसा स्वच्छ नि चकचकीत दिसतो: याचं कारण आपण ते सँडपेपरनं चांगले घासून त्यांना चकाकीहि ( पॉलिश ) केली आहे. तुला आठवतं, आई आपल्याला ‘घर्षणा’बद्दल मागं सांगत असे ? यावरून माझ्या असं लक्षांत आलं आहे कीं, तुमच्या दुचाकीचा प्रत्येक भाग स्वच्छ ठेवा कीं तुमच्या दुचाकीचा वेग वाढलाच; कारण त्यामुळं घर्षण कमी होतं. ”

अनुक्रमांक २७५८०८ दि ...
क्रमांक ...८७८... नों॰ दि॰ ३/३/५८

" तुझ्या डोक्यांत आणखीनच कांहीं तरी घुमतं आहे असं दिसतं, ऑर्व्ह. " ऑर्व्हच्या डोक्यांत एखादी कल्पना आली व ती प्रत्यक्षांत आणण्यासारखी असली कीं विल्बरला त्याची आगाऊच कल्पना यायची.

" हं, सांगतों तर, " ऑर्व्ह सांगू लागला, " मला वाटतं दुचाकीच्या शर्यतींत आसपासच्या कोणालाहि मी मागं टाकीन. तेव्हां आपण एखाद्या शनिवारीं एक दुचाकी-शर्यत लावू आणि मी त्यांत भाग घेतों. मी जर शर्यत जिंकली तर बाकीच्या साऱ्या लोकांनाहि माझ्या दुचाकीसारखीच दुचाकी हवीशी वाटेल. "

" बरं मग ? " विल्बरनें विचारलें.

" इतकं नाहीं लक्षांत आलं ? अरे, आपणच त्यांना दुचाक्या विकूं ! " ऑर्व्ह विजयाच्या हर्षानें म्हणाला, " नव्या दुचाकीला शंभर डॉलर्स पडतात. एवढी किंमत देऊन आपल्या मुलांना दुचाकी विकत घेण्याची ऐपत असलेले हाताच्या बोटावर मोजण्याइतकेहि लोक या शहरांत नाहींत. आपण मात्र शहरांतील साऱ्या जुन्या, मोडक्या दुचाक्या खरेदी करूं; अन् माझी अशी खात्री आहे कीं, फार फार तर पांच डॉलर देऊन सुद्धां आपल्याला अशा हव्या तितक्या जुन्या दुचाक्या मिळतील. त्यांचे सांगाडे, नव्या पद्धतीचीं 'टायर्स' व चाकं ( बॉल-बेअरिंग असलेलीं ) यांचा उपयोग आपण करूं. त्यांवर रंगाचा एक छानसा हात दिला कीं, त्याच दुचाक्या अशा चकाकायला लागतील कीं, त्यासाठीं खिशांतून तीस डॉलर्स काढून द्यायला कोणीहि राजी होईल. "

" कांहीं वाईट नाहीं कल्पना, " विल म्हणाला. " पण त्यासाठीं प्रथम तुला कांहीं शर्यती जिंकायला पाहिजेत; मग बाकीचं पुढलं सारं ! "

" मी त्याच्या सरावाला आतां लगेच सुरुवात करणार आहे, " ऑर्व्हनें सांगितलें. " दररोज सकाळीं पांच मैल दुचाकीवरून दौड करून यायचं मी ठरविलं आहे; आणि एकदां तयारी झाली कीं शर्यतीची योजना केलीच म्हणून समज. शहरांतल्या लोकांनाच या शर्यतींत पहिल्या येणारांना बक्षिसं द्यायला लावूं आपण. सुरुवातीचं बक्षीस आपलं. एक कोरी करकरीत ( दुचाकीच्या ) हत्याराची पेटी. अशीं सगळीं दुरुस्तीचीं हत्यारं असलेली सुंदरशी पेटी कसल्याहि दुरुस्तीसाठीं लोकांना हवीशी वाटणारच. आणि त्याच्या जोडीला वाटलं तर एक पंप सुद्धां. "

" म्हणजे या एवढ्या वस्तूंना जवळ जवळ दहा डॉलर्स पडतील, " विल्बर थंडपणें म्हणाला. " आणि हें जरा जडच वाटतं. "

" पण तूं एक गोष्ट विसरलास, विल, " ऑरव्ह धूर्तपणानें म्हणाला.

" काय बरं ? " विल्नें गोंधळून विचारलें.

" अरे, मी पहिलं बक्षीस पटकावणार आहे, हें तुझ्या लक्षांतच नाहीं, " ऑरव्हनें शांतपणें सांगितलें.

दुसऱ्याच दिवसापासून ऑरव्हचा दुचाकीच्या शर्यतीसाठीं सराव सुरू झाला. सकाळीं सहाला उठून स्वारी दुचाकी घेऊन निघायची ती सरळ शहराबाहेर जायची. खडबडीत, खराब सडकेवरून पांच मैल पाय मारीत दुचाकी दामटायची म्हणजे कांहीं सोपी गोष्ट नव्हे; पण ऑरव्हनें चिकाटी सोडली नाहीं. आणि हळूहळू त्याच्या तंगड्या त्या कामाच्या दृष्टीनें चांगल्याच तयार झाल्या.

त्या काळच्या दुचाक्यांचें हँडल अलीकडच्याप्रमाणे आपल्याला हवें तसें खालीं किंवा वर सरकवितां येत नसे. एक दिवस विल्बरनें बघितलें तों ऑरव्ह दुचाकीवर वांकून हँडल जोडलेला उभा लोखंडी दांडा कापीत होता.

" अरे, हा काय प्रकार आहे ? " त्यानें बावरतच विचारलें.

" मला एक कल्पना सुचली आहे, " ऑरव्ह शांतपणें म्हणाला. हातांतला उद्योग चालूच ठेवून तो सांगूं लागला, " हें हँडल खूपच उंच आहे. गेल्या आठवड्यांत वर्तमानपत्रांत घोड्यांच्या शर्यतीचं एक चित्र आलं होतं. ज्या जॉकीनं ती शर्यत जिंकली होती तो आपल्या घोड्याच्या मानेवर अगदीं पूर्णपणें वांकलेला दिसत होता. कां बरं ? कारण तसं केल्यामुळं वातविरोध कमींत कमी झाला होता. आईनं आपल्याला तयार करायला मदत केली ती पहिली घसरगाडी आठवते तुला ? तिनं त्या वेळीं आपल्याला सांगितलं होतं कीं ती सखल करा, जितकी जमिनीसरपट होईल तितकी करा; कारण त्यामुळं वातविरोध फारसा होणार नाहीं. दुचाकीच्या बाबतींतहि तेंच आहे. हँडल मी चांगलं खालीं करून घेणार आहे. म्हणजे मग मी जेव्हां दुचाकी पळवूं लागेन तेव्हां मला खूप खालीं वांकून समोरच्या वाऱ्याचा जोर टाळतां येईल; त्याच्या झोताच्या खालींच मी राहूं शकेन. "

" बरोबर वाटतं बुवा तुझं म्हणणं, " विल्बरने म्हटलें.

दुचाकीचें तें हँडल ऑरव्हनें कापून काढलें. मग तें ज्यावर बसविलें होतें तो उभा दांडा त्यानें आंखूड करून घेतला. आणि नंतर हँडल पुन्हां त्या कापलेल्या उभ्या दांड्याला डाग देऊन ( सॉडर ) जोडून टाकलें. आतां दुचाकीवर बसल्यावर

त्याला पुढें वाकतां येऊं लागलें. त्यानें जेव्हां हा नवा प्रयोग प्रत्यक्ष करून बघितला तेव्हां त्याला आणखीनच आश्चर्य वाटलें. त्या नव्या योजनेमुळें त्याला अधिक वेगानें जातां येत होतें. इतकेंच नव्हे तर त्याची नेहमींची दौड संपली तरी त्याला नेहमींइतकें दमल्यासारखेंहि झालें नाहीं. सरळ ताठ बसल्यामुळें त्यापूर्वी त्याच्या पाठीला जी रग लागायची तीहि यामुळें लागली नाहीं.

जत्रेच्या मैदानावर पुढल्या शनिवारीं दोन मैलांची दुचाकी-शर्यत ठेवण्यांत आली असल्याचें ऑरव्हनें एड साइन्सच्या वृत्तपत्रांतून जाहीर करविलें. स्वतःची दुचाकी असलेल्या कोणासहि या शर्यतींत भाग घेतां येणार होता. पहिलें बक्षिस होतें, एक हत्याराची पेटी व पंप. ऑरव्ह व विल हे ज्या वाण्याकडे पूर्वी काम करीत असत त्याला ऑरव्ह जाऊन भेटला. दुसरें बक्षीस म्हणून एक डझनभर मुरंब्यांचे व पाकाचे डबे त्यानें द्यावेत, एवढें त्याच्याकडून कबूल करून घ्यायला ऑरव्हला फारसे प्रयास पडले नाहींत. ग्याटिकबुवांनीं तिसऱ्या बक्षिसासाठीं उत्तम-पैकीं मांसच द्यायचें कबूल केलें.

या शर्यतींत केवळ तरणींताठीं पोरेंच नव्हेत तर कांहीं मोठ्या माणसांनीं सुद्धां भाग घेतला. अर्थात् ज्यांच्या स्वतःच्या दुचाक्या होत्या त्यांनींच. शर्यतीच्या आदल्या रात्रीं विल्बर व ऑरव्ह यांनीं आपली दुचाकी सगळी सोडवली. त्यांनीं प्रत्येक सांध्या-खोबणींतला घाणीचा कणन् कण काढून टाकून ती स्वच्छ व लख-लखीत केली. त्यांनीं तेल देऊन दुचाकी पुन्हां जोडून तयार केली.

" ऑरव्ह मी करतों हें काम पुरं, " विल्बर म्हणाला, " आजचीच रात्र आहे; तूं छानशी झोप काढ जा. " आणि त्यानें पुन्हां विचारलें, " पण काय रे, टायर्स कशीं काय आहेत ? "

" ठीक आहेत, " ऑरव्ह सहज बोलून गेला. " गेला महिनाभर मी तीं वापरतों आहे; पण पंक्चर-बिंक्चर कांहीं नाहीं झालेलं कधीं. "

* * *

प्रकरण दहावें

# दुचाकीची शर्यत

दुसऱ्या दिवशीं दुपारीं जत्रेच्या मैदानावर शर्यत सुटण्याच्या रेषेवर ओळीनें वीस दुचाक्या उभ्या होत्या. त्यांतले जवळ जवळ निम्मे स्पर्धक वयस्कर होते. तें पाहून ऑर्व्ह थोडा खट्टू झाला. तरी पण ही दोन मैलांची शर्यत होती आणि तितका पूर्वीचा सराव नसणाराची इतक्या लांब दौडींत सहजच दमछाक होण्यासारखी होती. ऑर्व्हिलच्या तंगड्या म्हणजे आतां जणुं पोलादाच्या स्प्रिंगा झाल्या होत्या. दोन मैल दुचाकी मारायची म्हणजे त्याला दमल्यासारखें सुद्धां वाटणार नव्हतें.

एका स्पर्धकापाशीं एक अगदीं नवी कोरी दुचाकी होती. तिचें नांव होतें 'कोलंबिया.' ही कनेक्टिकट संस्थानांतील हर्टफोर्ड येथें तयार झालेली होती. ऑर्व्हचें लक्ष साहजिकच कुतूहलानें तिकडे गेलें. बाजारांत आलेली सर्वांत अलीकडची दुचाकी म्हणजे हीच होती; आणि तिचें हँडल खालीं-वर करण्याची सोय होती हेंहि ऑर्व्हच्या ध्यानांत आलें. हँडलला अशा प्रकारची सोय असलेली ही पहिलीच दुचाकी ऑर्व्ह पहात होता.

जॅक विंटर्स या सुमारें तीस वर्षें वयाच्या माणसाची ती नवी दुचाकी होती; आणि त्याला तिच्याबद्दल अर्थातच अभिमान होता. पण ऑर्व्हला हें ठाऊक होतें कीं, जॅक विंटर्स स्थानिक मुख्य काल-लेखक ( टाइम-कीपर किंवा बुक-कीपर ) होता आणि तो अतिशय कष्ट करणारा होता. आपल्या कामाच्या चोपड्यांवर वांकून दररोज दहा दहा तास तो काम करीत असतांना दिसत असे. ऑर्व्हनें आतांपर्यंत पाहिलेल्या दुचाक्यांत जॅक विंटर्सची ही नवी दुचाकी सर्वांत उत्तम होती यांत कांहींच शंका नव्हती; तरी पण स्वतः जॅक विंटर मात्र मोठा कसलेला दुचाकी-स्वार असेल असें ऑर्व्हला वाटत नव्हतें. त्याचें कारण उघड होतें;

त्या गरीब बिचाऱ्याला इतके कष्ट केल्यानंतर दुचाकीचा सराव करायला फुरसत सांपडणेंच शक्य नव्हतें.

आणि ऑर्व्हच्या आणखीहि एक गोष्ट लक्षांत आली होती कीं, जॅकनें आपल्या दुचाकीचें हॅंडल सखल केलेलें नव्हतें. तें हॅंडल फारच उंच होतें आणि त्यामुळें विंटर्स जेव्हां तिच्यावर बसे तेव्हां त्याला जवळ जवळ ताट होऊनच बसावें लागे. ऑर्व्हला याची खात्री होती कीं, विंटर्सनें आपल्या दुचाकीचें हॅंडल थोडें सखल केलें तर त्याची दुचाकी थोडी अधिक वेगानें जाईल; परंतु ही गोष्ट ऑर्व्ह त्याला थोडीच सांगायला बसला होता.

"ऑर्व्ह, वारा तर चांगलाच ताठ आहे," विल्बर हळूच कुजबुजला. "पहिल्या मैलांत इतरांना पुढें जाऊं दे आणि झगडूं दे त्या तोंडावरच्या वाऱ्याशीं; पहिल्या मैलांत तूं मागेंच रहा. त्यांना त्या वाऱ्याचा सारा तडाखा सहन करावा लागेल; तुला मात्र त्याचा त्रास होणार नाहीं. आणि मग ते जेव्हां दमून जातील तेव्हां तूं एकदम पुढें निघून जा."

शर्यत सोडण्याची कामगिरी एड साइन्सकडे होती. त्यानें सर्वांना ओळींत उभें केलें. तो ओरडला, "हुश्शार ... तय्यार ... सुरू." आणि लगेच सर्वजण निघाले. प्रत्येकजण पुढें निघण्यासाठीं धडपडत होता. ऑर्व्ह मागेंच राहिला होता. जॉकी आपल्या घोड्याच्या मानेवर वांकून बसतो तसाच ऑर्व्ह आपल्या दुचाकीच्या हॅंडलवर वांकून बसलेला दिसत होता. जॅक विंटर्स चांगला गलेलठ्ठ होता; ऑर्व्ह त्याच्या मागें मागेंच राहिला. विंटर्स तोंडावरच्या वाऱ्याशीं झगडत पुढें चालला होता. ऑर्व्हला तो जाणवतहि नव्हता; कारण पुढें चाललेला विंटर्स त्याला ढालीसारखा उपयोगी पडत होता.

उन्हाळ्यांत ज्या अर्ध्या मैलाच्या मार्गावरून शर्यतीचे घोडे धांवत त्याच मार्गावर ही दुचाकीची शर्यत ठेवलेली होती. या अर्ध्या मैलाच्या पहिल्या वर्तुळांत ऑर्व्हचा क्रम दहावा होता. दुसरें वर्तुळ पुरें झालें तेव्हां तो पांचवा आला. तरी पण तो कसून दौड करीत नव्हता; केवळ आघाडीवरच्या स्पर्धकांच्या मागोमाग दहा यार्डांत रहावयाचें एवढाच त्याचा प्रयत्न होता. तिसऱ्या वर्तुळाच्या अखेरीला ऑर्व्ह चवथा होता. त्यानें विल्बरकडे पाहिलें आणि आपण खात्रीनें जिंकणार याबद्दल डोळ्यांनीं खुणावलें.

"आतां हो पुढें, मार दौड," विल्बर जोरानें ओरडला. आघाडीचे लोक ऑर्व्हच्या फक्त दहा यार्ड पुढें होते. ऑर्व्ह त्यांना मागें टाकण्यासाठीं पुढें घुसला. त्यानें एकाला मागें टाकलें, ... दुसऱ्याला टाकलें, ... आतां आणखीहि एक मागें पडला; आणि आतां फक्त जॅक विंटर्स तेवढा आपल्या नव्या कोलंबिया दुचाकीवर बसून त्याच्या पुढें राहिलेला होता. पण विंटर्सची चांगलीच दमछाक होऊन तो जोराजोरानें धापा टाकीत होता. आतां ते अखेरीच्या अगदीं शेवटच्या टप्प्यांत आले. दोघांची बरोबरी झालेली दिसूं लागली. पण तरीहि ऑर्व्हला साधा जोरानें श्वास सुद्धां घ्यावा लागलेला नव्हता.

"आतां वेग वाढवून याला मागें टाकून पुढें सटकलें पाहिजे," ऑर्व्ह स्वतःशींच म्हणाला. तो आपल्या हँडलवर आणखी अधिक वांकला आणि जीव खाऊन पाय मारायला त्यानें सुरुवात केली. शर्यतीच्या अखेरीच्या रेघेपाशीं उभ्या असलेल्या जमावानें मारलेल्या आरोळ्या त्याच्या कानीं आल्या. हळूहळू तो विंटर्सपासून पुढें सरकला. आतां केवळ शंभर यार्ड अंतर जायचें राहिलें होतें आणि ऑर्व्ह विंटर्सच्या पांच यार्ड पुढें होता. ऑर्व्हला मनांतल्या मनांत हंसूं फुटत होतें. 'आतां काय सोपं आहे!' त्याला अगदीं हलकें हलकें वाटूं लागलें.

आणि इतक्यांत एकदम संकट कोसळलें. एक मोठा आवाज होऊन त्याच्या दुचाकीच्या टायरचा स्फोट झाला. चाक डळमळलें आणि एकदम उजव्या बाजूला वळलें. ऑर्व्ह नेमका हँडलच्या वरच्या बाजूनेंच पलीकडे फेकला गेला. त्यामुळें त्याला कोठें लागलें नाहीं; मात्र तो मनांतून अगदीं खचला, खिन्न झाला. विंटर्स त्याच्या जवळूनच दुचाकी चालवीत पुढें निघाला तेव्हां त्यानें सहानुभूति दाखवीत म्हटलें, "ऑर्व्ह, नशीबच खडतर!" विंटर्स अगदीं आरामांत विजयरेषा ओलांडून गेला. ऑर्व्ह तरीहि उठून उभा राहिला व त्यानें आपली दुचाकी उचलली. निदान दुसरा तरी क्रमांक मिळेल अशी त्याची अपेक्षा होती. पण त्यानें पाहिलें तो पुढलें चाक पार वांकडेंतिकडें होऊन गेलें होतें. बसलेल्या ठोकरीनें त्याचा अगदीं निकाल लावला होता.

विल्बर धांवतच तेथें आला. "ऑर्व्ह, फार लागलंबिगलं तर नाहीं?" धापा टाकीत त्यानें विचारलें.

" नाहीं, " ऑर्व्ह म्हणाला. त्याचा चेहरा उतरलेला होता आणि मनांतूनहि तो नाउमेद झाला होता. " मी त्याला नक्कीच मागं टाकलं असतं, विल. पण केवळ कमनशिबानंच तें पंक्चर झालं. "

" नाहीं, तसं नाहीं, " विल्बर गंभीरपणानं सांगू लागला. " तो आपलाच हलगर्जीपणा होता. ऑर्व्ह, पुढं हो नि विंटर्सचं अभिनंदन कर पाहूं अगोदर. "

' आपलाच हलगर्जीपणा ? ' – विल्बरला या शब्दांनीं काय म्हणायचं आहे तेंच ऑर्व्हच्या डोक्यांत येईना. त्याला एवढंच माहीत होतं कीं, आपल्याला यशाची शंभर टक्के खात्री असतांना आपण शर्यत हरलों आहोंत. एड साइन्सनं पहिल्या आलेल्या विंटर्सला एक नवी कोरी हत्यारांची पेटी व पंप बक्षीस दिला: तें पहात ऑर्व्ह निमूटपणें उभा होता. त्या वस्तूंसाठीं विल्बरला व त्याला दहा डॉलर्स पडले होते या विचारानं मात्र त्याच्या आंगावर कांटा उभा राहिला !

ऑर्व्हच्या दुचाकीला झालेल्या अपघाताबद्दल विचारून विचारून लोकांनीं त्याला अगदीं मतावून सोडलें. पण तो कोणालाच उत्तर देण्याच्या मनःस्थितींत नव्हता. विंटर्स ज्या गिरणींत कामाला होता त्या गिरणीचे मालक श्री. हेन्री हे तिथं हजर होते. त्यांना 'आपल्या' जॅक विंटर्सनं शर्यत जिंकल्याचा इतका आनंद झाला कीं, त्यांनीं तेथल्या तेथंच पुढील शर्यत जाहीर केली. पुढल्या शनिवारीं अशीच शर्यत होईल व त्यांत पहिला येणाराला आपण एक 'इंगरसोल' मनगटी घड्याळ बक्षीस देऊं असं त्यांनीं जाहीर करून टाकलें.

" ही मोडलेली दुचाकी आतां दुकानांत घेऊन जायला हवी, " विल्बर म्हणाला. त्यानं व ऑर्व्हनं मिळून मोठ्या कष्टानं ती दुकानाकडे चालविली. दोघेहि उदास दिसत होते. दुकानांत जाऊन पोंहोचेपर्यंत विल्बर फारसं कांहीं बोलला नाहीं. त्यांनीं ती दुचाकी उचलून आंत नेली. मग मात्र विल्बरनं ऑर्व्हकडे रोखून पहात गंभीरपणें म्हटलें, " ती माझी नि तुझीहि चूक झाली. तूं जेव्हां मला सांगितलंस कीं, ' हीं टायर्स उत्तम आहेत. मी तीं गेला महिनाभर वापरलीं आहेत नि त्यांत एक सुद्धां पंक्चर झालेलं नाहीं कधीं; ' तेव्हांच खरं म्हणजे मी नवीं टायर्स टाकण्याबद्दल आग्रह धरायला हवा होता. "

" पण तीं तर चांगलीं दिसत होतीं, " कांहींशा रुष्टपणानं ऑर्व्ह म्हणाला.

" हा एक धडा झाला आपल्याला, ऑर्व्ह, " विल्बरनं सांगितलं. " तीं टायर्स चांगलीं दिसत होतीं; तूं म्हणतोस तें खरं. पण आपल्या हें लक्षांत यायला

हवं होतं कीं, साधारणपणं टायर दहा तासांपर्यंतच्या चालीला ठीक रहातं. नंतर तें थोडं थोडं झिजायला लागतं. आपण तें पुढलं टायर जर त्या वेळीं काळजीपूर्वक तपासून बघितलं असतं तर त्याच्यांत एक-दोन तरी ठिकाणीं झिजलेल्याच्या खुणा सांपडल्या असत्या. त्या ठिकाणीं तें जवळ जवळ निकामी झाल्यासारखंच असल्याचं दिसलं असतं. "

" पण नवीं टायर्स टाकायचीं म्हणजे केवढा मोठा खर्च होता, " ऑरव्हनें अडचण दाखविली.

" तें मलाहि माहीत आहे, " विल्बरनें त्यावर उत्तर दिलें. " पण आपण जर दुचाकीला नवीं टायर्स टाकलीं असतीं तर तूं शर्यत जिंकली असतीस; आणि आतांपर्यंत कोणी तरी आपल्याकडे दुचाकी विकत घेण्यासाटीं मागणीहि नोंदविली असती. "

" विल, मला वाटतं मी फाजील आत्मविश्वास बाळगला त्याचं हें फळ, " विल कष्टी होऊन म्हणाला.

" तूंच एकट्यानें नव्हे, मीहि, " विल्बर म्हणाला. " यापुढं आपण कोणतीहि गोष्ट गृहीत धरून चालायचं नाहीं. आपण कोणतंहि यंत्र वापरण्यापूर्वी त्याचा भागन् भाग काळजीपूर्वक तपासून घेत जाऊं – मग तो एखादा छापखाना असो, लेथ असो, दुचाकी असो नाहीं तर, ... नाहीं तर साधा पतंग सुद्धां असो. "

" चला, आतां आपल्याला कामाला लागलं पाहिजे, " ऑरव्ह म्हणाला. " सुदैवानं आपल्यापाशीं आज दोन कोरीं टायर्स शिल्लकहि आहेत. "

मोडतोड झालेलें चाक काढून त्या जागीं नवीन बसवायला त्यांना फार वेळ लागला नाहीं. आणि दोन्ही चाकांना नवीं कोरीं टायर्स चढवायला तरी कितीसा उशीर !

त्या आठवड्यांत आपला धंदा अगदींच थंडावला आहे हें विल्बरच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. लोकांनीं दुचाकी-दुरुस्तीसाटीं दुसऱ्या दुकानांकडे तोंड वळविलें होतें. एड साइन्सनें याचें कारण विल्बर व ऑरव्ह यांना सांगितलें : " लोक म्हणतात, राइट-बंधूंना जर आपली स्वतःचीच दुचाकी नीट दुरुस्त ठेवतां येत नाहीं, तर ते आमच्या दुचाक्या काय दुरुस्त करणार कपाळ ! "

"पुढल्या शनिवारपर्यंत थांब," ऑर्व्ह उग्रपणें म्हणाला. तो आतां भलत्या आत्मविश्वासाच्या मिजाशींत नव्हता – त्याचा दृढ निश्चय झालेला होता.

ऑर्व्ह जेव्हां पुढल्या शनिवारीं शर्यतीच्या आरंभरेषेवर उभा राहिला तेव्हां लोकांनीं खूप मोठ्यानें हंसून त्याची टर उडविण्याचा प्रयत्न केला. जॅक विंटर्स आपल्या नव्या दुचाकीसह आला होताच; त्याशिवाय जॉनी मॉरोपाशीं सुद्धां एक नवी दुचाकी दिसत होती. त्याच्या वडिलांनीं त्या आठवड्यांतच त्याला एक नवी 'कोलंबिया' दुचाकी घेऊन दिली होती.

"आपली एखादी तरी दुचाकी खपली असती, मी गेल्या आठवड्यांत शर्यत जिंकली असती तर!" आर्व्हनें विल्बरला हळूच म्हटलें.

"हें तुझं स्वतःला दोष देण्याचं बंद कर बघूं," विल्बर तीव्र स्वरांत म्हणाला. "ती माझी चूक होती तशीच तुझीहि पण होती. आज तूं शर्यत जिंकणार आहेस, कारण आज तुझी दुचाकी उत्तम स्थितींत आहे."

या वेळीं श्री. हेन्री शर्यत सोडणार होते. त्यांनीं सर्व स्पर्धकांना प्रारंभ-रेषेवर एकत्र केलें. मोठा थोरला जमाव शर्यत पहायला जमला होता. आणि त्यांतल्या जवळ जवळ प्रत्येकालाच वाटत होतें कीं, जॅक विंटर्स सहज जिंकील हीहि शर्यत.

आणि मग ते सारे दुचाकीस्वार एकदम निघाले. आज वारा आजिबात नव्हता. त्यामुळें या वेळीं ऑर्व्हनें प्रथमच सर्वांच्या पुढें सरून शेवटपर्यंत पुढेंच रहायचें असें ठरविलें. पहिलें वर्तुळ पुरें झालें तेव्हां ऑर्व्ह जॅक विंटर्सच्या पुढें दहा यार्ड होता. दुसरी चक्कर पुरी झाली तेव्हां ऑर्व्ह वीस यार्ड त्याच्या पुढें गेला होता. आणि मग खरोखरच त्यानें पाय मारायला सुरुवात केली. जमावांतले लोक आश्चर्यानें आ वासून पहातच राहिले नुसते. ऑर्व्ह पुढें वांकून अगदीं जीव खाऊन पाय मारीत होता. तिसऱ्या चकरीच्या अखेरीला तो जॅकच्या चांगला शंभर यार्ड पुढें गेलेला होता; आणि इतर बहुतेक साऱ्याच स्पर्धकांना त्यानें जवळ जवळ पुरें एक वर्तुळच मागें टाकलें होतें. तसाच तो जॅक विंटर्सपासून सारखा पुढें पुढेंच जात राहिला होता. अखेर त्यानें पाव मैलानें शर्यत जिंकली.

विल्बरनें ऑर्व्हच्या खांद्यावर थोपटीत म्हटलें, "खूप छान गेलास, ऑर्व्ह." पण त्याच्या चेहऱ्याकडे पाहून तुम्हांला कांहीं असें वाटलें नसतें कीं,

जत्रा-मैदानावर जमलेल्या त्या साऱ्या लोकांत अभिमानानें याचीच छाती सर्वांत अधिक फुगलेली आहे म्हणून! श्री. हेन्री यांनीं एक छोटेसें भाषण केलें आणि ऑर्व्हला घड्याळ बक्षीस दिलें. ऑर्व्हचें स्वतःचें असें हें पहिलेंच घड्याळ होतें.

"तुझी दुचाकी पण दुचाकी आहे, ऑर्व्ह!" हेन्री म्हणाले. "तसली एक दुचाकी माझ्या मुलासाठीं घ्यायची आहे मला. कोणत्या बनावटीची आहे ती दुचाकी?"

विल्बरनें डोळे मिचकावले. या प्रश्नाला कसें उत्तर द्यावें त्याच्या कांहीं लक्षांत येईना.

पण हजरजबाबी ऑर्व्हजवळ उत्तराला कधींच वाण नसायची. "आम्ही तयार करतों ती, हेन्री," सहज म्हणून त्यानें सांगितलें. "आम्ही तिला म्हणतों ... आम्ही म्हणतों ..." एकदम उत्स्फूर्त होऊन तो म्हणाला, "राइट फ़ायर."

* * *

प्रकरण अकरावें

# दुचाक्यांचा व्यापार

त्या आटवड्यांत राइट बंधूंकडे दुचाक्यांच्या तीन मागण्या आल्या. पण त्यांच्या दोघांजवळ मिळून या वेळीं फक्त ऐशीं डॉलर रोख शिल्लक होते: बाकी सारे पैसे दुकानांत गुंतलेले होते. नव्या दुचाक्या जोडून तयार करायच्या म्हणजे त्यासाठीं अगोदर जुन्या खरेदी करायला हव्या होत्या; चाकें, टायर्स, नव्या बैठकी, इतकेंच नव्हे तर नवीं हँडल्सहि विकत घ्यायला हवीं होतीं. आणि या सगळ्या वस्तु घ्यायच्या म्हणजे पैसे हवे होते. यामुळें ते दोघेहि भाऊ अगदीं उदास झालेले दिसत होते. त्यांची बहीण केट बहुधा दुकानांतच इकडे तिकडे घुटमळत असे. तिनें आपल्या भावांचें हें बोलणें ऐकलें; मात्र ती त्याबद्दल कांहीं बोलली नाहीं. ती दुकानांतून बाहेर सटकली आणि तिनें सरळ घर गांठलें.

त्या रात्रीं जेवणं उरकलीं आणि तांटेंवाट्या विसळून जाग्यावर गेलीं तेव्हां दोघेहि भाऊ मुकाटमुकाटच बैठकीच्या खोलींत जाऊन बसले. आईचें विणण्याचें काम चालू होतें. केटचे सारे कपडे तीच शिवीत असे; इतकेंच नव्हे तर विल्बर व ऑरव्हिल यांच्यासाटीं सदरेहि शिवीत असे.

"मला तुम्हां दोघांचा मोठा अभिमान वाटतो!" राइटबाई एकदम बोलूं लागल्या. "हेन्रींच्या पत्नी भेटल्या होत्या. तुम्ही त्यांच्या मुलासाटीं दुचाकी बनवतांय् म्हणे. त्यांनींच सांगितलं मला."

"हो, हेन्रींनीं आमच्याकडे एका दुचाकीची मागणी केली आहे खरी," विल्बरनें कबुली दिली.

"तुमच्या धंद्यांत भागी घेण्याची इच्छा आहे माझी," त्यांची आई शिवणांतली नजर वर न करतांच म्हणाली. "तुम्हांला माहीतच आहे कीं, मी

जवळ जवळ तीनशें डॉलर सांठवले आहेत. ते बँकेंतच पडून आहेत नुसते. ते पैसे घेऊन मला तुमच्या धंद्यांत तिसरा भागीदार म्हणून कां घेत नाहीं ? "

ऑर्व्ह तटकन् उठून उभा राहिला. " खरं, आई ? " त्यानें हर्षभरित होऊन विचारलें.

" खरंच, " तिनें शांतपणें सांगितलें. " आपल्या दोघां मुलांबरोबर भागीदारी व्यायला कोणत्याहि आईला आनंदच वाटेल. मला माहीत आहे, तुम्हांला पैसे कांहीं अगदीं आतांच नको असतील. "

" नकोत असं कांहीं नाहीं ! " ऑर्व्ह मोठ्यानें म्हणाला. " तेवढ्या रकमेंत आम्ही डझनभर दुचाक्या तयार करण्याइतकं सुटं सामान विकत घेऊं. "

" बँकेच्या व्यवस्थापकांपाशीं मी बोलून ठेवलं आहे, आज दुपारींच, " आई म्हणाली. " अन् सांगूनहि ठेवलंय् त्यांना कीं, तुम्हांला लागले तर पैसे घेऊं द्या म्हणून. "

" पण आई, तुला ग कसं कळलं आम्हांला पैसे हवेत म्हणून ? " विल्बरनें साशंक होऊन विचारलें.

" कां ? ... कां बरं, मला तुमच्यांत भागीदारी व्यायची म्हणून विचारलं इतकंच. " आईनें सहज सांगावें तसें उत्तर दिलें.

केट निमूटपणें कोपऱ्यांत बसलेली होती. विल्बरनें तिच्याकडे विचारपूर्वक पाहिलें, पण आईनें केटकडे बघून डोळ्यांनीं खूण केलेली कांहीं त्याच्या लक्षांत आली नाहीं. तरी पण, त्याच्या लक्षांत येऊन चुकलें होतें कीं, आपल्याला पैशाची किती निकड लागलेली आहे हें केटनेंच आईपाशीं येऊन सांगितलें असलें पाहिजे. पण त्याच्या हेंहि ध्यानांत आलें होतें कीं, ती गोष्ट आईला व केटलाहि गुपीत ठेवायची होती; म्हणून मग तो त्याबद्दल कांहींच बोलला नाहीं.

"ऑर्व्ह", त्यानें सांगितलें, " तू उद्यां सिनसिनाटीला जा. आतां आपण आपल्याला काय काय हवं त्याचा विचार करूं. आपण जर एकदम मोठ्या प्रमाणावर खरेदी केली, तर त्या वस्तु आपल्याला थोड्या स्वस्त पडतील. "

" आपल्या जेवणघरांतल्या मेजापाशींच बसूं या ना, " ऑर्व्ह म्हणाला. आणि त्यांनीं घाईघाईनें कागद व पेन्सिल घेऊन स्वयंपाकघराकडे धूम ठोकली. त्यांना काय काय लागणार होतें त्याची यादी लिहून पुरी व्हायला मध्यान्ह झाली.

दुसरे दिवशीं ऑर्व्हिलनें सिन्सिन्नाटींचे सारे दुचाकी-कारखाने धुंडाळले. त्यांच्याकडील दुचाक्या नि त्यांचे सुटे भाग पाहून घेतले. त्यानें एका कारखान्याकडून टायर्स, दुसऱ्याकडून पॅडल्स्, तिसऱ्याकडून चाकें अशी मागणी केली. आणि मग तो तावडतोब घरीं परतला.

तें सुटें सामान दुकानांत येऊन पडण्याचाच अवकाश, दोघेहि राइट भाऊ असे कामाला भिडले कीं, तसें काम त्यांनीं पूर्वीं कधींच केलेलें नव्हतें. दिवसामागून दिवस ते मध्यरात्रींपर्यंत आपल्या दुकानांत असत. जुन्या दुचाक्या सोडवायच्या आणि मग त्यांना नवें सामान टाकून त्या जोडायच्या. हा उद्योग त्यांचा रात्रंदिवस चालू होता.

त्या काळांत मोठ्या कंपन्यांकडून विकल्या जाणाऱ्या दुचाक्यांना शंभर डॉलर किंमत पडे. इतक्य कां बरें महाग असत त्या? हं, "जंगी उत्पादन" ( Mass production ) हा प्रकार त्या वेळीं अस्तित्वांतच आलेला नव्हता. प्रत्येक गोष्ट माणसांना हातांनीं करावी लागे आणि त्यामुळें वेळ फार मोडे. विल्बर व ऑर्व्हिल या कंपन्यांपेक्षां दुचाक्या कमी किमतीस विकूं शकत, कारण त्यांना कोणाला पगार देण्याचा प्रश्न नव्हता. किंबहुना ते स्वतःसाठींहि त्यांतून कांहीं उचल करीत नसत. जो कांहीं फायदा होईल त्याचे तीन भाग करायचे आणि या फायद्यांतून येतील तितक्या जुन्या दुचाक्या व सुटें सामान ते खरेदी करायचे.

त्यांनीं आपली एखादी 'राइट फ्लायर' दुचाकी कोणालाहि विकली कीं, ते त्याला सांगत, "एक वर्षपर्यंत तुमच्या या दुचाकीची दुरुस्ती फुकट. या दुचाकींत कांहीं बिघडलं-सवरलं तर तुम्ही वर्षभरांत कधींहि सरळ आमच्या या दुकानीं वेस्ट थर्ड स्ट्रीटवर घेऊन यायची. आमच्यापैकीं कोणीहि ती दुरुस्त करून देऊं. त्यासाठीं एक सेंटहि घेणार नाहीं." उलटपक्षीं, 'कोलंबिया' किंवा 'पोप' दुचाकी विकत घेणारे सारेच कांहीं मोठे बडे नव्हते. त्या दुचाक्या बनविणारे कारखाने तिथून तीन-तीन, चार-चारशें मैल लांब होते; आणि या दुचाकीची दुरुस्ती राइट-बंधू काय किंवा दुसऱ्या कोणी काय, केली तर अर्थातच त्यांना त्यासाठीं पैसे द्यावे लागत. त्यामुळें मोफत दुरुस्तीच्या या सवलतीमुळें अधिकाधिक गिऱ्हाइकें राइट-बंधूंना सहजच मिळूं लागलीं.

हळूहळू विल आणि ऑर्व्ह यांच्या दुकानीं नव्या दुचाक्यांसाठीं गिऱ्हाइकी इतकी वाढूं लागली कीं, त्यांना एक-दोन मुलें हाताशीं कामासाठीं ठेवणें आवश्यकच

झालें. आतां त्यांना पैसाहि खूप मिळूं लागला होता; तरी पण नवलाची गोष्ट म्हणजे त्यांतहि त्यांच्या जिवाला समाधान लाभत नव्हतें.

याचें कारण होतें. त्यांच्यापाशीं जीं अनेक स्वभाववैशिष्ट्यें होतीं त्यांत चौकसपणा हाहि एक गुण होता, हें त्याचें खरें कारण होतें. दुचाक्यांबद्दल त्यांच्या मनांत चौकसबुद्धि होती. एखादी जुनाट मोडकी-तोडकी दुचाकी दुरुस्त करून चालू करणें किंवा जुन्या मोडीच्या ढिगाऱ्यांतून थोड्याशा नव्या सामानाच्या साहाय्यानें एक संपूर्ण नवी दुचाकी उभी करणें ही त्यांच्या दृष्टीनें एक रोमहर्षक कामगिरी होती. पण अशा शंभर-एक दुचाक्या त्यांनीं तयार केल्यानंतर मात्र त्यांना त्यांत मोठेंसें कुतूहल उरलें नाहीं. आणि प्रत्येक बाबतींतच त्यांचें हें असें होत असे. आतां आणखी कांहीं तरी वेगळेंच करावें असें त्यांच्या मनांत येऊं लागलें.

दुकानांत येणाऱ्या गिऱ्हाइकांच्या कानीं दुकानाच्या मागल्या बाजूला सारखी कांहीं तरी ठोकाठोक चालू असल्याचें पडूं लागलें. अधिक चौकसपणानें जेव्हां तीं मागें डोकावून बघत तेव्हां विल व ऑर्व्ह मागच्या अंगणांत एक लाकडी घर-कुल उभारीत असलेले त्यांना दिसत.

" कशासाटीं बांधतां हो हें ? काय उपयोग याचा ? " गिऱ्हाइकें विचारीत.

ऑर्व्ह खांदे उडवून उत्तर देई, " हं: कसला आलाय् उपयोग ! जरा गंमत झालं. "

लवकरच त्याची बांधणी पुरी झाली. विल व ऑर्व्ह यांनीं तेथें कामासाटीं एक मेज ( Work bench ) उभें करून त्यावर लेथ बसविली. ही जागा दुकानापासून अगदीं स्वतंत्र होती. आणि ते तिथें "गंमत"च करणार होते. आपल्या दुचाक्यांत आणखी कांहीं सुधारणा करण्यासारखेंहि कांहीं यांतून त्यांना सुचण्यासारखें होतें. तिथें त्यांनीं एक मोठा थोरला चित्रफलक लावला होता. त्यावर ते आपल्या योजनांच्या आकृत्या काढूं शकत होते. त्यांचीं हत्यारें आणि कामाचें मेज हीं तर तिथें होतींच.

एक दिवस केट या घरकुलांत येऊन जवळ जवळ कोसळलीच. तिथें यायला फक्त तिला एकटीलाच काय ती परवानगी होती. तिचा चेहरा अगदीं पांढराफटक पडलेला होता आणि तिचे डोळे अश्रूंनीं डबडबलेले होते.

" घरीं चला, " धापा टाकीत कसेबसे तिनें शब्द उच्चारले, " आई – "

त्यांनीं ऐकलें तें एवढेंच. सारें कांहीं तिथल्या तिथेंच टाकून त्यांनीं घराकडे धांव ठोकली. आईची प्रकृति गेल्या कांहीं दिवसांपासून ठीक नाहीं, हें त्यांना माहीतच होतें. तिचें वजन पुष्कळच कमी झालें होतें आणि तिची भूकहि मंदावली होती. तरी पण त्यांत फार काळजी करण्यासारखें कांहीं आहे असें त्यांना वाटलें नव्हतें. पण ते घरीं येऊन पोंहोचले तेव्हां मात्र आपली ही समजूत चुकीची होती हें त्यांच्या ध्यानांत येऊन चुकलें. तिला आपल्या आजारपणाची कल्पना होती; पण तिनें त्याबद्दल मुलांपाशीं न बोलण्याचें डॉक्टरांकडून वचनच घेतलें होतें. फक्त तिला नि केटलाच काय तें हें माहीत होतें. हे दोघे जेव्हां घरांत येऊन पोंहोचले तेव्हां त्यांचे वडील आईच्या खोलींतून बाहेर पडतच होते.

वडिलांनीं डोकें हालविलें आणि लगेच विल व ऑर्व्ह यांना कळून चुकलें कीं, आपण आपला सर्वोत्तम मित्र कायमचा गमावून बसलों आहोंत !

* * *

प्रकरण बारावें

# दोषी ताप

विल आणि ऑर्व्ह यांनीं पुढील कांहीं वर्षांत कामाशिवाय दुसरें कांहींच केलें नाहीं. त्यांचें आपल्या आईवर किती प्रेम होतें हें साऱ्यांना माहीत होतें आणि प्रत्येकाला त्यांच्याविषयीं सहानुभूति वाटत होती. त्या दोघांना एकटें एकटेंच रहावेंसें वाटतें आहे हें दोघांनाहि जाणवलें आणि त्यांचें तें वाटणें बरोबरहि होतें हेंहि लोकांना पटलें. विल्बर आणि ऑर्व्ह यांच्या मुखांतून मात्र आपल्या दिवंगत आईबद्दल कधीं उच्चार निघाला नाहीं. अगदीं आपल्या जिवलग मित्रांपाशीं सुद्धां. — काम ... काम ... काम ! याशिवाय दुसरें कांहींच त्यांना सुचत नव्हतें. आणि असलेंच कांहीं त्यांच्या मनांत तर तीं गुपित स्वप्नें ते केवळ स्वतःचीं स्वतःपुरतींच ठेवीत होते.

रविवारीं ते खूप दूरवर फिरून येत. या भटकंतींत ते कशाविषयीं बोलत तें कोणालाच कधीं कळत नसे. थोरल्या टेकडीवर मात्र मुलें पतंग उडवतांना पहायला ते अनेकदां जातांना दिसत.

एका रविवारीं थोरल्या टेकडीवर पतंग उडविणाऱ्या मुलांत वॉल्टर ब्रूकिन्स होता. तो राइट्सच्या घराजवळच रहात असे. त्याच्या वडिलांनीं राइट्सकडून त्याला एक दुचाकीहि घेऊन दिली होती. वॉल्टर उडवीत होता तो पतंग घरींच तयार केलेला होता. एकाएकीं त्याच्या हातांतल्या त्या पतंगानें एका झाडांत झेप घेतली. वॉल्टरनें जाऊन जेव्हां तो पतंग झाडावरून खालीं आणला तेव्हां त्यांत जवळ जवळ कांहींच उरलेलें नव्हतें.

"वॉल्टर, उद्यां तूं दुकानाकडे ये," ऑर्व्ह म्हणाला. "आम्ही तुला एक नवा पतंग करून देऊं."

दुसऱ्या दिवशीं त्यांनीं वॉल्टरसाठीं एक वावडी बनवून दिली; आणि अर्थातच ती त्यांना स्वतःलाच उडवून पहावी लागली. आतां थोरल्या टेकडीवरच्या त्यांच्या चकरा अधिकाधिक वाढूं लागल्या. मुलांसाठीं पतंग करून द्यावेत आणि ते उडवूनहि बघावेत हा त्यांना एक छंदच लागला. लोकांनीं नाराजीनें माना उडविल्या. एकजण तर म्हणाला, " वेडेपणाच दिसतोय् हा मला. चांगले बाप्ये झाले आहेत तरी अजून एखाद्या पोरासोरासारखे दोघे पतंग काय उडवींत बसतात कोण जाणे ! "

पण विल्बर व ऑर्व्ह नुसते " पतंग उडविण्यापेक्षां " आणखी कांहीं तरी करीत होते खास. जोराचा वारा आला म्हणजे पतंगाला काय होतें हें ते अभ्यास-पूर्वक पहात असत. त्यासाठींच ते स्वतः बनविलेल्या पतंगांचें हें उड्डाण न्याहाळीत रहात. एकदां त्यांची एक वावडी चांगली अर्धा मैल उंच आभाळांत घुमत होती.



एकाएकीं भयंकर मुसळधार पाऊस सुरू झाला, वारा सोसाट्याचा सुटला; पण राइट-बंधूंच्या हें लक्षांत आलें कीं, तरीहि आपली वावडी आकाशांत संथ व शांतपणें उडते आहे.

" गंमत आहे मोठी म्हणायची या वाऱ्याची, " विल म्हणाला. " खालीं इथं जवळ वादळ गरजतं आहे; अन् वर पतंगापाशीं मात्र वाऱ्याचं जवळ जवळ नांव सुद्धां नाहीं. "

" वारा आणि हवेचे प्रवाह याविषयीं आपल्याला अधिक माहिती घेतली पाहिजे, " ऑर्व्हिल म्हणाला. " पण तें बघूं पुढं कधीं तरी एखादे दिवशीं. विल, मला आज अगदीं दमल्यासारखं वाटतंय्. "

विल्बरनें ऑर्व्हकडे चमकून पाहिलें. ऑर्व्ह अन् दमला म्हणतो ? छेः ! पण त्यानें पाहिलें तों ऑर्व्हचा चेहरा लाल पडलेला दिसत होता. विलनें चटकन् पतंग वॉल्टरच्या स्वाधीन केला. वॉल्टरनें अर्थातच तो मोठ्या आनंदानें हातीं घेतला.

सुमारें अर्ध्याएक तासानंतर ऑर्व्हिल घरीं बिछान्यावर पडलेला होता आणि डॉक्टर येऊन त्याला तपाशीत होते.

" डॉक्टर, मला वाटतं कीं मला सर्दी झाली आहे, " ऑर्व्हिल पुटपुटला.

" माझाहि तोच कयास आहे, ऑर्व्ह " डॉक्टर रुक्षपणें म्हणाले. " तुला कांहीं दिवस बिछान्यांत पडूनच रहावें लागेल आणि मी तुझ्या शुश्रुषेकरितां परिचारिका पण आणायचं ठरविलं आहे. "

" कां ? मी करीन कीं, " केट म्हणाली, " त्याच्यासाठीं परिचारिका कशाला हवी ? "

" तूं दिवसा करशील, " डॉक्टरनीं सांगितलें, " पण रात्रींसाठीं हवं ना कोणी तरी, म्हणून. "

" साध्या सर्दीसाठीं ? " ऑर्व्हिल अर्धवट गुंगींतच होता, पण तरी त्यानें कसेबसे शब्द उच्चारले.

" ही साधी सर्दी नाहीं, केट, " डॉक्टर गंभीरपणें म्हणाले. " हा दोषी ताप आहे. टॅयफाइड. "

दोषी ताप – टॅयफाइड ! विल्बर पांढराफटक पडला. केट सुद्धां धास्तावली; पण ती तरी सुद्धां शांतपणें म्हणाली, " तो बरा होण्यासाठीं आम्ही काळजी घेऊं. "

" पण, काय हो डॉक्टर, कशानं आला याला हा ताप ? " विलचा आवाज कांपरा येत होता.

" कशानं येतो तें कोणालाच कळत नाहीं, बाबा, " डॉक्टरनीं खेदपूर्वक सांगितलें. " आणि आम्हां डॉक्टरांना सुद्धां त्यावर नक्की उपाय सांपडलेला नाहीं.

पण त्याचा ताप आतां खूप चढलेला आहे, तो आपल्याला उतरवायलाच हवा. विल, मी एक औषधयोजना ( priscription ) लिहून देतों. तूं तेवढीं औषधाच्या दुकानांतून तयार करून घेऊन ये. केट, एक मोठं पाण्याचं भांड भरून आण बघूं इथं. त्यांत एक बर्फाचा खडा टाक. एक फडकं घे अन् तें त्यांत भिजवून ऑर्व्हच्या कपाळावर घडी ठेव बरं. प्रथम आपल्याला त्याचा ताप खालीं आणला पाहिजे."

त्या काळांत दोषी तापाचे बहुतेक रोगी दगावतच. साऱ्या रोगांत हा रोग त्या काळीं अति भयंकर समजला जाई. त्या वेळीं डॉक्टरांना आंगांत रोगप्रतिबंधक सजातीय जंतु टोंचण्याचें ( Inoculation = सूचिकाभरण ) माहीत नव्हतें. आतां अमेरिकेंत जवळ जवळ प्रत्येक मुलाला शाळेंत घालतांना देवी काढतात; आणि आपल्या मुलांना दोषी तापाकरितां प्रतिबंधक जंतु टोंचण्याकडेहि सहसा कोणी आई-वडील दुर्लक्ष करीत नाहींत. गेल्या महायुद्धांत तर प्रत्येक शिपायाला दोषी तापाचें प्रतिबंधक सूचिकाभरण दिलेलें होतें आणि त्यांतील फारच थोड्यांना या रोगानें पछाडलें. परंतु ऑर्व्हिलला जेव्हां या रोगानें पछाडलें तेव्हां म्हणजे १८९६ सालापर्यंत डॉक्टरना देवी काढणें ( Vaccination ) आणि प्रतिबंधक सजातीय जंतु टोंचणें ( Inoculation ) याबाबतचें कांहीं ज्ञान नव्हतें.

ऑर्व्ह जवळपास दोन आठवडे शुद्धीवर नव्हता. डॉक्टरनीं रात्रपाळीची परिचारिका शुश्रूसेसाठीं आणविली होतीच, तरी पण तें काम बहुतेक विल व केट हीं दोघेंच स्वतः करीत. ऑर्व्हच्या उशाशीं आळीपाळीनें बसून त्याच्या कपाळावर घड्या ठेवण्याचें त्यांचें सारखें चालूच होतें. तरी पण त्याचा ताप चढत चढत १०५° पर्यंत गेला.

निम्मा काळ ऑर्व्हिल बेशुद्धच होता. वातांत तो सारखा कांहीं तरी विलक्षण बडबड करीत राही. केटला तें मोठें चमत्कारिक वाटे पण विलला मात्र तसें वाटत नसे. 'आपण उडालों,' 'आपण उडालों' असें ऑर्व्ह ओरडे तेव्हां विलच्या लक्षांत येई कीं, लहानपणच्या आठवणी याच्या डोक्यांत आहेत. लहानपणीं ते दोघेजण थोरल्या टेकडीवरून आईच्या मदतीनें बनविलेली आपली नवी घसरगाडी दौडवीत पहिल्यांदाच खालीं आले तेव्हां ते ओरडले होते — "आपण उडालों," "आपण उडालों." तेव्हांची होती ती आठवण.

'वायुदाब,' ( Wind pressure ), 'हवेचे उभे प्रवाह' ( Vertical air currents ) या चमत्कारिक शब्दसंहतींचा केटला कांहींच बोध होत नसे; पण विल्बरच्या मात्र त्यावरून लक्षांत येई कीं, ऑर्व्हिलच्या डोक्यांत त्या वेळीं पतंग भिरभिरत होते – माणसाला आकाशांत उंच घेऊन जाणाऱ्या पतंगांत त्यांचें मन गुंगलें होतें. अशा पतंगांबद्दल ते आपल्या रविवारच्या लांब लांब फेरफट-क्यांत कितीदां तरी बोललेले होते; पण नुसतें बोलण्यापलीकडे ते प्रत्यक्ष तयार कसे करावेत याबद्दल त्यांना त्या वेळीं कांहींच समजलेलें नव्हतें.

तीन भयानक आठवडे निघून गेले. झोंप न मिळल्यामुळें केटचे डोळे कसले बटबटीत दिसायला लागले नि ती अगदीं वाळून गेली. डॉक्टर दिवसांतून दोनदां येऊन जात. पण त्यांना करतां येण्यासारखें फारसें कांहीं नसेच. "तापाचे ठरलेले दिवस आहेत तेवढे जायलाच हवेत," ते जवळ जवळ रागानेंच म्हणत. आपल्या हातीं कांहींच करतां येण्यासारखें नाहीं हें पाहून ते संतापत.

आज मात्र कोणत्याहि डॉक्टरच्या तोंडून म्हटलेलें तुम्हांला ऐकूं येणार नाहीं कीं, "या रोगाला योग्य ते दिवस जायलाच पाहिजेत." जवळ जवळ प्रत्येक रोगावर काय काय उपाययोजना करावी हें आतां डॉक्टरांना माहीत झालेलें आहे. हे रोग उत्पन्न करणाऱ्या जंतूंचा नाश करणारीं औषधें आतां त्यांच्यापाशीं असतात. पन्नास वर्षांमागें मात्र हें अवघड होतें.

ऑर्व्हिलचें वजन कमी कमी होत होतें. आतां त्याचा केवळ अस्थिपंजर उरला होता; ताप त्याचें मांस जाळून टाकीत होता.

त्यानंतर एक दिवस सकाळींच केटनें त्याच्या कपाळाला हात लावून बघितला तों तें थंड लागलें. तिला अगदीं खोल आवाजांत ऐकूं आलें, "किती दिवस आजारी आहें मी?" आणि दुर्धर प्रसंग टळलेला आहे हें ती समजून चुकली. तापानें आपला ठराविक वेळ घेतलेला होता. डॉक्टर घाईघाईनें येऊन थडकले.

"देवाचे आभार मानायला हवेत," त्यांनीं ऑर्व्हिलचा ताप पाहिला तेव्हां ते उद्गारले. ताप जवळ जवळ नेहमींच्या सर्वसामान्य पातळीवर (Normal) आला होता.

"माझं आतां बरं आहे का हो?" ऑर्व्हिल कुजबुजला.

" अं हं, " डॉक्टर हंसत म्हणाले. " पण तूं बरा मात्र होणार आहेस बरं का. तुला चांगली शक्ति येईपर्यंत निदान दोन महिने तरी बिछान्यांत पडून रहायला हवं अजून. "

" दोन महिने ? " ऑर्व्हिल कुरकुरला.

" जवळ जवळ दोन आठवड्यांतच मी तुला उठून बसायला परवानगी देईन, " डॉक्टरनीं त्याला आश्वासन दिलें.

" मला निदान पुस्तक वाचायला तरी हरकत नाहीं ना ? " ऑर्व्हनें विचारलें.

" छेः छेः, " डॉक्टरनीं तो प्रश्न अगदीं झिडकारूनच टाकला.

" ऑर्व्ह, मी दाखवीन तुला वाचून, " विल म्हणाला. " माझ्याजवळ कांहीं नवीन पुस्तकं आहेत. त्यांतलं एक तर फारच सुंदर आहे. ऑटो लिलिएन्थाल यांनीं लिहिलं आहे तें. त्याचं नांव आहे – ' Experiments in Soaring ' – उड्डाणांतील अनुभव. "

" उड्डाणांतील अनुभव ! " ऑर्व्हिलनें तेच शब्द पुन्हां उच्चारले. आणि आज कित्येक आठवड्यांनीं प्रथमच त्याचे डोळे चमकलेले दिसले. " मी वाचलं आहे त्यांच्याबद्दल एका ... "

" हं, इतकंच पुरे ऑर्व्ह, " डॉक्टरनीं त्याला दाबलें. " तूं आपला झोंपेतच उड्डाण कर ना. विल तुला वाचून दाखवील उद्यां. "

ऑर्व्हिलनें डोळे मिटून घेतले आणि लगेच त्याला गाढ झोंप लागली.

विल्बर डॉक्टरांबरोबर रस्त्यापर्यंत गेला. आपल्या बग्गींत चढतां चढतां डॉक्टरनीं त्याला गंभीरपणानें म्हटलें, " ऑर्व्हिलला हें जरा जडच जाणार आहे बरं का. " आणि त्यांनीं लगाम उचलला. " त्यानं अगदीं शांत पडून रहायला पाहिजे. " ते म्हणाले, " निसर्गाला त्याला सुधारूं द्यायला आणि त्याची शक्ति त्याला परत द्यायला वाव दिला पाहिजे. त्याचं मन तुम्ही कशा ना कशांत तरी गुंतवून ठेवलं पाहिजे. तो अस्वस्थ होतां कामा नये. "

" मी करतों तें " विलनें कबूल केलें. " लिलिएन्थालनीं काय केलं आहे तें त्याला एकदां ऐकूं द्या तर खरं. डॉक्टर, त्यांनीं एक असा पतंग प्रत्यक्ष तयार केला आहे कीं, तो त्यांना हवेत उंच घेऊन जातो. त्यांनीं उड्डाण केलं आहे ! "

" ए! विल्बर, बस झालं तुझं पुराण, " डॉक्टर हंसून म्हणाले. " ही असली बडबड थांबवली नाहींस तर मला वाटायला लागेल कीं, तुलाच वात झाला आहे!" मग त्यांनीं आपला चाबूक फडकारला आणि त्यांचा म्हातारा घोडा डकॉव डकॉव करीत मार्गाला लागला.

विल्बर क्षणभर तिथेंच उभा राहिला.

" मला वाटतं ऑर्व्हिनं व मी आपल्या कल्पना आपल्यापाशींच ठेवाव्यात हें बरं, " तो स्वतःशींच म्हणाला. " नाहीं तर लोकांची समजत व्हायची कीं आम्ही छांदिष्ट झालों आहोंत. "

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थूलप्रत.
अनुक्रम २४४६ वि: चरित्र
क्रमांक ८८८ नों: दि: ३।३।५८

प्र क र ण ते रा वें

# वाचतां वाचतां शिक्षण

त्यानंतर तीन दिवसांची गोष्ट आहे. विल्बर मोठ्यानं वाचीत होता :

"मी जेव्हां लहान होतों तेव्हां पक्षी तरंगत जातांना पहात असें. त्या पक्ष्यासारखे तरंगतील असे पतंग बनविण्याचा मी प्रयत्न करून बघितला, पण त्यांतला एक सुद्धां सफल झाला नाहीं. नंतर माझ्या लक्षांत आलें कीं, पक्ष्याचे पंख कांहीं सपाट नसतात; त्यांना थोडी बाक असते. पक्ष्याच्या पंखाप्रमाणें कांहींसा एक मोठा पतंग मी तयार केला. एका टेकडीच्या माथ्यावरून मी तो सोडून दिला; आणि खरोखरच, तो चांगला तरंगत गेला कांहीं अंतरापर्यंत. आणि मग तो सहजपणें जमिनीवर खालीं बसला."

"लिलिएन्थालनें सुरुवात ही अशी केली होती," विल्बर बेभान झाल्यासारखा बोलला. "या गोष्टीचा तर आपण कधीं विचारहि केला नव्हता, ऑरव्ह; थोडासा बाक दिलेले पतंग तयार करणें."

"पण, तूं ऑटो लिलिएन्थालबद्दल ऐकलंस तरी कसं?" ऑरव्हिलनें चौकसपणानें विचारलें. तो अंथरुणावर उताणा पडला होता खरा, पण त्याचे डोळे मात्र अगदीं तरतरीत होते. त्याला इतकी अशक्तता आली होती कीं, आपला हात त्याला पांघरुणाबाहेरहि काढवत नव्हता. पण "Experiments in Soaring" मधून विल वाचूं लागतांच जणुं नवी शक्ति त्याच्यांत संचरूं लागली.

"एका दुचाकीच्या कंपनीनं आपल्याकडे एक मासिक पाठविलं होतं," विल म्हणाला. "त्या कंपनीनं तें पाठविलं होतं त्याचं कारण त्यांत त्यांच्या दुचाकीला लावलेल्या नव्या 'फ्री-व्हील'बद्दलचा एक लेख होता. त्या मासिकांत

कांहीं जण बनवीत असलेल्या नवीन बिनघोड्याच्या गाड्यांबद्दलहि लेखमाला होती आणि ऑटो लिलिएन्थालविषयींहि एक लेख होता. त्या लेखाच्या अखेरीला म्हटलेलं होतं कीं, ज्या कोणाला या पुस्तकाची प्रत हवी असेल त्यानं वॉशिंग्टन येथील स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूटला लिहिलं असतां ती मिळेल. ”

“ ही स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूट काय आहे ? ” ऑर्व्हनं विचारलें.

“ ऑर्व्ह, ही संस्था सरकारी मालकीची आहे, आणि प्राध्यापक सॅम्युएल लँगली हे त्या संस्थेचे प्रमुख आहेत. मी त्या पुस्तकासाठीं लिहिलं आणि त्या प्राध्यापकांनीं तें मला पाठवून दिलं; इतकंच नव्हे तर त्यांनीं मला लिहिलंय् कीं, तुम्हांला ‘उड्डाणांत’ गोडी असेल तर तुम्हांला मिळण्यासारखीं दुसरीं पुष्कळ पुस्तकं आपल्यापाशीं आहेत. म्हणून मी त्यासाठींहि त्यांना लिहिलं आणि – बरं का ऑर्व्हिल – तुला कल्पना नाहीं, किती तरी लोक उड्डाणाच्या बाबतींत प्रयोग करीत आहेत ! ”

“ मला ऑटो लिलिएन्थालबद्दल आणखीन् सांग पाहू, ” ऑर्व्ह उत्कंठापूर्वक म्हणाला.

“ ही स्वारी थोडीशी आपल्यासारखीच दिसते आहे, ” विल हंसून सांगू लागला. “ त्यानं पहिल्यांदां आपल्यासारखेच पतंग उडविले. आपल्याला आकाशांत घेऊन जाऊं शकेल अशा पतंगाचं स्वप्न त्याला पडत होतं. अखेर असे डझनावारी पतंग तयार करून पाहिल्यावर त्यानं असा एक पतंग केला कीं, जो खरोखरीच उड्डाण करीत गेला. त्याला तो म्हणतो – ‘ग्लायडर’. ”

“ ग्लायडर ! ” ऑर्व्हिल स्वतःशींच पुटपुटला.

“ हें ‘ग्लायडर’ घेऊन तो टेकडीच्या माथ्यावरून उड्डाण करतो, ” विल सांगत होता, “ आणि मग वारा त्याला तिथून दूरीवर घेऊन जातो. त्यानं लिहिलंय् कीं वारा नीट असला म्हणजे आपण जवळ जवळ मिनिटा-मिनिटाचीं उड्डाणं केलीं आहेत. ”

“ तें सारं वाऱ्यावरच अवलंबून असणार, नाहीं रे ? ” ऑर्व्ह म्हणाला.

“ म्हणजे काय, ऑर्व्ह ? ” विलनें विचारलें.

“ मला असं म्हणायचं आहे कीं, तुम्ही तुमचे मुखत्यार असल्याशिवाय खरोखरचं उड्डाणच करीत नाहीं, ” ऑर्व्ह म्हणाला. “ तुम्ही जरी अगदीं ‘ग्लायडर’-मध्यें बसून गेलांत तरी तुम्हांला वाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून रहावं लागतं. वारा

सांगेल तसं निमूटपणानं तुम्हांला जावं लागतं. पण जर, वारा नव्हे तर तुम्ही स्वतः म्हणाल त्या दिशेलाच तुम्हांला जातां येऊं लागलं तर ती मोठीच गोष्ट घडेल, नव्हे का? पण काय रे, ऑटो लिलिएन्थालशिवाय आणखी कोण कोण हे उड्डाणाचे प्रयोग करताहेत?"

"हं," विल्बर म्हणाला, "स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक लँगली यांचे प्रयोग चालू आहेत; तसंच शिकागो येथले ऑक्टेव्ह शानूट आणि दुसरे एक हिराम मॅक्झिम हेहि अशा प्रयोगांत गुंतले आहेत. पण, माझ्या माहिती-प्रमाणं एकटे लिलिएन्थाल हेच काय ते प्रत्यक्ष 'ग्लायडर'मध्यें बसून उड्डाण करणारे आहेत. इतर आपापल्या शास्त्रीय प्रक्रियेबद्दल लिहीत असतात. आणि त्या प्रक्रिया आश्चर्यकारकहि असतील; तरी पण प्रत्यक्ष उड्डाण करणारा असा ऑटो लिलिएन्थाल हा पहिलाच माणूस."

"तो त्याची प्रथम आकृति काढीत असेल, आणि आकृति बिनचूक असली तर त्याचं 'ग्लायडर'हि बरोबर तयार होत असेल," ऑरव्हिल हंसून म्हणाला.

"खरोखरच तो तसं करतो," विल उत्साहानें म्हणाला. "आपल्याला आईनं शिकवलं होतं तसंच अगदीं. बरं, आतां तूं शांत पडून रहा बघूं; मी तुला आणखी थोडं वाचून दाखवितों."

दुपारभर ऑरव्हिल बिछान्यांत पडून ऐकत होता. विल लिलिएन्थालचें पुस्तक त्याला वाचून दाखवीत होता. तें संपल्यावर विलनें ऑक्टेव्ह शानूटचा मासिकांतला एक लेख वाचावयास घेतला. डेटनच्या ग्रंथालयांत त्याला एक पक्ष्यांच्या उड्डाणासंबंधींचें पुस्तक मिळालें तेंहि त्यानें ऑरव्हिलला वाचून दाखविलें.

एक दिवस स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूटकडून अनेक छोट्या छोट्या पुस्तिकांचा एक गठ्ठा आला. त्यांत उड्डाणासंबंधीं आणखी पुष्कळ लेख आलेले होते. त्या काळांत याचा उल्लेख पाश्चिमात्य देशांत कांहींजण 'Soaring' असा करीत तर कांहीं त्याला 'Gliding' असें म्हणत.

विल व ऑरव्ह यांचें अफाट वाचन चालूच होतें. ऑरव्हिल पडल्या पडल्या जीं स्वप्नें पहात होता तीं एक दिवस धक्का देणारीं होतीं; पण तीं कसलीं आहेत याची जाणीव फक्त विल्बरलाच काय ती होती. डॉक्टर काय म्हणाले तें विलनें ऑरव्हला सांगितलेलें होतें. डॉक्टरसारखा सुशिक्षित माणूस जर

उड्डाणासंबंधीं बोलणाऱ्या माणसांवर 'छांदिष्ट' असा शिक्का मारतो तर या बाबतींत सर्वसामान्य माणसाचा समज काय असेल याची कल्पनाच केलेली बरी !

एक दिवस ऑर्व्ह म्हणाला, "माझी अशी इच्छा आहे कीं, पुरेसा पैसा सांठवून आपण एक 'ग्लायडर' विकत घ्यावें. त्यावर कांहीं प्रयोग करून पहावेत. पण ते मात्र इथं नाहींत; इथून खूप दूर कुठं तरी." ऑर्व्हनें पुढं म्हटलें, "मी चांगला बरा होऊन हिंडूं-फिरूं लागलों कीं, आपल्याला कंबर कसायला हवी. गेल्या दोन-तीन महिन्यांत दुकानांतल्या मंदावलेल्या धंद्याची कसर आपल्याला भरून काढायला हवी."

"कोणत्या दुकानांतला कसला धंदा मंदावला म्हणतोस तूं ?" विल हंसला. "अरे, त्या दुचाकीच्या शर्यती तशाच पुढं चालू आहेत. अन्, तुला माहीत आहे का कीं, तशा तीन शर्यती मीं ओळीनं जिंकल्या आहेत, तूं आजारी असतांना. मग मात्र मी तो नाद सोडून दिला. पण आपल्याकडे दुचाक्यांच्या मागण्या तर इतक्या येऊन पडताहेत कीं, त्या आपण पुऱ्या करूं शकत नाहीं. याशिवाय मी एका दुचाकीच्या कारखान्याशीं एक करारहि केला, पण तो तडीस जाऊं शकला नाहीं. त्या कारखान्याकडून मी जवळ जवळ फुकटांत शंभर दुचाकीचे सांगाडे (फ्रेम्स) विकत आणले. नव्या दुचाक्या जोडण्याच्या कामासाठीं आतां मुलं ठेवलीं आहेत. दुकान उत्तम चाललं आहे. ऑर्व्ह, तूं फक्त बरा हो म्हणजे झालं. इकडची फिकीर मुळींच करूं नकोस."

"बरंय विल," ऑर्व्हिल म्हणाला. "आपण आतां टी शानूट व इतर मंडळी आहेत त्यांना पत्रं टाकूं या. त्यांना एवढंच लिहायचं कीं, उड्डाणाच्या बाबतींत आम्हांला गोडी आहे, तेव्हां त्या विषयावरच्या कांहीं पुस्तकांचीं किंवा मासिकांचीं नांवं आम्हांला तुम्ही कळवूं शकल्यास पहा."

दोन आठवड्याच्या आंतच ऑर्व्हकडे डझनभर शास्त्रीय मासिकें येऊन पडलीं. त्यांत उड्डाणासंबंधीं लेख होते. हे लेख बहुतेक महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक, स्थापत्यतज्ज्ञ व शास्त्रज्ञ यांनींच लिहिलेले होते. शास्त्रज्ञ म्हणजे जगांतील सर्वांत विलक्षण लोक असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. त्यांना आपल्या ज्ञानाच्या शिदोरींत लोकांना वांटेकरी करून घेण्याची मोठी हौस. कदाचित् एखाद्या माणसाला असें आढळून येईल कीं, आकाशयान (Glider) उडविण्याचा एकच एक उपाय म्हणजे तें वाऱ्याच्या विरुद्ध उडविणें हा आहे;

आणि जोंपर्यंत तें आकाशयान वाऱ्यांत मुसंडी मारून चाललें आहे तोंपर्यंतच तुम्हांला तें आवरणें शक्य आहे. तो माणूस शास्त्रज्ञ असल्यानें तो आपलें हें ज्ञान आपल्यापुरतेंच ठेवणार नाहीं. तो त्यासंबंधीं मासिकांतून एकादा लेख लिहील; आणि तें ज्ञान सर्वांपर्यंत जाऊन पोंहोंचेल.

'दि रेलरोड ॲण्ड इंजिनिअरिंग जर्नल' यासारखीं मासिकें ऑर्व्हिलला मिळूं लागलीं. पण एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, ऑर्व्ह व विल हे दोघेहि आतां जवळ जवळ विशीच्या घरांत आले होते तरी ते पदवीधर मात्र झालेले नव्हते. ( एवढेंच काय, पण त्या काळचा अमेरिकेंतील सर्वांत प्रसिद्ध संशोधक थॉमस् एडिसन् हा तर कधींच पदवीधर झाला नव्हता. )

पण विल्बर आणि ऑर्व्ह हे मोठे चतुर होते. आपण वाचीत असलेल्या मासिकांतून येणारी शास्त्रीय परिभाषा, तांत्रिक शब्द समजण्यासाठीं आपल्याला पदार्थ-विज्ञान शिकलें पाहिजे; तसेंच यांत्रिक चित्रकला व ( Mechanical Drawing ) आणि स्थापत्यशास्त्र ( Engineering ) यांचीं निदान मूलतत्त्वें तरी आपल्याला समजलीं पाहिजेत हें त्यांच्या ध्यानीं येऊन चुकलें होतें. म्हणून त्यांनीं त्या त्या विषयाच्या तंत्राबद्दलचीं पुस्तकें आणवून त्याचा अगदीं पद्धतशीर अभ्यासच केला.

दोघी तापांतून पूर्णपणें बरें व्हायला ऑर्व्हिलला पुष्कळच दिवस लागले हें खरें; तरी पण त्या वाइटांतूनहि एक चांगलें असें निघालें कीं, त्या काळांत आकाशांतील उड्डाणासंबंधीं जेवढें म्हणून ज्ञान उपलब्ध होतें त्याचा करून अभ्यास करण्याची संधि ऑर्व्हिलला या आजारपणामुळेंच मिळाली. रात्रीं विल जेव्हां दुकानांतून परत येई तेव्हां दिवसभरांत आपण काय काय शिकलों त्याचा ऑर्व्हिल त्याच्यापाशीं पाढा वाची.

असें सबंध वर्ष गेलें. आतां त्या दोघांचीहि एकच महत्त्वाकांक्षा होती : एक आकाशयान बनवायचें आणि आतांपर्यंत कोणी नेलें नसेल इतक्या दूरपर्यंत तें उड्डाण करून न्यायचें.

"तरी पण आपण उड्डाण करणारच," विल्बर थोडा कठोरपणानेंच म्हणाला.

"आपण करूं, तूं खात्री बाळग," निश्चयवंत ऑर्व्हनें सांगितलें.

* * *

प्रकरण चवदावें

# आकाशयान आकारतें

वर्ष लोटलें. आतां केटनें ऑर्व्हिलला दुकानांत जायला मोकळीक दिली. तिघां भावंडांना तो केवढा आनंदाचा क्षण होता! कांहीं तरी नवी वस्तु तयार करण्याचें तर ऑर्व्हिलला नेहमींचेंच वेड. तो आणि विल हे करीत असलेलें अफाट वाचन व अभ्यास हीं आवश्यकच आहेत याची त्यांना जाणीव होती; तथापि खरा आनंद होता तो एखादी वस्तु स्वतःच्या डोळ्यापुढें प्रत्यक्ष आकारलेली बघण्यांत.

दुकानांत पाऊल ठेवतांच ऑर्व्हिलला आपण आपल्या घरीं परत आल्यासारखें वाटलें. तिथला लांकडाचा नि तेलाचा वास ही तर त्याच्या आवडीचीच गोष्ट होती.

नंतर विल त्याला मागीलदारच्या लांकडी खोपटांत घेऊन गेला.

त्या सखल, एक-खोली इमारतींत शिरतांना ऑर्व्हिलचे डोळे मिचकले. एका कोपऱ्यांत गुंडाळलेलें कापडाचें एक मोठें ठाण पडलें होतें आणि दुसऱ्या कोपऱ्यांत एका हलक्या लांकडाच्या कित्येक डझन लांब काठ्या आणून ठेवलेल्या होत्या.

"तूं कामाला आलास कीं हें साहित्य इथं असावं म्हणूनच मी विकत आणून ठेवलंय् तें," विल्बरनें खुलासा केला.

"हें कापड नि काठ्या कशासाठीं आणल्या आहेत, कुणाला माहीत आहे का?" ऑर्व्हिलनें विचारलें.

"केवळ केटला," विलनें हंसून सांगितलें.

"मी प्रत्येकाला सांगितलं आहे कीं, तुला सवड मिळतांच तूं सफरीला जाणार आहेस म्हणून," केट म्हणाली. "अन् त्यासाठीं अर्थातच तुला एखाद-दुसरा तंबू तयार करावा लागणारच, नाहीं का?"

" कुणाला सुद्धां कळतां कामा नये, " ऑरव्हिलनें सांगितलें, " नाहीं तर ते लोक आपल्याला वेड्यांतच काढतील. "

" लोकांचं काय ! मोटारगाडी घोड्याची जागा घेईल असं समजणारांनाहि लोक हंसतात, " केट म्हणाली, " आणि जर का लोकांना समजलं कीं, तुम्ही दोघे आकाशांत उड्डाण करण्याच्या प्रयत्नांत आहांत, तर मग ते काय म्हणतील, कल्पनाच केलेली बरी ! "

" तशी आमची कल्पना आहे, " विल्बरनें दुरुस्ती केली.

" पुढं चला, " केट हुंकारली, " तुम्ही दोघे जेव्हां म्हणतां कीं, तुम्ही कांहीं करून दाखवणार आहांत, तेव्हां तुम्ही तें करतांच. "

" तुझं म्हणणं खरं होवो, केट, " विल्बर गंभीरपणं म्हणाला, " पण, आपण आपल्या योजना लोकांच्या कानाआडच ठेवल्या पाहिजेत. "

आणि त्यांच्यापाशीं अशा किती तरी योजना होत्या. ऑर्व्हिलनें मागविलेल्या एका मासिकांत एक अगदीं नव्या नवलाईच्या वस्तूचें चित्र आलें होतें; तिचें नांव होतें 'मोटर-बोट.' तो एका जर्मन संशोधकाचा शोध होता. वर्टेम्बर्गजवळील एका सरोवरांत ही 'मोटार-बोट' अकरा माणसें बसवून घेऊन जात असलेली चित्रांत दिसत होती. ती आगनाव होती चांगली मोठी थोरली, पण तिचें एंजिन त्या मानानें खूपच लहान होतें.

त्याच आठवड्यांत ' बर्नम ॲण्ड बेली ' ही बडी सर्कस डेटनला आली. आणि विल्बर व ऑर्व्हिल ती पहायला गेले हें सांगायला नकोच. हत्ती, सिंह, किंवा विदूषक यांच्याकडे त्यांचें विशेष लक्षहि नव्हतें; पण त्यांनीं जेव्हां ' बिन-घोड्याची गाडी ' प्रत्यक्ष तेथें पाहिली तेव्हां मात्र डोळे विस्फारून ते पाहूं लागले. ती दिसत होती तर गाडीसारखी, नव्हे ती गाडीच होती, तरी पण तिला घोडा जोडलेला नव्हता. ती एका एंजिनाकडून ओढली जात होती आणि सर्कसवाले तिला 'मोटर' म्हणत. कांहीं वर्षांनंतर लोकांच्या तोंडीं तिचें नांव 'स्वयंचालक' ( Automobile ) म्हणूनच रूढ झालें.

त्यानंतर कांहीं आठवडे त्यांना त्याशिवाय बोलायला कसला विषयच नव्हता.

" एखादी आगनाव एंजिनानं चालवतां येते, " ऑर्व्ह म्हणायचा. " एखादी गाडीहि आपल्याला एंजिनानं चालवतां येते. एखाद दिवशीं आपल्याला आकाशयानहि ( Glider ) एंजिनानं चालवतां येणार नाहीं कशावरून ? "

" तें मात्र मग खरखुरं उडतं यंत्र होईल, " विल्बर म्हणाला. त्याचे डोळे चमकत होते. " मग मात्र आपल्याला वारा नेईल तिकडे जाण्याची पाळी येणार नाहीं. त्याला एखादं सुकाणूंहि बसवितां येईल आणि त्यामुळं आकाशयान हवं तिकडे वळवतां येईल. आगनाव अशी वळवतां येते. "

" चल तर मग आत्तांपासूनच लागूं या उडतं यंत्र बनवण्याच्या कामाला. शुभस्य शीघ्रम्, " ऑर्व्हिल अत्युत्साहानें उद्गारला.

विल्बर हंसला. " जरा सबूर ऑर्व्हि," तो म्हणाला. " प्रथम आपल्याला एक आकाशयान तयार करायचं आहे, मग त्यांतून आपल्याला उड्डाण करून बघायचं आहे — ऑटो लिलिएन्थालनं केलं त्याप्रमाणं. उड्डाणासंबंधीं जेवढं म्हणून कांहीं शिकतां येण्यासारखं असेल तें आपण शिकून घेतलं पाहिजे. त्यानंतर आपल्याला एंजिनाविषयींहि असंच जास्तींत जास्त शिकलं पाहिजे. मग या दोहोंचा समन्वय आपल्याला साधतां आला तर येईल. "

दुसऱ्या दिवसापासूनच त्यांनीं आपल्या त्या छोट्याशा लांकडी कुटींत आपल्या पहिल्या आकाशयानाची आकृति काढण्यास सुरुवात केली. अर्थातच, आतांपर्यंत त्यांनीं ऑटो लिलिएन्थाल व ऑक्टेव्ह शानूट यांनीं वेगवेगळ्या प्रकारच्या आकाशयानाबद्दल जें जें म्हणून कांहीं लिहिलेलें होतें तें सारें वाचून आत्मसात् केलें होतें. त्यांचा हाहि विचार पक्का झाला होता कीं, दुमजली आकाशयानच सर्वांत उत्तम ठरेल. ( पुढील काळांत यालाच 'बायप्लेन' असें नांव पडलें. ) त्यांचें आकाशयान चित्रफलकावर प्रगत होऊं लागलें.

" हें अगदीं बरोबरच व्हायला हवं, " विल्बरनें इषारा दिला, " कारण आकाशयान ही फार मोठ्या रकमेची बाब आहे. आपल्याला तें मोडलेलं परवडणार नाहीं. "

" पण विल, मी सांगतों, " ऑर्व्हि म्हणाला, " हें कागदावर कितीहि बरोबर जमलं तरी तेवढ्यानं नाहीं भागणार. तें आपण उघड्या हवेवर जोंपर्यंत अजमावून पाहिलं नाहीं तोंपर्यंत त्याच्या बरोबरपणाची कांहींच शाश्वती सांगतां येणार नाहीं आपल्याला. "

" तें बरोबर आहे रे, ऑर्व्हि, " विलनें कबुली दिली.

" बरं, त्याचं उड्डाण अजमावून पहायचं झालं तरी तें इथं आसपासहि कांहीं करतां येणार नाहीं, " ऑर्व्हि पुढं बोलतच होता. " लोक आपल्याला

हंसतील. शिवाय आसपास टेकड्या व झाडं यांची नुसती गर्दी झालेली आहे. प्रत्येक वेळीं आकाशयानानं उड्डाण घेतलं कीं, बहुधा एखाद्या झाडावर आदळून गच्छन्ती होण्याचीच धास्ती मोटी. आपल्याला या कामासाठीं अशी जागा शोधून काढली पाहिजे कीं, ज्या ठिकाणीं फारसे वृक्ष नसतील आणि वारहि अगदीं संथपणें वहात असेल. आपल्याला कांहीं टेकड्या जरूर हव्यात, पण त्याबरोबरच सपाट भुसभुशीत मैदानहि असलेल्या जागेची आपल्याला गरज आहे."

"ठीक आहे," विल्बरनें मान डोलावली. "तूं स्मिथ्सोनियन इन्स्टि-ट्यूटला पत्र टाकून विचार कीं, त्यांच्या आढळांत अशी एखादी जागा कुठं आहे का."

ऑर्व्हनें लगेच स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूटला पत्र लिहिलें आणि कनवाळू वृत्तीच्या प्रा. लँगलींनीं तें तसेंच अमेरिकन सरकारच्या हवामान माहिती-केंद्राकडे (Wether Bureau) पाठवून दिलें. हवामान माहिती-केंद्राकडून ऑर्व्हला लिहून आलें, त्यांत संथ वातावरणाच्या व झाडें नसलेल्या अशा अनेक जागांची माहिती दिलेली होती. ऑर्व्ह व विल यांनीं ती माहिती काळजीपूर्वक वाचून पाहिली.

"ही नॉर्थ कॅरोलिनामधली 'किटी हॉक' नांवाची जागा मला बरी वाटते," ऑर्व्हनें म्हटलें.

"किटी हॉक!" विल्बरनें तें नांव पुन्हां उच्चारलें. "नांव तर मोठं छान आहे."

"आपण आकाशयान इथं तयार करूं. तें सोडवूं आणि मग किटी हॉकला जाऊं," ऑर्व्हची सारी योजना आगाऊ तयारच होती.

"बर्फ पडायला लागेपर्यंत आपण थांबूं या," विलनें सल्ला दिला. "त्या दिवसांत दुचाकीचा धंदा एवढा जोरांत नसतो."

"पण कोणाच्या कानावर जातां कामा नये हं हें," ऑर्व्ह म्हणाला.

"फक्त केटशिवाय," विलनें सांगितलें. "आणि बाबा – ते फिरतीवरून परत येतील तेव्हां."

"हो, या दोघांशिवाय दुसऱ्या कुणाच्याहि, असंच म्हणायचं होतं मला," ऑर्व्हनें आपली चूक दुरुस्त करून घेतली.

त्या उन्हाळ्यांत त्यांनीं खरोखरच खूप काम केलें. सकाळीं सहाच्या ठोक्याला ते दोघेहि दुकानांत येऊन हजर व्हायचे. आपलें एकहि गिऱ्हाईक परत जातां नये

अशी त्यांची धडपड असायची. पण रात्रींचे आठ वाजले कीं मग मात्र ते तिथें क्षणभरहि थांबायचं नाहींत. लगेच दुकान बंद करून ते घाईघाईनें आपल्या लांकडी कुटींत शिरायचे. आणि मग त्यांचें खरेंखुरें काम सुरू व्हायचें. कधीं कधीं तर मध्यरात्र होईपर्यंतहि ते घराकडे परतायचे नाहींत; पण तरी सुद्धां त्यांच्यासाठीं गरमागरम जेवण तयार ठेवून केट वाट पहात बसलेली असायची.

" घोड्यावर बसायला शिकण्याचा उत्तम मार्ग कोणता ? " एक दिवस विल्बरनें विचारलें.

" त्याचं असं आहे, " ऑर्व्ह सांगूं लागला, " एखाद्या उंच भिंताडावर किंवा कुंपणावर बसावं आणि दुसरा एखादा घोड्यावर बसायला शिकत असेल तें पहात रहावें म्हणजे तो माणूस काय काय चुका करतो हें तुम्हांला नीट पहातां येईल; तसंच घोडा त्याला सारखा फेकून द्यायचा कां प्रयत्न करीत असतो तेंहि समजेल. मग जेव्हां तुम्हांला यांतला घोड्यावर बसण्याचा चुकीचा मार्ग लक्षांत येईल तेव्हांच तुम्हांला त्यांतला बरोबर कोणता तेंहि समजेल; मग तुम्हांला घोड्यावर बरोबर मांड जमवितां येईल. "

" ही एक पद्धत झाली " विल्बरनें मान्य केलें. " याच पद्धतीनं बहुतेक सारे शास्त्रज्ञ आकाशयानाचा अभ्यास करीत आहेत. तरी पण बरेच लोक घोड्यावर बसायला शिकतात ते रिकिबींत पाय अडकवून अर्धवट वर चढून व प्रत्यक्ष घोड्याच्या पाठीवर बसून. आपण दोन्ही पद्धतींची सांगड घालूं. आपलं आकाशयान तर जवळ जवळ तयार झालं आहे. आपण तें किटी हॉकला जाऊनहि पुरं करूं शकतों. तें जर ठीक वाटलं तर आपण त्यावर आरूढ होऊन तें प्रत्यक्ष चालवूनहि बघूं. "

" आपल्याला पसंत आहे, " ऑर्व्ह म्हणाला.

" आतां या ठिकाणीं – किटी हॉकला कसं जाऊन पोंहोचायचं एवढाच काय तो प्रश्न आहे, " विल म्हणाला.

* * *

## प्रकरण पंधरावें

# किटी हॉक

आज आपण डेटनला विमानांत बसलों कीं सुमारें तीन एक तासांत किटी हॉकला जाऊन पोंहोचतों. परंतु विल्बर व ऑर्व्हि यांना त्या छोट्याशा मासेमारी खेड्यांत जाऊन पोंहोचायला तब्बल एक आठवडा लागला. केप हॅट्टेरास हें अटलांटिक किनाऱ्यावरील एक भयंकर वादळी ठिकाण आहे. येथून जवळ जवळ ६० मैलांवर किटी हॉक पडतें. पण किटी हॉकला मात्र वाऱ्या-वादळाचा उपसर्ग पोंहोचत नाहीं. या ठिकाणीं सगळीकडे वाळूचे उंचवटे पसरलेले दिसतात; मनोहर छोट्या छोट्या टेकड्याहि तिथें आढळतात; पण झाडें मात्र औषधालाहि नाहींत.

"हें अगदीं मनाजोगतं आहे," विल्बर म्हणाला. "आणि सर्वांत उत्तम गोष्ट म्हणजे इथं माणसांची वर्दळ नाहीं. आपण इथं आकाशयान उडवून पाहूं लागलों तर आपल्याकडे 'वेडपे' म्हणून कोणी पहात बसण्याची धास्ती नाहीं."

त्यांनीं तेथें येतांच आपल्याबरोबर आणलेला तंबू ठोकला. केटनें एका लहानशा पेटींत मुरंबा, लोणचें व इतर अनेक पदार्थ भरपूर भरून ठेवलेले होते. घरच्या मेजावर ती मांडीत असे ते सारे पदार्थ तिनें पेटींत भरले होते. विल व ऑर्व्हि यांनीं आपलीं मौल्यवान् पुस्तकें व छोट्या पुस्तिका, पत्रकें आणि सर्व प्रकारचीं हत्यारें आपल्याबरोबर न विसरतां आणलीं होतीं; आणि आतां ते त्या महान् चांचणीसाठीं सिद्ध झाले होते.

किटी हॉकमध्यें – त्यांच्या या चांचणीच्या जागीं – होतें काय? एक सरकारी हवामान निरीक्षण-केंद्र, एक जीव-रक्षक ठाणें आणि या दोहोंमुळें तेथें असलेली एक टपाल-कचेरी. विल्यम् टेट हा तिथला पोस्टमास्तर. विल आणि ऑर्व्हि यांनीं या पोस्टमास्तरणीबाईच्या घरींच आपलें जेवणाचें बस्तान जमवलें.

जेव्हां त्यांनीं आपलें आकाशयान जोडून उभें केलें, तेव्हां त्यांना हंसायला तिथें कोणी नव्हतेंच; होते केवळ इकडे तिकडे हिंडत असलेले कांहीं सागरी पक्षी. त्यांचें हें आकाशयान म्हणजे एक मोठी थोरली वावडी होती आणि तिला खालतीं व वरतीं पंख जोडलेले होते. टेट (या पोस्टमास्तरना दिवसाकांठीं फार तर चार किंवा पांच पत्रांचा बटवडा करावा लागे.) त्या साडग्याकडे कुतूहलानें पहात उभे राहिले; ते हंसले मात्र नाहींत. या दोन गंभीर डोळ्यांच्या तरुणांच्या ठिकाणीं असें कांहीं तरी आगळेपण होतें कीं, ज्यामुळें कोणाला त्यांच्याकडे पाहून हंसण्याची हिंमतच होत नसे. उलट टेट-मास्तरांनीं त्यांना कांहीं मदत हवी का म्हणूनच विचारलें.

आणि त्यांना त्या वेळीं खरोखरीच कोणी तरी मदतनीस हवा होता. 'घोड्यावर टांग कशी मारायची' हें त्यांनीं आत्तांपर्यंत पुरेपूर समजून घेतलें होतें; आतां ते अशा अवस्थेला येऊन पोंहोचले होते कीं, आतां 'घोड्यावर मांड जमवून' त्या ठिकाणीं त्यांना स्थिर व्हायचें होतें. त्या दोघांच्यापैकीं एक जण आकाशयानांत जाऊन बसणार होता. परंतु आणखी कोणी तरी दोघांनीं त्याच्याबरोबर धांवत जाऊन त्या आकाशयानाला 'स्टार्ट' देणें जरूर होतें. जसा एखादा पतंग प्रथम बळेबळेंच वर उडवावा लागतो व एकदां वाऱ्यानें त्याची पकड घेतली कीं, मग तो त्याला वर आकाशांत घेऊन जाऊं लागतो, तसेंच या आकाशयानाचेंहि होतें.

त्यांनीं ओलीसुकी केली. ऑर्व्हिलनें ती जिंकली. तो आतां पहिल्यानें त्या आकाशयानांत चढणार होता.

ऑटो लिलिएन्थाल आणि इतर आकाशयानपटु नेहमीं आकाशयानाच्या खालच्या पंख्यावर ताठ बसत. विल्बरला एकदम एक जुनी आठवण झाली. त्याच्या आईनें अगदीं पहिल्यांदांच 'वातविरोध' हा शब्द वापरला होता तें त्याला स्मरलें आणि जेव्हां तो आपल्या घसरगाडीवर वांकून बसला तेव्हां त्याची घसरगाडी किती वेगानें गेली होती तेंहि त्याला आठवलें. आणि तसेंच ऑर्व्हिलनें आपल्या दुचाकीचें हँडल सखल करून घेतलें व वाऱ्याचा मारा टाळण्यासाठीं तो वांकून बसला, त्यामुळें त्याला दुचाकी किती वेगानें नेतां आली त्याचीहि आठवण त्याला या प्रसंगीं झाल्याशिवाय रहाणें शक्यच नव्हतें.

"पंख्यावर आडवा पड, ऑर्व्ह," विल म्हणाला. "त्यामुळं वातविरोध कमी होईल."

ऑर्व्हिनें मान डोलविली आणि तो आपल्या जागेवर जाऊन बसला. आकाशयान एका वालुकामय टेकडीवर आरामांत पसरलें होतें. विल्बर व टेट-मास्तर हे दोघे त्याच्या दोन बाजूंना जाऊन उभे राहिले. विल्बरनें त्या आकाश यानाच्या दोहों बाजूंना चांगल्या भक्कम दोऱ्या अडकवल्या होत्या. त्या दोऱ्यांचीं सुटीं टोकें त्यानें व टेटमास्तरनीं आपल्या हातीं पक्कीं धरलीं.

" आतां आपण हें आकाशयान टेकडीवरून खालीं ओढीत न्यायचं आहे, " विल्नें टेटमास्तरना समजावून सांगितलें. " आणि मग ... हो ... तें एकदम आकाशांत उडूंहि लागेल. सावधान ? एक ... दोन ... तीन ... चलो ! "

ते त्या टेकाडावरून तें आकाशयान ओढीत तुरुतुरु जाऊं लागले. पण कांहींच घडलें नाहीं. आतां ते धांवूं लागले, अधिकाधिक जोरानें पळूं लागले. आणि मग एकाएकीं ऑर्व्हिल्ची आरोळी ऐकूं आली.

" मी उडतों आहें, " तो ओरडला. आणि खरेंच तें आकाशयान जमिनी-पासून जवळ जवळ पांच फूट वर उचललें गेलं होतें. तें आठ फूट वर चढलें; आणि मग विल्बर व टेटमास्तर यांनीं आपल्या हातीं धरलेल्या दोऱ्या सोडून दिल्या. आकाशयान सुमारें शंभर फुटांपर्यंत किती छान गेलें. – मग मात्र वाऱ्या-च्या एका झोतांत सांपडून तें जवळ जवळ उलटें झालें. खालीं येणाऱ्या वाऱ्याच्या प्रवाहानें तर तें जमिनीवर आणून आदळलें. ऑर्व्हला कांहीं दुखापत झाली नाहीं पण आकाशयानाची मात्र खराबी झाली. पण राइटना त्याची कुठें एवढी पर्वा होती !


" आम्ही असा एक पतंग तयार केला कीं ज्यानं आम्हांला हवेंत नेलं ! " ऑर्व्ह बेभानपणें ओरडला.

" चल तें दुरुस्त करूं आणि पुन्हां प्रयत्न करून बघूं, " विल्बर म्हणाला.

आकाशयानाचें कापड जागोजागीं फाटलें असल्याचें टेटमास्तरांच्या लक्षांत आलें. " तरुणांनो, तुमच्यापैकीं कोणाला शिवण्याचं यंत्र चालवितां येतं का ? "

" वाः कां नाहीं, टेट ! " ऑर्व्हनें उत्तर दिलें.

" मग तर फारच छान ! आमच्या घरीं एक सुंदर नवं शिवण्याचं यंत्र आहे. माझी पत्नी तुम्हांला तें मोठ्या आनंदानं वापरूं देईल. " टेटमास्तर म्हणाले. " हे ... हे पंख ... हातांनीं शिवीत बसण्यापेक्षां यंत्रावर तें काम किती तरी झपाट्यानं उरकेल. "



'पंख !' टेटमास्तर सुद्धां तो शब्द वापरीत होते. ऑर्व्हनें पंखांच्या साहाय्यानें उड्डाण केलें होतें. लोक त्याला कांहींहि म्हणोत – मोठी थोरली वावडी म्हणोत नाहीं तर आकाशयान म्हणोत. आपण पंखांच्या साहाय्यानें उड्डाण केलें एवढें ऑर्व्हला समजून चुकलें होतें. दहा सेकंदच कां होईना पण त्यानें उड्डाण केलें होतें.

दुसऱ्या दिवशीं विल्बरची पाळी होती. तो आदल्या दिवसापेक्षां थोडा अधिक वेळ तरंगत राहिला. आतां प्रत्येक दिवशीं राइट-बंधू आपल्या आकाशयानाची चांचणी पाहूं लागले. जो खालीं जमिनीवर असेल तो काय काय घडे त्याचीं टिपणें घेऊं लागला. त्यांना त्या निरीक्षणांत पुष्कळच नव्या नव्या गोष्टी आढळून आल्या. त्यांना असें आढळून आलें कीं, वारा बरोबर असेल तर ताशीं दहा मैलाच्या वेगानें ते प्रत्यक्ष उडूं शकतात. पतंग उडविण्याच्या बाबतींत किंवा खरें म्हणजे कोणत्याहि प्रकारच्या उड्डाणाच्या बाबतींत तोल सांभाळणें ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे असें त्यांना केव्हांपासूनच वाटत आलेलें होतें. पण त्यांच्या या आकाशयानाला तर तोल सांभाळण्याचें कांहीं साधनच नव्हतें. वाऱ्याचा एखादा जोरदार झोत आला कीं, एक तर तें आकाशयान एका अंगावर कलायचें किंवा जमिनीवर तरी येऊन पडायचें.

" जेव्हां उजवी बाजू वाऱ्यानं कलायला लागेल तेव्हां तूं डाव्या बाजूकडे सरकण्याचा प्रयत्न करून बघ पाहूं," विल्बर विचारपूर्वक म्हणाला. " त्यानं कदाचित् तोल सांभाळला जाईल."

दुसऱ्या वेळीं ऑर्व्हनें तसा प्रयत्न करून पाहिला, परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. त्या वेळीं सुद्धां त्यांना आपलें आकाशयान हव्या त्या दिशेला वळवितां येत नव्हतें. पूर्वी एकदां विल म्हणाला होता त्याप्रमाणें आकाशयान वाऱ्याच्या मर्जीवरच अवलंबून होतें.

दररदिवशीं रात्रींच्या जेवणानंतर टेटमास्तरांच्या स्वयंपाकघरांतच जेवणाच्या मेजापाशीं बसून त्यांच्या गप्पा चालत. त्या दिवशीं त्यांच्या हातून घडलेल्या चुकांचीच चर्चा या वेळीं तेथें चाले. ती सारी चर्चा ते लिहूनहि काढीत. ते त्या वेळीं आकाशयानाला वापरीत होते त्या कापडाला 'सॅटीन' ( हें जवळ जवळ रेशमासारखेंच असतें ) म्हणत. त्यांना अशी शंका येऊं लागली कीं, ह्या कापडांतून हवा 'झिरपत' असावी. यापेक्षां अधिक हवाबंद कापड त्यांना हुडकून काढणें भाग होतें. आणि तसेंच कांहींहि करून आकाशयानाचा तोल सांभाळण्याची व त्याला गरजेप्रमाणें वळवितां येण्याची कांहीं तरी योजना त्यांना करावयास हवी होती.

" मागं आपण आपल्या घसरगाडीला एक सुकाणूं बसवलं होतं तसं एक सुकाणूं बसवूं या याला." ऑर्व्हची ही सूचना विलला एकदम पसंत पडली.

" मात्र आपल्याला सुकाणूं बसवायचं तें आडवं बसवावं लागेल, " ऑर्व्ह म्हणाला. " जमिनीशीं तें समांतर असावं लागेल. त्यामुळं आपल्याला वर किंवा खालीं हवं तसं जातां येईल. आणि तें आपल्याला हवं तसं वापरतां यायला हवं. तें सुकाणूं एका बाजूला कललं कीं आपल्याला वर जातां आलं पाहिजे; दुसऱ्या बाजूला कलतं केलं कीं खालीं उतरतां आलं पाहिजे."

तीन दिवसांत त्यांचें तें सुकाणूं तयार झालें. पण त्यांनीं ते आकाशयानाच्या मागल्या बाजूला न लावतां पुढल्या बाजूला बसविलें. त्याला तसेंच कारणहि होतें. आकाशयानांत बसलेल्या माणसालाच तें सुकाणूं खालतीं किंवा वरतीं फिरवावें लागणार होतें; आणि त्याच्या पाठीमागें असल्यावर त्याला त्याचा हात कसा पोंचणार! विल्बरनें त्याला नांव दिलें, ' फ्रंट एलिव्हेटिंग रडर ' — पुढील बाजूनें वर चढविणारें सुकाणूं. ( कॉन्स्टलेशन विमानाच्या एखाद्या वैमानिकाला विचारा कीं, ' फ्रंट एलिव्हेटिंग रडर कोणतं हो ? ' — तो लगेच तुम्हांला तें दाखवील. )

आतां पुन्हां उड्डाण करण्याची पाळी विल्ची होती. या वेळीं पुन्हां टेट-मास्तरच मदतीला पुढें सरसावले. वारा आतां पूर्वीपेक्षां फार ताठ झाला होता. कारण नोव्हेंबर महिना चालू झाला होता आणि हिंवाळा ( हेमंत ऋतु ) जवळ येऊं लागला होता. आकाशयान आकाशांत सहज उंच उडालें. पंधरा फूट तें वर गेलें तेव्हां विल्बरनें सुकाणूंचा उपयोग केला. त्यानें दोन्ही दोऱ्या ओढल्या त्यामुळें आकाश-यानाचा पुढील भाग वर उचलला गेला; आणि लगेच आकाशयान एकदम आणखी पंधरा फूट वर झपाट्यानें चढलें. मग त्यानें त्या दोऱ्या पुन्हां ओढल्या; त्याबरोबर आकाशयानाचें नाकाड खालीं होऊन तें वेगानें खालीं उतरूं लागलें. विलनें आकाशयान पुन्हां वर चढविण्याच्या हेतूनें त्या दोऱ्यांना जोरानें हिसडा देण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या गडबडींत त्यांतली एक दोरीच तुटली आणि आकाशयान सरळ नाकावर होऊन वाळूच्या टेकाडावर खालीं येऊन आदळलें.

ऑर्व्हनें लगेच तिकडे धांव ठोकली. तो मनांतून खचल्यासारखा झाला होता. कारण विल्बर व त्याचें आकाशयान हीं वाळूंत जवळ जवळ एकमेकांत मिसळून गेल्यासारखीं दिसत होतीं. पण विल्बर सुखरूप होता. त्याला कुठें लागलें, खरचटलें सुद्धां नव्हतें. त्या धक्क्यानें त्याला थोडा वेळ सुन्न झाल्यासारखें झालें; परंतु तो लगेच हंसूंहि लागला.

" आपण हें करून दाखवलं ! " तो ओरडला. " आपण याला वर नेलं आणि खालींहि यायला लावलं. आतां वारा आपला 'मालक' नाहीं राहिला. त्याचं वर्चस्व आपण झुगारून दिलं. "

" पण या आकाशयानाची स्थिति बघितलीस का ? " ऑर्व्ह खिन्नपणानें म्हणाला. " त्याचा पार चुराडा होऊन गेलाय्. "

" अरे, आपण दुसरं बांधूं, " विलनें सांगितलं. " याहून चांगलं. टेट-मास्तर, तुम्हांला या कापडाचा उपयोग असला तर पहा. "

" आपल्या चिमखडीसाठीं आमच्या बाईसाहेब याचे चांगले कपडे शिवतील कीं, " टेटमास्तर हंसून म्हणाले.

" आतां आम्ही चंबूगबाळं आवरून घराकडे परतणार, " विल म्हणाला. " पण पुढल्या वर्षी पुन्हां परत येणार बरं का. "

त्यांनीं लगेच आपल्या सामानाची बांधाबांध केली. त्यांच्या निघण्याच्या दिवशीं टेटबाईंची छोटी मुलगी त्यांच्याकडे आली. तिनें अंगावर फार छान पोषाख घातला होता. तिच्या हें गांवींहि नव्हतें कीं, आजवर तयार झालेल्या आकाशयानांतील सर्वांत महत्त्वाच्या आकाशयानाचा कांहीं अंश आपण अंगावर धारण केला आहे. – पहिलें आकाशयान, कीं जें वैमानिकाला आपल्या इच्छेप्रमाणें खालीं किंवा वर वळवितां येत होतें. हवेवर जय मिळविणारें हेंच पहिलें आकाशयान होतें.

* * *

प्रकरण सोळावें

# आकाशयान प्रगत होतें

" होतां तरी कुठं तुम्ही दोघेहिजण इतके दिवस ! "

दोघेहि भाऊ डेटनला परत आले. दुकानांत येऊन आपल्या कामाला लागले. पहिल्याच्च दिवशीं त्यांना एका गिऱ्हाइकानें हा प्रश्न केला.

" गेलों होतों सहलीला, " विल्बरनं सहज उत्तर दिलें. आणि तें कांहीं खोटें नव्हतें. किटी हॉकला वालुकामय टेकाडांवर नव्हती का त्यांची सहल गेली ! पण त्यांनीं तिथें काय काय घडलें, याची सारी हकीगत फक्त दोघांनाच सांगितली — एक त्यांचे वडील व दुसरी केट.

त्यांनीं दोन गोष्टी अशा केल्या होत्या कीं, तत्पूर्वी जगांत कोणाच्याहि हातून घडलेल्या नव्हत्या. वैमानिक म्हणून तळच्या पंखावर बसून त्यांनीं आकाशयानांतून उड्डाण केलें होतें; आणि तसेंच त्यांनीं सुकाणूंच्या साहाय्यानें आकाशयान खालीं किंवा वर नेऊन दाखविलें होतें. डेटनमधल्या लोकांच्या दृष्टीनें, ते दोघे साधे दुचाकी-कारागीर होते. पण मोठमोठ्या शास्त्रज्ञांना व यंत्रज्ञांना आजवर कधींहि न जमलेली गोष्ट त्यांनीं करून दाखविली होती.

तिकडे इंग्लंडमध्यें हिरम मॅक्झिम ' उडत्या यंत्रां 'वर प्रयोग करीत होता. आणि इंग्लिश सरकारनें त्याला पैशाचें व साधनसामग्रीचें पाठबळ पुरविलें होतें. पण त्यानें स्वतः मात्र आकाशयानांत बसून कधींच वर उड्डाण केलेलें नव्हतें. त्यानें प्रतिकृति तयार करून त्या उडविल्या होत्या. या प्रतिकृतींची हवेंतील क्रिया त्यानें लेख लिहून समजावून दिली होती.

या मॅक्झिमचाच्च एक लेख वाचून विल्बर म्हणाला होता कीं, " तुम्हांला घोड्यावर बसायला शिकायचं असेल तर त्याच्या पाठीवर मांड ठोकून व दौड करूनच तुम्हांला तें शिकतां येईल. "

" दुचाकीचंहि तसंच आहे, " ऑर्व्ह म्हणाला. " यांतलंहि इंगीत शिकायचं असेल तर अगोदर चार-दोन धडका खाव्याच लागतात. "

शिकागोच्या ऑक्टेव्ह शानूटचेच बरेच लेख त्यांनीं वाचले होते. तो नुसत्या प्रतिकृति करीत बसलेला नव्हता. हा गृहस्थ साठीच्या घरांत गेलेला असूनहि आकाशयान तयार करून त्यांत स्वतः बसून तो उड्डाण करून पहात होता. किटी हॉकला आपल्याला आलेले अनुभव या वृद्ध माणसाला कळवायचे असें त्या दोघांनीं ठरविलें. शानूट हा एक यंत्रज्ञ होता तसाच शास्त्रज्ञहि होता; त्यामुळें त्याच्या हातीं राइट-बंधूंचें पत्र पडून त्यानें तें वाचलें तेव्हां त्याला धक्काच बसला असेल. या दोन सामान्य दुचाकी-कारागिरांनीं जें करून दाखविलें तें ऑटो लिलिएन्थालला किंवा स्वतः शानूटलाहि आजवर साध्य झालेलें नव्हतें. त्यानें त्यांना पत्र लिहून त्यांचें अभिनंदन केलें आणि आकाशांतील उड्डाणाबाबतचें स्वतःच्या अनुभवाचें कांहीं नवें ज्ञानहि त्यानें त्यांना लिहून कळविलें.

शानूटनें जें लिहून पाठविलें होतें तें सारें विल व ऑर्व्ह यांनीं अगदीं आधाशासारखें आत्मसात् केलें. मग ते पुन्हां आपल्या कामाला लागले. आकाशयानाला सुकाणूं बसवून तें खालीं किंवा वर नेण्याचें त्यांना साधलें होतें. पण तेंच उजव्या किंवा डाव्या बाजूला कसें वळवायचं ? विल आणि ऑर्व्ह यांनीं पक्षी अंतराळांत उड्डाण घेऊन कसे वळतात याचें पुनः पुन्हां निरीक्षण केलें. पक्ष्याला आकाशयानापेक्षां एक मोठी सोय होती. त्याला आपले पंख आपल्या इच्छेप्रमाणें खालीं किंवा वर करतां येत. उडत असतांनाच एखादा पक्षी जेव्हां वळण घेतो तेव्हां त्याचा एक पंख दुसऱ्यापेक्षां बराच वर उचललेला असतो. विल व ऑर्व्ह यांनीं अशा खालींवर करतां येण्याजोग्या पंखांबद्दल चर्चा केली; परंतु तसे पंख बनविणें कांहीं शक्य कोटींतलें दिसेना.

याशिवाय तोल सांभाळण्याचा प्रश्न होताच. माणसानेंच त्यासाठीं उठून आपला भार उजव्या किंवा डाव्या बाजूला सरकवणें यांत कांहीं अर्थच नव्हता.

" मला वाटतं, " ऑर्व्ह एक दिवस म्हणाला, " जर दुसरं आणखी एक सुकाणूं याला जोडलं तर ? – उभं सुकाणूं. त्यानं तोल सांभाळायला मदत होऊं शकेल. "

" शक्य आहे, " विल्बरनें म्हटलें. " पुढल्या वेळीं आपण किटी हॉकला जाऊं तेव्हां हा प्रयोग करून बघूं. तोंवर त्याची आकृति तर चित्रफलकावर काढूं. "

हें उभें सुकाणूं आकाशयानांत मागल्या बाजूला बसवायचें कीं पुढल्या? त्यांना वाटलें कीं, तें मागील बाजूलाच लावून बघावें. तेवढाच कमी वातविरोध. पण मग आडवें सुकाणूं तिथेंहि आणखी ठेवलें तर? आकाशयानाचें तें चमत्कारिक दिसणारें 'शेपूट' आकार धारण करूं लागलें. ( तुम्ही पुन्हां जेव्हां विमान पहाल तेव्हां त्याचें शेपूट पहा. तुम्हांला तिथें उभें व आडवें अशीं दोन्ही सुकाणवें दिसतील. )

" याचा अर्थ आपलें यापुढलं आकाशयान बरंच मोठं असावं लागेल, " विल्बर म्हणाला. " पंख जितके विस्तृत तितकं तें अधिक वेळपर्यंत आकाशांत तरंगेल. "

" आणि तितकं अधिक उंचहि जाईल, " ऑर्व्हनें पुस्ती जोडली.

" अन् तितकीच तुमच्या गच्छंतीचीहि शक्यता अधिक! " केट मध्येंच बोलली. केट आतां एका प्रशालेंत ( हायस्कूल ) शिकवीत असे. तरी पण घरचा सगळा भार तिच्यावरच होता. आणि अजूनहि हे दोघे भाऊ आपल्या योजनांबद्दल त्या एकटीशींच चर्चा करीत.

ऑर्व्ह हंसला आणि म्हणाला, " आम्ही सांभाळून राहूं, केट. "

" ऑटो लिलिएन्थालहि सांभाळूनच होता; पण तो ठार झाला! " तिनें उदाहरणच दाखविलें.

अधिकाधिक वर उड्डाण व्यायचें म्हणजे अधिक धोक्याचें आहे हें विल्बरला व ऑर्व्हलाहि दिसत होतें. पण त्यांना तो धोका पत्करण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें.

आणखी दोन वेळां ते किटी हॉकला जाऊन आले. या वेळचें त्यांचें रहाणें बऱ्याच दिवसांचें होतें. या वेळचें त्यांचें आकाशयानहि पहिल्यापेक्षां चांगलेंच मजबूत होतें. पण उभें सुकाणूं काम देईल का? त्यांची ही शंका दूर झाली. तें चांगलेंच उपयोगी ठरलें. त्यांनीं तीनशें फुटांचें एक उड्डाण केलें. त्यांच्या दृष्टीनें तें विक्रम स्थापणारें होतें, परंतु ते त्याबद्दल कोणापाशींच बोलले नाहींत. तें माहीत झालें होतें फक्त टेटमास्तरना आणि दुसरें समुद्रपक्ष्यांना – सी गल्सना. या आकाशयानांत तोल साधलेला होता. तें फारसें हेल्कावत नव्हतें.

" आपण जर तें उभं सुकाणूं जहाजाच्या सुकाणवासारखं हवं तसं फिरवतां येण्याजोगं केलं तर त्यानं आपल्याला आकाशयान हवं तसं वळविणं शक्य होईल, असं वाटतं, " ऑर्व्हनें सुचविलें. दोघां पटाईत यंत्रज्ञांना हें काम म्हणजे कांहींच

नव्हतें. आणि तें चांगलें काम देत असल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. सर्वांत विशेष म्हणजे उभें व आडवें सुकाणूं एकत्र आणल्यामुळें आतांपर्यंत तयार झालेल्या कोणत्याहि आकाशयानापेक्षां त्यांचें हें आकाशयान अधिक सुरक्षित झालें. आतां तें एकदम नाकाड खालीं करून सुरकांडी मारीनासें झालें किंवा त्याचें हवेंतल्या हवेंतच कोलांट्या खाण्याचेंहि बंद झालें. तें आतां स्थिर झालें.

" आपल्याला दररोज सराव करायला हवा, " विल्बर म्हणाला. " आकाशयानाचं इंगित आपल्या हातीं यायला हवं; – जसं आपण नव्या दुचाकीच्या बाबतींत करून पाहिलं होतं तसं. "

दिवसभर ते आळीपाळीनें उड्डाण करीत. जीवरक्षक ठाण्यांतील दोन गृहस्थांना मुलगे होते; आणि हीं मुलें आकाशयान उडविण्याला मदत करायला अगदीं एका पायावर तयार असत. हळूहळू विल व ऑर्व्ह या दोघांनाहि त्यांतलें मर्म समजूं लागलें. आकाशयान आपण वळवूं शकतों, वर नेऊं शकतों किंवा खालींहि उतरवूं शकतों, हें आतां त्यांना समजून चुकलें. पूर्वीं या दोन सुकाणवांची दिशा बदलण्यासाठीं ते दोरांचा उपयोग करीत त्याऐवजीं ते आता पियानोच्या तारा वापरूं लागले; आणि या तारा खेचण्यासाठीं त्यांनीं तरफांचा उपयोग सुरू केला.

किटी हॉकच्या या तिसऱ्या सफरींत त्यांनीं आपलें सर्वांत अधिक लांबीचें उड्डाण केलें तें ६२२ फुटांचें. आकाशयान २६ सेकंदपर्यंत हवेंत राहिलें होतें. जर त्यांना २६ सेकंदपर्यंत हवेंत तरंगतां येत होतें, तर त्यापेक्षां दुप्पट किंवा तिप्पट वेळ कां रहातां येऊं नये? त्यांनीं तिथून सुमारें दोन मैलांवर असलेलें एक वाळूचें टेकाड शोधून काढलें व त्यावरून उड्डाण केलें. आतांपर्यंत खरें म्हणजे त्यांनीं उंचावर जाण्याचा प्रयत्न केला नव्हता. शंभर फुटांवरून खालीं कोसळणें म्हणजे घातक ठरेल इतकें त्यांना अर्थातच समजत होतें; पण वीस-एक फुटांवरून खालीं पडण्यानें फार तर थोडेंसें खरचटेल इतकेंच. पण आतां आपलें आकाशयान आपल्या चांगलेंच कह्यांत आलेलें आहे अशी त्यांची खात्री झाली होती.

ऑर्व्ह नियंत्रकां- ( Controls ) पाशीं होता. आकाशयान वर उठलें तसें एका 'ऊर्ध्व' वातप्रवाहानें त्याला चांगलें दोनशें फूट वर उचलून नेलें. ऑर्व्ह भलत्याच उंचीवर गेला होता; आणि तितक्या उंचीवरून खालीं बघतांना तो थोडासा अस्वस्थहि झाल्याशिवाय राहिला नव्हता. पण त्याच्या एक गोष्ट लक्षांत आली

कीं, तेवढ्या उंचीवर आकाशयान काबूंत ठेवणें हें अधिक सोपें जात होतें. त्यामुळें त्यानें आडवें सुकाणूं थोडें तिरकें केलें आणि आकाशयान आणखी पन्नास फूट वर चढलें. त्यानंतर वारा पडला आणि आकाशयान खालीं जमिनीवर उतरलें. ऑर्व्ह पन्नास सेकंद वर राहिला होता. ऑटो लिलिएन्थाल सुद्धां इतका वेळपर्यंत तरंगत राहिला नव्हता.

"अजून आपल्याला यांत किती तरी सुधारणा करतां येण्यासारख्या आहेत," ऑर्व्ह त्या रात्रीं म्हणाला. "आपण एक दुमजली आडवें सुकाणूं तयार करायला हवं आहे असें माझ्या मनांत येतंय्. मला वाटतं त्यामुळं आपल्याला अधिक वेळपर्यंत तरंगत रहातां येईल."

"मलाहि पण आणखी कांहीं कल्पना सुचताहेत, ऑर्व्ह," विल्नें सांगितलें. "पण मला वाटतं आपल्याला त्या यरींच अधिक चांगल्या तऱ्हेनं करून पहातां येतील."

पुन्हां त्यांनीं आपलें चंबूगवाळें आवरलें आणि डेटनकडे परत प्रयाण केलें.

* * *

...ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

प्रकरण सतरावें

# ' दि राइट एंजिन '

पुढलीं कांहीं वर्षे खूप खळबळीचीं होतीं. श्री. शानूट राइट-बंधूंच्या भेटी-साठीं आले व त्यांनीं स्वतः चालविलेल्या प्रयोगांबद्दलची माहिती त्यांना दिली. त्यांनीं आपल्या पहिल्या आकाशयानाविषयीं त्यांना सांगितलें – त्याला पांच मजले होते. त्यानंतर त्यांनीं एक तिमजली आकाशयान तयार करून बघितलें होतें. पण तीं सर्व फार अवजड झालीं होतीं. विल्बर आणि ऑर्व्हप्रमाणेंच अखेर शानूट-सुद्धां याच निर्णयाप्रत आले होते कीं, एकावर एक याप्रमाणें दोन पंखे असलेलें आकाशयान यावर एकमेव उपाय होता. तथापि शानूटनीं जरी दोनशेंहून अधिक आकाशयानें तयार करून पाहिलीं होतीं तरी या दोन दुचाकी-कारागिरांनीं बनविलेल्या आकाशयानाइतकें बळकट आकाशयान बनविणें मात्र त्यांना कधींच जमलें नव्हतें.

राइट-बंधूंनीं शानूटचा खूप गौरव केला. आकाशयानें बनविणें हा शानूटचा गेल्या तीस वर्षांचा छंदच होता. तरी पण साठी ओलांडून गेल्यावरहि ते स्वतः अशा एखाद्या आकाशयानांतून स्वतः उड्डाण करूं शकले नव्हते. आतां तर त्यांनीं सत्तरी गांठली होती.

" पण तुम्ही दोघेच असे आहांत कीं, ज्यांनीं आकाशयानाला शक्तीची ( power ) जोड देऊन खरंखुरं ' उडतं यंत्र ' बनविण्याची हिंमत धरली आहे, " शानूट उत्साहानें म्हणाले. " मला तुम्हांला मदत करण्याची इच्छा आहे. मी तुम्हांला पैसे देतों; म्हणजे तुम्हांला हा दुचाकीचा धंदा बंद करून सारा वेळ या कामांतील प्रयोग करण्यासाठीं देतां येईल. "

विल्बर हंसला आणि मान हालवीत म्हणाला, " आम्हीं कोणाकडून कधीं उसनवार पैसे घेतले नाहींत. घेतलेच ते फक्त आमच्या आईकडून. आणि आतां यापुढं उसनवारी करावी असं आमच्या मनांत सुद्धां नाहीं. "

त्यांनीं आपल्या एंजिनांचा अभ्यास पुढें चालूच ठेवला. त्यांना असें एक शक्तिवान् एंजिन हवें होतें कीं, जें वाऱ्याच्या विरुद्ध टिकाव धरून त्यांचें आकाशयान उडवूं शकेल; पण तितकेंच तें आकाशयान हवेंत तरंगविण्याइतकें हल्केंहि असायला हवें होतें.

वॉशिंग्टनमध्यें प्राध्यापक लँगले यांनीं, आपण एक 'उडणारें यंत्र' तयार केलें असल्याचें जाहीर केलें होतें. त्यांच्यापाशीं खरोखरीच तें होतेंहि. त्यांत अडचण एकच होती कीं, तें हवेंत वर जाऊं शकत नव्हतें. त्यांनीं तें उडवून पहाण्याचा प्रयत्न केला, परंतु तें अवजड यंत्र कांहीं केल्या जमिनीवरून वर उडचनो.

फ्रान्समध्यें सॅन्टॉ ड्यूमाँ या नांवाच्या एक तरुण माणसानें एका बलूनलाच एक एंजिन जोडून तें प्रत्यक्ष उडवून दाखविलें होतें. हें पहिलें 'उड्डाण' होतें, परंतु त्यांची गति फारच मंद होती आणि वाऱ्याच्या विरुद्ध फारसें तें पुढें जाऊंहि शकलें नाहीं. शिवाय तो 'हवेपेक्षां हलका' प्रयोग होता. परंतु राइट-बंधूंची धडपड 'हवेपेक्षां जड' उडणारीं यंत्रें तयार करण्यासाठीं होती.

अजूनहि त्यांनीं आपल्या योजनांची वाच्यता केली नव्हती. सन १९०० मध्यें माणूस हवेंत उडूं शकतो असें म्हणणें हास्यास्पद ठरत होतें. इतकेंच नव्हे तर, या बाबतींत विज्ञानशास्त्रज्ञांना तरी बऱ्याच गोष्टी अधिक कळत होत्या ना ? पण तेहि या कल्पनेची टिंगल करीत. फार काय, यांपैकीं एका पंडितानें तर मासिकांत लेख लिहून असें बजावलें कीं, "माणूस आणखी हजार वर्षें हवेंत उडूं शकणार नाहीं." वॉशिंग्टनमधील बिचारा प्रा. लँगले हा लोकांच्या हंसण्याचा एक विषय मात्र झाला होता.

श्री. शानूट मात्र या हंसणारांच्यांत सामील नव्हते. त्यांच्यासारखेच आणखीहि कांहीं थोडे लोक होते. शानूटला डेटनमधील या दोन तरुण माणसांत कांहीं वेगळीच प्रज्ञा आहे याची जाणीव झाली होती. या दोघांनीं कोणत्या विद्यापीठांत शिक्षण घेतलें नव्हतें; ते स्वतःचे स्वतःच शिकले होते. तरी सुद्धां वायुदाब, हवेचा प्रतिकार, आकाशयानांसाठीं वापरल्या जाणाऱ्या सामानाची शक्ति याबाबत तत्कालिन जगांतील कोणाहि माणसापेक्षां त्यांना अधिक ज्ञान होतें. तसेंच ते तत्कालिन जगांतले दोन सर्वांत उत्तम वैमानिकहि होते. त्यांनीं आपल्या आकाशयानांतून हजारांच्यावर उड्डाणें तोंवर केलेलीं होतीं. आकाशयानाचें 'इंगित' त्यांच्या हातीं आलेलें होतें.

किटी हॉक तेथून फार दूर पडे. त्यामुळें राइट-बंधूंनीं आपले पुढले प्रयोग डेटनमधील एका गायरानांतच चालू ठेवले. या वेळीं ते आकाशयानांत बसतांना आपल्याबरोबर एक वाळूचें पोतें घेऊन चढत. एक माणूस आणि त्याच्या जोडीला शंभर पौंड वजनाचें वाळूचें पोतें इतकें वजन घेऊन आकाशयान हवेंत राहूं शकतें असा अनुभव आला.

परंतु त्या काळांतील स्वयंप्रेरित एंजिनांचें ( Automobile Engines ) वजन तीनशें पौंड तरी कमींत कमी असे. त्यामुळें आपल्या आकाशयानाला शक्तीची जोड देण्यासाठीं त्यांना असलें यंत्र वापरतां येत नव्हतें; तें त्या दृष्टीनें फारच अवजड होतें.

आकाशयानांत हळूहळू सुधारणा करण्याचा त्यांचा उद्योग चालूच होता. त्यांचें आकाशयान दिवसानुदिवस अधिक बळकट व अधिक हलकें होत होतें. अखेर आपलें आकाशयान सुमारें दोनशें पौंडाची वाळू आपल्याबरोबर घेऊन जाऊं शकतें अशी त्यांची खात्री झाली. आतां दोनशें पौंड वजनाचें एखादें चांगलें एंजिन मिळवितां आलें तर आपण खरोखरच हवेंत उडूं शकूं असा विश्वास त्यांना वाटूं लागला.

पण जगांत अशा प्रकारचें एंजिन कोणीच तयार केलेलें नव्हतें.

" आपणच असलं एखादं एंजिन बनविलं तर ? " ऑर्व्हिलनें म्हटलें.

" माझ्याहि तेंच मनांत येतंय्. " आणि विल्बर हंसला. " नाहीं तरी आतांपर्यंत आपल्यासाठीं कोणीं काय बनवून दिलं आहे ? "

दुकानामागच्या लांकडी घरांत त्यांचा तसें एंजिन बनविण्याचा उद्योग सुरू झाला. तत्त्वतः आज विमानांचीं एंजिनें आहेत, जवळ जवळ तसेंच हेंहि एंजिन होतें. तें गॅसोलिनवर चाले. त्याला 'कार्ब्यूरेटर' आणि 'स्पार्क-प्लग' होते. पण 'सेल्फ स्टार्टर'ची सोय मात्र त्यांत अर्थातच नव्हती. कित्येक वेळां रात्रीं लोक त्या बाजूनें जात येत असले म्हणजे दचकत. कारण राइट सायकल कंपनीच्या मागल्या अंगानें यांत्रिक बंदुकांतून फैर झडावी तसा आवाज त्यांच्या कानांवर येई.

" त्या दोघां खुळ्या राइट-बंधूंच्या डोक्यांत तें वेड पुन्हां आलेलं दिसतंय्, " ते लोक हेटाळणीनें हंसून म्हणत.

गांवांत मात्र अशी वदंता पसरली कीं, हे दोघे भाऊ दुचाकीला जोडतां येण्यासारखें एक एंजिन बनविण्याचे प्रयोग करण्यांत गुंतले आहेत. त्यामुळें त्या

लांकडी घरकुलांतून ऐकूं येणाऱ्या तीव्र स्फोटांचा उलगडा झाला. बहुतेक हा उद्योग केटचा असावा.

एंजिन पूर्ण आकाराला येऊं लागलें. विल आणि ऑर्व्ह यांना आतां एक मदतनीसहि लाभला होता – विश्वासू चार्ली टेलर. तोहि एक चांगल्यापैकीं यंत्र-विशारद होता. दिवसा ते दोघे भाऊ आंत कामांत गुंतलेले असले म्हणजे बाहेर-च्या दुकानाची व्यवस्था टेलरच पहात असे. आणि रात्रीं तो त्यांना त्या लांकडी घरकुलांत जाऊन प्रत्यक्ष मदतहि करीत असे. या गुप्त यंत्रघरांत बाहेरच्या फक्त दोघांनाच प्रवेश होता – एक केट आणि दुसरा टेलर.

शक्तिमान एंजिन बनविणें हें तसें सोपें होतें. खरी अडचण होती ती तें आवश्यक तितकें हल्कें करण्याची. मोटारींतील एंजिनाची पेटी हा सर्वांत वजनदार भाग. तो ओतीव लोखंडाचा केलेला असे.

"आपण जर हा भाग ॲल्युमिनियमचा बनविला तर तो पुष्कळच हल्का होईल." ऑर्व्हला एक दिवस सुचलें.

"पण तो पुरेसा बळकट राहील का ?" विल्बरनें शंका काढली.

"प्रयत्न करून पहायला तर हरकत नाहीं," ऑर्व्हनें उत्तर दिलें. लगेच त्यांनीं तें करूनहि बघितलें. तें हल्कें व बळकटहि असल्याचें दिसून आलें. या एंजिनाला चार सिलिंडर्स होतीं व तें आठ अश्वशक्तीचें होतें. (गेल्या महायुद्धांत लढाऊ विमानांचीं एंजिनें १५०० अश्वशक्तींचीहि होतीं.) गंमत म्हणजे आजहि एंजिनाची शक्ति 'अश्वशक्तीं'तच मोजली जाते.

पूर्वीच्या काळीं एक घोडा किती वजन ओढूं शकतो हें कोणाहि एखाद्या सर्व-साधारण शेतकऱ्याला माहीत असे. ज्यांनीं पहिलीं पहिलीं एंजिनें बनविलीं ते म्हणत, "हें एंजिन, चार घोडे ओढतील एवढें ओझें ओढूं शकेल." आणि मग हळूहळू ते अशा एंजिनला म्हणूं लागले – "चार अश्वशक्ति-एंजिन." (अश्व म्हणजे घोडा.) आज सुद्धां एखादें एंजिन जर 'हजार अश्वशक्तीचें' असेल, तर त्याचा अर्थ, हजार घोडे एकाच वेळीं जेवढें ओझें ओढूं शकतील तेवढें ओझें हलवूं शकणारें तें एंजिन असतें.

राइट-बंधूंचें नवें आठ अश्वशक्तीचें एंजिन बरोबर दोनशें पौंड वजनाचें होतें. जेव्हां तें पुरें झालें तेव्हां विल व ऑर्व्ह यांनीं स्प्रूसच्या लांकडी ओंडक्यां-तून दोन 'पंख' (प्रॉपेलर्स) खोदून काढले.

"खूप वर्षांमागं वडिलांनीं आपल्याला एक खेळणं दिलं होतं, आठवतं विल?" ऑर्व्हनें विचारलें.

"हेलिकॉप्टर? बरोबर, मला चांगलं आठवतं," आणि विल्बर हसूं लागला. "गंमत आहे हं – आपण खरोखरच एक जंगी खेळणं तयार करीत आहोंत. त्या छोटया खेळण्याप्रमाणें याचेहि दोन पंख (प्रॉपेलर्स) परस्पर विरुद्ध दिशांना फिरताहेत."

"मलाहि त्याची चांगली आठवण आहे," केट गंभीरपणें म्हणाली. "माझ्या हेंहि स्मरणांत आहे कीं, तें एका झाडावर जाऊन आदळलं अन् त्याचे तुकडे तुकडे झाले!"

"किटी हॉकला कांहीं झाडं नाहींत, केट," विल्बरनें तिला आठवण दिली.

"आणि आम्ही तिथंच उड्डाण करायला जाणार आहोंत," ऑर्व्ह म्हणाला.

* * *

स्थळप्रत.
अनुक्रम वि. ...................
क्रमांक ........................ नों: दि: ...............

प्रकरण अठरावें

# उडणारें यंत्र

किटी हॉकमध्यें कांहीं फारसा बदल झालेला नव्हता. विल्यम टेट थोडा अधिक म्हातारा झाला होता; पण राइट-बंधूंच्या पहिल्या भेटीच्या वेळीं होता तितका तो आतां कामांत गुंतलेला नव्हता. वाळूच्या टेकाडांवर अधूनमधून वादळें उठत, त्यांच्यापासून आपलें आकाशयान व त्याचें एंजिन सुरक्षित ठेवण्यासाठीं एक लांकडी खोपट बांधण्याचें काम राइट-बंधूंनीं चालविलें होतें. टेटमास्तरनीं या कामांत त्यांना साहाय्य केलें. नंतर विल व ऑर्व्ह यांनीं त्यांना एक काम नेमून दिलें – दररोज सकाळीं जंगलांत जाऊन त्यांच्यासाठीं जळणाचें लांकूड आणण्याचें. त्यासाठीं ते त्याला दिवशीं एक डॉलर रोजमुरा देऊं लागले.

दिवसभर ते आपलें आकाशयान व एंजिन यांच्याशीं काम करण्यांत गढलेले असायचे. त्या वस्तु दिसायला मोठ्या विचित्र असायच्या. जवळच्या जीवरक्षक केंद्रांतील लोकांनीं जेव्हां तें पाहिलें तेव्हां त्यांनीं माना मुरडल्या.

" काय हो, याला तुम्ही आकाशांत उडायला लावणार आहांत ? " त्यांपैकीं एकानें विल्बरला विचारलें.

" बघूं, बघूं, " विल म्हणाला.

" किती दिवसापासून चालवलाय् तुम्ही हा उद्योग ! " दुसऱ्या एकानें प्रश्न केला.

" आयुष्यभर, " ऑर्व्हिलनें उत्तर दिलें. आणि तें खरेंच होतें.

त्यांच्या पहिल्या उडणाऱ्या यंत्राला त्या वेळीं 'विमान' हा शब्द प्रचारांत नव्हता. चाकें नव्हतीं. विल व ऑर्व्ह यांनीं दोन लांकडी 'मार्ग' ( tracks ) तयार करून ते बाहेर वाळूवर नेऊन रचले. या लांकडी मार्गावरून त्यांना आपलें

उडणारें यंत्र सोडावयाचें होतें. पुनः पुन्हां त्यांनीं आपल्या एंजिनची चांचणी घेतली. त्याचा आवाज भयंकर होता आणि त्यामुळें सारें आकाशयान हादरून जात होतें. तरी पण तें खालच्या पंखाला बळकट जखडलेलें असल्यामुळें बाहेर फेकलें जाण्याची भीति नव्हती. निदान त्यांना तशी आशा होती.

" मला वाटतं, आपण आज आतां याचा प्रयोग करून पहावा, " विल एक दिवस सकाळींच सहज म्हणाला. तो दिनांक १७ डिसेंबर १९०३ चा दिवस होता. विल्ला त्या वेळीं कोठून कल्पना यायला कीं, हा दिवस शाळांतील मुलें-मुली कायम शिकत रहातील म्हणून. १७ डिसेंबर १९०३ हा इतिहासांतील एक अत्यंत महत्त्वाचा दिनांक ठरलेला आहे.

" आम्ही कधींहि तयार असूं तसेंच आजहि होतों, " ऑर्व्ह अगदीं सहजपणें बोलला.

बाहेरून ते दोघेहि भाऊ शांत दिसत होते; पण कांहीं झालें तरी तेहि माणूसच होते. आणि आपल्याला अशी खात्री बाळगायला हरकत नाहीं कीं, ते त्या दिवशीं आंतून अस्वस्थ झालेले होते. त्यांनीं ओली-सुकी केली आणि त्यांत ऑर्व्हनेंच पहिल्यानें त्या यंत्राची प्रत्यक्ष चांचणी घ्यावी असें ठरलें.

" मी आज हवेंत उडणार आहें, " ऑर्व्ह स्वतःशींच कुजबुजला. " हवेंत उडणारा जगांतला पहिला माणूस मी ठरणार आह. " त्या एकाकी वाळूच्या टेकाडापाशीं तें उडणारें यंत्र हवेंत वर उड्डाण करतांना पहाणारीं फक्त पांच माणसें होतीं. आणि त्यांतल्या एकालाहि तें खरोखरीच उडेल असें वाटत नव्हतें. त्या पांचांपैकीं एकजण म्हणजे जॉनी मूर. हा एक कोळ्याचा सोळा वर्षं वयाचा मुलगा होता. त्यांनीं एंजिन चालू केलें. ऑर्व्ह तळच्या पंखावर चढून बसला. आकाशयान भयंकर हादरत होतें, तें विल्बरनें स्थिर केलें.

" तयार का, ऑर्व्ह ? " विल्बरनें ओरडून विचारलें.

" सारं जय्यत, " ऑर्व्हनें ओरडूनच उत्तर दिलें.

" मग सोड तर आतां, " विल्बर ओरडला. आणि ऑर्व्हनें तरफ मोकळी सोडली. त्याबरोबर पंखे हवेंत गरगरूं लागले. त्या लांकडी मार्गावरून आकाशयान अगदीं सावकाश सरकूं लागलें ... थोडें जलद ... आणि जसें तें त्या मार्गाच्या टोंकाशीं येऊन पोंहोचलें त्याबरोबर आकाशयानाची पुढली बाजू वर उचलली गेली; नंतर बाकीचाहि भाग वर उठला आणि आकाशयान हवेंत तरंगूं



लागलें. तें दहा फूट वर चढलें. तें उडत होतें. आतां तें हवेंतून वेगानें जाऊं लागलें. बिल्बर सदा थंड असणारा, पण आज तोहि आनंदानें नुसता कांपत होता. ऑर्व्हिल तर प्रत्यक्ष उडतच होता. तें उडणारें यंत्र शंभर फूट गेलें आणि मग डौलानें खालीं उतरूं लागून वाळूवर येऊन टेकलें.

खरोखरीच उडालेल्या आजवरच्या त्या पहिल्या उडत्या यंत्रांतून ऑर्व्हिल धडपडत बाहेर आला.

" आपण हें करून दाखवलं आहे, विल ! " तो म्हणाला. त्याचा आवाज कांपरा होता.

" आपण उडूं शकतों ! " विल्बर बावरल्यासारखा बोलला. " आपण उडूं शकतों ! "

" मी किती वेळ वर होतों ? " ऑर्व्हनें विचारलें.

" बारा सेकंद, " विलनें सांगितलें. " बरं, आतां मला एकदां प्रयत्न करून पाहूं दे. "

विल्बर एकशेंसत्तर फूट उडाला आणि नंतर त्यानें तें यंत्र खालीं येऊं दिलें. ऑर्व्हिलनें पुन्हां प्रयत्न केला आणि सुमारें पंधरा सेकंद वर राहून तो खालीं आला.

" विल, तूं किती लांबपर्यंत उडूं शकतोस बघ बरं, " बिल्बरनें पुन्हां प्रयोग करण्यासाठीं जेव्हां आकाशयानांत आपली जागा घेतली तेव्हां ऑर्व्हनें सुचविलें. विलनें होकारार्थी मान हालविली. पुन्हां एकदां तें उडणारें यंत्र सोडण्यांत आलें, तें जवळ जवळ वीस फूट वर चढलें. तेव्हां विलनें त्याची चाल सरळ केली. तो खालीं पाहूं लागला तों तीं वाळूचीं टेकाडें आपल्या आजूबाजूंनीं मागें मागें उडत चाललेलीं त्याला भासलीं. तें उडणारें यंत्र पुढें पुढेंच चाललें होतें. हें खरें उड्डाण होतें. दोन घाबरलेले समुद्रपक्षी ( सी गल्स ) कर्कश आवाज करीत त्या यंत्राच्या मागें पुढें उडत जात होते. " हा कोणता नव्या जातीचा पक्षी आलाय् बुवा ? " विल्बर तसाच आठशें फूट उडत गेला आणि नंतर मात्र वाऱ्याच्या एका अधोगामी प्रवाहानें त्या यंत्राला खालीं जमिनीवर खेंचून आणलें.

" तूं एकूणसाठ सेकंद वर होतास, " विल्बर तळच्या पंखामधून खालीं उतरत असतांनाच ऑर्व्हनें ओरडून सांगितलें.

" पुढल्या वेळीं आपण एकूणसाठ मिनिटें वर राहूं, " विल्बर हंसून म्हणाला.

" आपण आतां वडलांना तार करूं या, " ऑर्व्हनें सुचविलें.

जगांतलें विमानाचें पहिलें उड्डाण आपल्या डोळ्यांनीं पहाणारीं तीं चार माणसें व तो सोळा वर्षांचा मुलगा असे सर्वजण दोघां भावांशीं हस्तांदोलन करण्यासाठीं धांवत पुढें आले. अजून सुद्धां त्यांचा आपल्या डोळयांवर विश्वास बसत नव्हता. एक अवजड, बेढब दिसणाऱ्या आकाशयानानें एका अवजड एंजिनसह

जमिनीवरून प्रत्यक्ष उठून आकाशांत उड्डाण केलेलें त्यांनीं पाहिलें होतें. यासारखें कांहीं तोंपर्यंतच्या इतिहासांत कोणींहि कधीं बघितलेलें सुद्धां नव्हतें.

आपल्या वडिलांना व केटला तार पाठविण्यासाठीं विल व ऑर्व्ह यांनीं धूम ठोकली. घरीं परतल्यावर केट व तिचे वडील यांच्या हातीं ती तार पडली. तार वाचतां वाचतां त्यांचे डोळे उजळले होते. तीं दोघें घाईघाईनें ती बातमी चार्ली टेलरला सांगण्यासाठीं दुकानाकडे गेलीं. पण टेलरच्या चेहऱ्यावर थोडी सुद्धां चलबिचल दिसली नाहीं.

“ माझी खात्री होती कीं, ते ही गोष्ट केल्याशिवाय कधींच रहाणार नाहींत,” तो शांतपणें म्हणाला.

आठवड्याभरांत विल व ऑर्व्ह घरीं परत आले. त्यांचें स्वागत करण्यासाठीं दाराशीं घोषवाद्यें ( ब्रास बँड ) वाजत नव्हतीं. स्टेशनवर त्यांच्यासाठीं वृत्तपत्रांचे प्रतिनिधीहि खोळंबलेले नव्हते. बिशप राइट व केट हीं दोघेंच काय तीं त्यांच्या स्वागतासाठीं आलेलीं होतीं.

“ केट, आम्ही उड्डाण केलं, ” ऑर्व्ह मजेंत म्हणाला.

“ लोकांना तें खरं वाटत नाहीं, ” केट रागानें बोलली.

“ कोणाला नाहीं खरं वाटत ? ” विलनें विचारलें.

“ वृत्तपत्रं, लोक, फार काय शेजाऱ्यांचाहि याच्यावर विश्वास बसत नाहीं, ’ केट कटुतेनें म्हणाली.

“ पहिल्यानं त्यांनीं आम्हांला छांदिष्ट ठरवलं, ” ऑर्व्हनें म्हटलें, “ अन् आतां आम्हीं त्यांना थापाडे वाटतों आहोंत. ”

“ मुलांनो, त्याचं एवढं मनाला लावून घेऊं नका, ” त्यांचे वडील म्हणाले; “ मी तुम्हांला मागंच म्हटलं होतं कीं, देवानं तुमच्यासाठीं फार मोठ्या योजना केल्या आहेत. माझं सांगणं बरोबर होतं. मुलांनो, देवाच्या योजनेंत कोणीहि अडथळा आणूं शकत नाहीं. त्यानं तुम्हांला अशी कांहीं विशेष देणगी दिली आहे कीं, ज्यामुळं इतिहासांतले उड्डाण करणारे पहिले दोघे पुरुष तुम्ही ठरूं शकलांत. लोकांना खुशाल हसूं दे. ”

“ आम्ही त्यांना दाखवून देऊं, ” ऑर्व्ह निर्धारानें म्हणाला.

* * *

प्रकरण एकोणिसावें

# गायरानांतलें विमान

डेनटमधील एका बँकेचे अध्यक्ष टॉरेन्स हफमन म्हणून होते. शहराच्या बाहेर त्यांच्या मालकीचें एक ऐंशीं एकराचें मोठें गायरान होतें. विल व ऑर्व्हि यांनीं आपल्याला त्या गायरानाचा उपयोग करूं देतां का म्हणून हफमनना विचारलें.

" कोणी तरी म्हणत होतं कीं, तुम्ही दोघे उडणाऱ्या यंत्राचे कांहीं प्रयोग करतांहात म्हणून, " हफमन म्हणाले, " खरं आहे तें ? "

"खरंय्," विल्बरनें सांगितलें.

" वाः, मग जरूर वापरा आमचं गायरान, " हफमन म्हणाले. " पण माझ्या गाईंना धक्का लागतां कामा नये बरं का. "

त्या दोघां भावांनीं आतां सोळा अश्वशक्तीचें नवें कोरें उडणारें यंत्र बनविण्याचें ठरविलें होतें. त्यावर ते खूपच मेहनत घेत होते. आणि शेजाऱ्यांच्या वागणुकीमुळें त्यांच्या मनांत इतकी घृणा उत्पन्न झाली कीं, ते क्वचितच चार्ली टेलर व त्यांची बहीण केट यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाला भेटत. ते रस्त्यानें चालूं लागले कीं, लोक एकमेकांकडे पाहून डोळे मिचकावीत. त्यांना म्हणायचें असे कीं, 'आपण हवेंत उड्डाण केलं असं सांगणारे हेच ते दोघे.' विल व ऑर्व्हि यांना तसल्या डोळे मिचकावण्याची किंवा तिरस्कारपूर्ण नजरेची मुळींच क्षिति नव्हती. मात्र आपल्या शेजाऱ्यांचाच आपण खोटें बोलणारे आहोंत असा ग्रह व्हावा याचें त्यांना फार दुःख होत होतें.

शानूटची मात्र खात्री होती कीं, ते दोघे खोटें सांगत नाहींत. ते पॅरिसला गेले व तेथें त्यांनीं किटी हॉकमधील उड्डाणासंबंधीं व्याख्यानहि दिलें. तेव्हां राइट-बंधूंनीं बनविलेल्या उडत्या यंत्राबद्दल फ्रान्समधील प्रत्येकाचें कुतूहल शिगेला पोंहोचलें. ह्या दोन भावांचें नांव अशा तऱ्हेनें प्रथम फ्रान्समध्यें व नंतर जर्मनींत व इंग्लंडमध्येंहि मशहूर झालें – पण डेटनमध्यें मात्र नाहीं !

" ते आपल्या दुचाकीच्या दुकानांतच कां लक्ष घालीत नाहींत ? " लोक विचारायचे. पण राइट-बंधूंनीं हातीं घेतलेल्या आपल्या कामांत मुळींच खंड पडूं दिला नाहीं. त्यांनीं आपलें नवें उडणारें यंत्र गायरानांत आणलें. पण त्याचे प्रयोग ते फक्त सकाळीं उजाडतांना करीत. त्यामुळें कोणालाहि त्यांच्याकडे बघून कुत्सित-पणें हंसण्याची संधिच मिळत नसे. त्यांचें हें नवें यंत्र किटी हॉकमधल्यापेक्षां अधिक काळपर्यंत आकाशांत राहूं लागलें होतें.

पुढें एक दिवस तर विल्बरनें त्या साऱ्या गायरानाला एक प्रदक्षिणाच घातली. हें नवें उडणारें यंत्र हवें तिकडे वळत होतें. एक दिवशीं तर ऑर्व्हनें त्या मैदानाला तीन वेळां प्रदक्षिणा घातली. हें अंतर तीन मैलांचें होतें.

एक दिवस विल व ऑर्व्ह यांनीं आपल्या वडिलांना व केटला आपल्या-बरोबर गायरानावर चलण्याचा आग्रह केला.

केट आणि बिशप राइट त्या उडणाऱ्या यंत्राच्या बाजूला उभीं होतीं.

ऑर्व्हनें तें उडणारें यंत्र वर उडविलें. तें दूर अंतरावर जाऊन जवळ जवळ दिसेनासें झालें. आणि नंतर वळून पुन्हां परत आलें.

अखेर तें उडणारें यंत्र मोठ्या डौलानें जमिनीवर खालीं येऊन टेकलें.

" एकोणचाळीस मिनिटें, " बिशप राइट श्वास टाकीत म्हणाले.

" माझ्याजवळचं गॅसोलिन संपलं म्हणूनच केवळ मला खालीं यावं लागलं, " ऑर्व्हनें खुलासा केला.

" आमच्या मनांत येईल तितका वेळ आम्ही वर राहूं शकतों, " विल्बरनें सांगितलें. " पण आमचं विमान ( Air Plane ) प्रत्यक्ष उडत असतांना तुम्हांला दाखवावं असंच आमच्या मनांत होतं. "

" विमान ? चांगलं नांव आहे हें याला, " बिशप राइट म्हणाले.

बिशप राइटनीं आपण गायरानांत काय पाहिलें तें कांहीं मंडळींना सांगि-तलें. त्यांनीं सांगितल्यामुळें लोकांचा त्यावर विश्वास बसला आणि आतां ते विल्बर व ऑर्व्ह यांच्या सांगण्यावरहि विश्वास ठेवायला तयार झाले.

पुढें एकदां एका आठवड्यांत दोन महत्त्वाचीं माणसें डेटनमध्यें आलीं. त्यांतला एक होता फ्रेंच व दुसरा इंग्लिश. प्रत्येकाला राइट-बंधूंचें विमान विकत हवें होतें. त्यांच्या सर्व हक्कांसाठीं त्यांतला प्रत्येकजण भली मोठी रक्कम त्यांना

द्यायला तयार होता; कारण आपल्याच देशाला तें तयार करतां यावें अशी त्या प्रत्येकाची इच्छा होती.

" जर्मन लोक एक दिवस आमच्यावर चाल करून येतील, " त्यांतला फ्रेंच माणूस तापल्यासारखा म्हणाला; " तेव्हां आम्ही या उडणाऱ्या यंत्राच्या साहाय्यानें त्यांना चांगला धडा शिकवूं. आम्ही त्यांच्या सैन्यावर उड्डाण करून त्यावर डायनामाइट फेंकूं. "

" आम्हांलाहि जर्मनांची भीति आहेच कीं, " इंग्लिश माणूस म्हणाला. " आणि आम्ही तुमच्या या निर्मिति-हक्काबद्दल वाटेल तेवढी रक्कम तुम्हांला द्यायला तयार आहोंत. "

" पण आम्ही अमेरिकन आहोंत," विल्बरनें सांगितलें. " आम्हांला आमचं विमान कोणाला द्यायचं असेल तर तें आम्ही आमच्या स्वतःच्या लष्करालाच देऊ."

" पण राइटमहाशय, माफ करा, " फ्रेंच माणसानें म्हटलें, " तुमच्या लष्करानं तर तें घेण्याचं केव्हांच नाकारलं आहे. तुमचं लष्कर याचा विचार सुद्धां करायला राजी नाहीं. "

विल्बरला तें ऐकून धसकाच बसला. त्यानें व ऑर्व्हनें या बाबतींत लष्करी अधिकाऱ्यांकडे वॉशिंग्टनला लिहिलें होतें. आणि उलट आपल्याला त्याची गरज नसल्याचेंहि त्यांनीं कळविलें होतें ही गोष्ट खरीच होती. पण याबद्दल तो स्वतः किंवा ऑर्व्हहि कोणापाशींच कधीं बोललेले नव्हते.

" हरकत नाहीं, " विल्बर मग म्हणाला; " तरी पण आम्ही अमेरिकन आहोंत. आणि कदाचित् पुढंमागं आमच्या लष्कराला त्याची गरज वाटूंहि लागेल. "

ते दोघे परदेशी सज्जन कष्टी झालेले दिसले. त्यांनीं राइट-बंधूंना नमस्कार केला व त्यांचा निरोप घेतला.

" मला वाटतं आपण त्यांना याचं खरंखुरं प्रात्यक्षिकच करून दाखवायला हवं, " विल म्हणाला. " आपल्या लष्करी अधिकाऱ्यांनीं या बाबतींत विशेष उत्साह दाखविला नाहीं याबद्दल मी त्यांना दोष देत नाहीं. त्यांनीं आपलं विमान प्रत्यक्ष उडतांना अजून कधीं पाहिलेलंच नाहीं. "

" ठीक आहे, विल, त्यांना विचार करायला लावण्यासारखं आपण त्यांच्यापुढं कांहीं तरी ठेवूं, " ऑर्व्हनेंहि संमति दिली.

* * *

प्रकरण विसावें

# कीर्ति आणि यश

त्या वेळीं अमेरिकन संयुक्त संस्थानांचे ( अमेरिकेचे ) राष्ट्राध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट होते. हे गृहस्थ फार थोर कार्यकर्ते म्हणून ओळखले जात असले, तरी त्यांचें वाचन अफाट होतें. एक दिवस त्यांनीं 'सायंटिफिक अमेरिकन' या नियतकालिकाची एक प्रत उचलली. त्या अंकांत राइट-बंधू व त्यांचें उडणारें यंत्र याविषयीं एक लेख आला होता.

"या दोघां तरुण माणसांचा शोध करा," राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांनीं आपल्या युद्धमंत्र्यांना सांगितलें; "आणि त्यांना त्यांचें प्रात्यक्षिक दाखवायला सांगा. कोणी सांगावें, त्यांच्या त्या उडणाऱ्या यंत्रांत कांहीं विशेष असेलहि."

एक दिवस एक रुबाबदार लष्करी अधिकारी-कर्नल-डेटनमध्यें येऊन थडकला. तो थेट राइट-बंधूंना भेटायला गेला. अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या विनंतीला मान देणार नाहींत इतके का ते उद्धट होते ?

"खरं सांगायचं म्हणजे," तो अधिकारी सांगूं लागला, "आम्हां लष्करांतल्या लोकांना तुमच्या या उडणाऱ्या यंत्राला कांहीं उज्ज्वल भवितव्य आहे असं मुळींच वाटत नाहीं. पण राष्ट्राध्यक्षांची आम्हांला तुमची गांठ घेण्याबद्दल आज्ञाच झालेली आहे. तुम्ही तुमच्या या यंत्राचं प्रात्यक्षिक दाखवूं शकाल का ?"

"अवश्य दाखवूं म्हणून सांगा," ऑर्व्हिल म्हणाला. विल्बरनें त्याला मान डोलविली.

"अर्थात् आम्ही हा कार्यक्रम अगदीं गुप्त ठेवूं," कर्नलनें हंसून सांगितलें.

"कां बरं ?" विल्बरनें विचारलें.

"म्हणजे त्याचं असं कीं, समजा एखाद् वेळीं काम बिघडलं ... म्हणजे तें जमिनीवरून वर उठलंच नाहीं, ..." कर्नल अडखळत म्हणाला. "तुमचं हंसं होऊं नये अशी आमची खरोखरीच इच्छा आहे."

" असं, असं. कर्नल, तुम्ही आमच्याबद्दल मुळींच काळजी करूं नका, " आणि ऑर्व्ह हंसला. " हजार लोक बोलवा; लाख बोलवा ना या प्रात्यक्षिकासाठीं ! आम्हांला त्याची फिकीर नाहीं. "

* * *



अनुक्रमांक २२५०१८ वि. यात्रिक स्थलक्रमांक ८०८ नों दि. ३१।३।५८



व्हर्जिनियामधल्या फोर्ट मीर किल्ल्यापाशीं केवढी मोठी गर्दी जमली होती. लष्करानें ही जागा चांचणीसाठीं पसंत केली होती. युद्धमंत्री तेथें हजर होते. डझनभर 'जनरल्स' तिथें उपस्थित होते; आणि निदान पन्नास तरी वृत्तपत्राचे वार्ताहर. हें चमत्कारिक दिसणारें यंत्र खरोखरीच आकाशांत उड्डाण घेईल असा तिथें जमलेल्यांपैकीं कोणालाच विश्वास नव्हता. – मग तें उडालें का? ऑर्व्हिलनें तें वर उडविलें आणि चांगलें तासभर त्यानें तें त्या मैदानासभोंवार घुमाविलें. तो जेव्हां खालीं उतरला तेव्हां जमावांतले लोक उत्साहानें नुसते बेभान झाले होते. तीन-तीन तारे खांद्यावर लटकावलेले सेनाधिकारी सुद्धां (जनरल्स) त्या दोघां शांत व स्थिर बंधूंजवळ पोंहोचण्यासाठीं त्या भाऊगर्दींत घुसले.

"त्या उडणाऱ्या यंत्रांत तुमच्याबरोबर बसून जाण्यासाठीं मी वाटेल तें द्यायला तयार आहें," एक तरुण लेफ्टनंट म्हणाला. ऑर्व्हिलनें त्याच्याकडे बघितलें. त्या तरुण योद्धयाचे डोळे चमकत होते. तो होता लेफ्टनंट फ्रेड ल्हाम.

"चला, या लेफ्टनंट," ऑर्व्हिल म्हणाला. "माझ्या मागं आंत चढा आणि लोंबकळा ... जरा हा जमाव हटवा बरं कृपा करून."

गर्दी मागें हटली. ऑर्व्हनें अगदीं सहजपणें उड्डाण घेतलें. लेफ्टनंट पाठी-मागें लोंबकळत होताच. त्यांनीं त्या मैदानाला तीन फेऱ्या मारल्या आणि ते खालीं उतरले. आतां तर तें पहायला आलेल्या जमावाला वेड लागण्याची पाळी आली. त्या लोकांनीं एक चमत्कार प्रत्यक्ष घडतांना पाहिला होता. सेनाधिकारी विचारमग्न झाले होते. हें विमान वैमानिकाशिवाय आणखी १८० पौंड वजनाचा एक उतारू नेऊं शकतें. याचा अर्थ तें १८० पौंड वजनाचा एक बॉम्ब वाहून नेऊं शकेल. कदाचित् एकापेक्षां अधिक बॉम्बसुद्दि तें वाहून नेऊं शकेल.

"तुम्ही या विमानाचे हक्क दुसऱ्या कोणा परकी सरकारला विकले आहेत काय?" एका जनरलनें विचारलें.

"जनरल, आम्ही अमेरिकन आहोंत," ऑर्व्ह फक्त एवढेंच बोलला. त्या सेनाधिकाऱ्यानें आपला हात हालविला आणि विचारलें, "युद्धमंत्र्यांना भेटायला तुम्हांला उद्यां वेळ मिळण्यासारखा आहे का?"

दोघांहि भावांनीं माना डोलावल्या.

दुसरे दिवशीं सकाळीं ते झोपून उठले ते मोठे प्रसिद्ध गृहस्थ म्हणूनच. देशांतल्या प्रत्येक वर्तमानपत्रांत त्यांच्या उड्डाणाबद्दलचे मोठमोठे मथळे फडकत

ग्रा. क्र. ०१२८

होते. आतां ते जगांतील सर्वांत प्रसिद्ध व्यक्ति झाले होते. युद्धमंत्र्यांच्या भेटीस ते गेले तेव्हां युद्धमंत्रालयाच्या इमारतीबाहेर ही गर्दी झाली होती !

" तरुणांनो, तुम्ही एक फारच मोठी गोष्ट केली आहे, " युद्धमं त्यांच्याशीं हस्तांदोलन करीत म्हणाले. " हवेंत उड्डाण करणारे इतिहासांतले प वीर. मला हें सांगा कीं, काल तुम्हीं आम्हांला दाखविलंत त्यापेक्षां मोठीं विम तुम्ही बनवूं शकाल काय ? "

" तो केवळ अश्वशक्तीचा प्रश्न आहे, " ऑर्व्ह म्हणाला. " जर आ अधिक बळकट, जास्त शक्तिशाली एंजिनं बनविलीं तर आम्हांला याहून मो विमानंहि उडवितां येतील. "

" तेवढी शक्ति असली तर आम्ही एखादं जेवणाचं मेज सुद्धां वर उड दाखवूं, " विल्बरनें सांगितलें.

" मला खात्री आहे, तुम्ही उडवाल, " युद्धमंत्री म्हणाले. " आमच लष्करासाठीं तुम्ही विमानं बनवावींत अशी आमची इच्छा आहे. बनवाल का ?

"अलबत," ऑर्व्हनें म्हटलें. आणि बिल्बरनें त्याला पुस्ती जोडल

" तुम्ही फक्त तुम्हांला हव्या त्या वेगाचा आंकडा सांगा, " ऑर्व्ह म्हणाल " तुम्ही द्याल त्या मोजमापाचं विमान आम्ही बनवून देऊं. "

" बरं, तुम्ही परतायचं कधीं ठरवतांहात ? " युद्धमंत्र्यांनीं विचारलें,

" आज मध्यरात्रीच्याच गाडीनं, " विलनें सांगितलें.

" मग तुम्हांला आमचं मेजवानीचं निमंत्रण स्वीकारायला कांहीं हरक नाहीं, " युद्धमंत्री हंसून म्हणाले. " अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनीं तुम्हांला आ रात्रीचं मेजवानीचं निमंत्रण देण्याबद्दल मला सांगितलं आहे. याल ना ? "

विल्बरनें ऑर्व्हकडे बघितलें. ऑर्व्हनें विल्बरकडे दृष्टिक्षेप केला.

ऑर्व्हिल विल्कडे पाहून डोळे बारीक करीत गंभीरपणानें म्हणाल " मला वाटतं कांहीं हरकत नाहीं. "

आणि मग, हवेंत उड्डाण करायला शिकलेले ते दोघे मुलगे हातांत हा घालून कचेरीच्या बाहेर पडले.

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २४८०६ वि. ५/१२/...
क्रमांक ८१०० नों: दि: ३/३/५९

REFBK-0009828